म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं.



REFBK-0005691

# निर्वासितांचा प्रश्न

निर्मल साहित्य प्रकाशन : : ८

# निर्वासितांचा प्रश्न

५६०१

लेखक

शरच्चंद्र दामोदर गोखले, बी. ए.

REFBK-0005691

बलिप्रतिपदा
शके १८७०

मूल्य दोन रुपये

प्रकाशक
डी. जी. जोशी
५३३ सदाशिव, पुणें २.

मुद्रक
अमरेन्द्र लक्ष्मण गाडगीळ,
अग्रणी मुद्रणालय,
आनन्द चेंबर्स, आंबराई, पुणें ४.

मुखपृष्ठावरील चित्र
रघुनाथ केशव केळकर
केळकर चित्रशाळा, पुणें २.

भाषांतर पुनर्मुद्रण वगैरे
सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन

सादर समर्पण

श्रीशाय जनतात्मने

# निवेदन

' निर्वासितांचा प्रश्न ' हें शास्त्रीय व उद्बोधक पुस्तक, एकप्रकारे माझ्या निर्वासित परिस्थितीत प्रसिद्ध होत आहे, हा एक योगायोगच म्हटला पाहिजे, आणि त्या निर्वासितांच्या प्रमाणेंच माझीहि स्थिरस्थावर होईल अशी अपेक्षा आहे.

ही वैयक्तिक बाब सोडून आतां पुस्तकासंबंधीं थोडें विवेचन करणें इष्ट आहे. मुंबईच्या टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस या संस्थेतर्फे दिल्ली व कुरुक्षेत्र या ठिकाणच्या निर्वासित छावण्यांमधील शरणार्थींचीं सामाजिक, आर्थिक व मानसिक पाहणी करण्यासाठीं जे विद्यार्थी तिकडे धाडण्यांत आले त्यांत श्री. शरच्चंद्र दामोदर गोखले यांची निवड झाली. दिल्ली, कुरुक्षेत्र व इतर ठिकाणीं जाऊन त्यांनीं सहा महिनेपर्यंत हजारों निर्वासितांची सर्व तऱ्हेची नोंद घेतली, त्यांची हलाखी पाहिली, मानसिक विश्लेषण केलें. इकडील समाज-व्यवस्थेशी ते कसे व किती समरस होतील यांची चांचणी घेतली व त्यांच्या आर्थिक परिस्थितीचीहि दखल घेतली.

या सर्वांचा संकलित इतिहास त्यांनीं ' निर्वासितांचा प्रश्न ' या शास्त्रीय पुस्तकांत ग्रथित केला असून तो अतिशय हृदयद्रावक तसाच उद्बोधकहि आहे. फाळणी होण्यापूर्वीपासूनच पंजाब बंगालमध्यें जातीय वादाची मुळें किती खोल रुजली होती, त्याची कल्पना मांडून मगच त्यांनी निर्वासितांच्या स्थलांतराची व त्यानंतर भारतांत त्यांचे वास्तव्य कसे व कोठे झालें याची आकडेवार माहिती विविध प्रकरणांतून गोविली आहे.

याशिवाय सरकार, जनता व निर्वासित यांची यापुढची प्राप्त कर्तव्यें कोणतीं आहेत, हेंहि त्यांनी विशद् करून सांगितलें आहे. परिशिष्टांमधील त्यांची इतिवृत्तें सहृदय माणसाच्या डोळ्यांना पाणी आणतील इतकी हृदयद्रावक आहेत. निर्वासितांचा प्रश्न आतां पंजाब पुरताच राहिला नसून तो सर्व भारताचा झाला आहे. आपल्या प्रांतांत, शहरांत आपल्या शेजारी राहणाऱ्या लोकांची मनस्थिती कशाप्रकारची आहे, ते किती घनसंपन्न होते, त्यांचे संस्कार व आचार विचार किती उच्च होते याची संपूर्ण कल्पना या पुस्तकांतून वाचकांना येणार आहे. अशा निराधार परप्रांतीय माणसांना आपल्या समाजांत संपूर्णपणे समाविष्ट करण्यासाठीं महाराष्ट्रीय मंडळींनी केवढी आपुलकी दाखविली पाहिजे याचें मार्गदर्शनहि श्री. गोखले यांनी उत्तम प्रकारें केलें आहे.

या उपयुक्त पुस्तकाचे स्वागत महाराष्ट्र वाचक करतील अशी आशा आहे.

हें पुस्तक अभ्यास करून परिश्रमपूर्वक लिहिल्याबद्दल श्री. गोखले हे अभिनंदनास पात्र आहेत. पुस्तकास प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल श्री. काका साहेबांबद्दलची कृतज्ञता मी व्यक्त करितो. यानंतर फारच थोड्या वेळांत पुस्तक छापून दिल्याबद्दल माझे स्नेही श्री. अमरेंद्र गाडगीळ यांचें मी आभार मानतो. माझे स्नेही श्री. नानासाहेब गोखले यांच्यामुळें ह्या पुस्तकाचा योग जुळून आला त्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

**—वि. श्री. जोगळेकर**

व्यवस्थापक निर्मळ साहित्य प्रकाशन.

# अवतरणिका

प्रस्ताव

नामदार काकासाहेब गाडगीळ

१

खोल रुजलेलीं मुळें

२

वादळाचा वेग

३

दंगलीपासून यादवीपर्यंत

४

शोकयात्रा

५

छावण्या आणि प्राथमिक गरजा

६

भौतिक पुनर्स्थापना

७

नवे प्रश्न

८

सरकार, समाज, निर्वासित

९

कुरुक्षेत्र छावणी

# प्रस्तावना

"साठ वर्षांच्या प्रयत्नांचें हें फळ! आणि याला तुम्ही स्वातंत्र्य म्हणतां."

एक निर्वासित माझ्याशीं बोलतांना भारताच्या स्वातंत्र्याचे वरील शब्दांनीं वर्णन करीत होता. त्याच्या त्या थोड्या शब्दांत राग, द्वेष, निराशा व अनिवार्यता या सगळ्या भावनांचा समावेश झाला होता, अंतरीचे सारे भाव त्याच्या चेहेऱ्यावर स्पष्टपणे उमटले होते; त्याचे हातवारे व हावभाव सर्व कांहीं सूचक होते.

राजकीय सिद्धांत सांगून किंवा व्यावहारिक कसोटी वर्णून त्याचे किंवा त्याच्या प्रमाणे अगदीं हळव्या झालेल्या इतर निर्वासितांचे समाधान होणे शक्य नव्हते. तथापि हिंदुस्थान सरकारनें निर्वासितांसाठीं केलेल्या विश्वप्रयत्नांचा इतिहास जेव्हां मी त्याला सांगूं लागलों तसतसा त्याचा राग कमी होऊं लागला, शब्दांत मार्दव आले, चेहेऱ्यावर कारुण्य पसरले आणि डोळ्यांत आंसवें उभीं राहिलीं.

जेव्हां केव्हां निर्वासित प्रश्नाचा साद्यंत इतिहास लिहिला जाईल त्यावेळीं हा प्रश्न सोडविण्याच्या कामीं हिंदुस्थान सरकारला केवढा खटाटोप करावा लागला, याची जनतेला कल्पना येईल. तथापि निर्वासितांचा प्रश्न कसा उत्पन्न झाला, तो सरकारनें किती तत्परतेनें हाताळला, त्यासाठीं लक्षावधि रुपये कसे खर्च झाले व प्रांताप्रांतांतून निर्वासितांना वसविण्यासाठीं सरकारनें केवढी दक्षता घेतली, याची स्थूल कल्पना श्री. शरच्चंद्र गोखले यांनीं आपल्या पुस्तकांत उत्तम तऱ्हेनें मांडली आहे. निर्वासितांमध्यें त्यांच्या समवेत त्यांना राहण्याचा प्रसंग आल्यामुळें निर्वासितांच्या अंतरीची खळबळ कोणत्या थराला पोचली होती याचीहि सूक्ष्म छाननी या पुस्तकांत वाचकांना आढळून येईल.

ज्ञात इतिहासकालापासून ज्यांच्या पूर्वजांनीं जी भूमि आपली मानली, जिचे पावित्र्य व श्रेष्ठत्व वाढविले, जी साधन संपन्न केली, साहित्य, कला व संगीत यांनीं आपला आवडता विषय म्हणून जिला श्रेष्ठ स्थान दिले अशी सुजल, सुफल मातृभूमि सोडून लक्षावधि कुटुंबें रावी नदी ओलांडून भारतांत आलीं. खरोखर या सर्व अभागी जीवांचा तो पुनर्जन्म होता. पूर्व सुखाची

स्मृति व प्रचलित दुःखांचा अनुभव मात्र ते या नव्या सृष्टींत घेऊन आले होते, त्यांचीं मनें मृतवत् होतीं. आज ना उद्यां या प्रचंड देशांत हे सर्व निर्वासित पुनरपि स्थिर होतील, त्यांना गोळाभर अन्न मिळेल, वस्त्र-प्रावर्णाची सोय लागेल, राहण्यासाठीं नवीन आश्रयस्थानेंहि निर्माण होतील. पण अन्नवस्त्र व निवास या प्राथमिक गरजेपेक्षां मनुष्य हा अधिक आहे.

सर्वांत कठिण प्रसंग त्यांचीं मनें बसविण्यांत आहे. त्यांच्या जीवनांत पुनः आशा निर्माण करण्याचा प्रश्न आहे. कर्तव्यरूपी ताऱ्याचा पुनः उदय होणें हाच या प्रश्नाचा निकष आहे. त्यांनी तिकडे टाकून दिलेली संपात्ति पार्थिव होती, लौकिक होती, पण असल्या अलोट संपत्तीला प्रसवणारी परिसाप्रमाणे अद्भुत किमया करणारी जी महत्त्वाकांक्षा तीच खरी अक्षय संपात्ति आहे. निर्वासितांनीं इकडे येतांना सर्व कांहीं सोडले, टाकले पण आपल्या अंगचे कसब, आपले चातुर्य आणि आपली हिंमत बरोबर आणली आहे. आणि ज्या बळावर त्यांनीं व त्यांच्या शूर कर्तबगार पूर्वजांनीं तेथें संपात्ति निर्माण केली ते त्यांचे बळ कार्यान्वित करणें म्हणजेच हा प्रश्न सोडविणें आहे. त्यांच्या या साऱ्या गुणसंपदेला आवाहन करूनच हें कार्य या देशाला करावयाचे आहे. महाभारतांत लिहिल्याप्रमाणे सत्याचा विजय होऊन ‘ धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे ’ नवे युग सुरू झाले आणि आतांच्या अधुनिक इतिहासांत नष्ट युग संपून निर्माण युग याच कुरुक्षेत्रांत कसे सुरू होत आहे, याचीहि साद्यंत हकीगत या पुस्तिकेंत आहे.

या प्रश्नाकडे दोषैक दृष्टीनें न पाहतां सहानुभूतीनें पाहून सरकारनें केलेले प्रयत्न व जे करावेसे वाटताहेत ते यांचाहि प्रपंच शरश्चंद्र गोखले यांनीं केला आहे. कार्यांतील अडचणी तें करतांना समजतात, याची जाणीव लेखकाला असल्यामुळें हें पुस्तक अधिक विचारार्ह झाले आहे, माझी खात्री आहे. मराठी तज्ज्ञ या पुस्तकाचे स्वागतच करील.

भाद्रपद शुद्ध ११ शके १८७०
परिवर्तिनी एकादशी
नवी दिल्ली

न. वि. गाडगीळ

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र.

# खोल रुजलेलीं मुळें

" निर्वासित म्हटलें कीं माझ्या डोळ्यासमोर तो ७५ वर्षांचा वृद्ध उभा राहातो. त्याचें सारें अंग थरथर कांपत होतें, धड उभेहि राहातां येत नव्हते. साऱ्या आयुष्याचें दुःख त्याच्या डोळ्यांतून ओघळून येत होते. ज्याला मरायचे होते, असा तो जगला होता आणि ज्यांना जगायचे होतें, तीं त्याच्या कुटुंबांतील माणसें नाहींशी झाली होतीं. पाकळ्या पायदळीं गेल्या आणि निर्माल्य शिल्लक राहिले होते. ऐन जवानींतहि दोन मुलें मारली गेलीं. सुनामुलींच्या यातनांची आठवण सुद्धां नको. निष्पाप नातवंडे, तीं सुद्धां या राजकीय होळींत जळाली. सर्वस्व गमावलें आणि तो मात्र शिल्लक आहे. त्याच्याजवळ त्याचें फक्त अस्तित्व आहे. "

## स्वातंत्र्याची किंमत

आजवरच्या इतिहासावरून, एक गोष्ट गृहित धरायला हरकत नाहीं, ती ही कीं, स्वातंत्र्यसंपादनाकरितां प्रत्येक राष्ट्राला कोणत्या ना कोणत्या स्वरुपांत किंमत द्यावी लागली आहे. कोठें युद्धें झालीं आहेत. कोठें क्रांति घडली आहे. स्वातंत्र्याची किंमत म्हणून असंख्य जिवांची आहुति प्रत्येक राष्ट्रानें हंसत हंसत दिली आहे. हंसत हंसत याचा अर्थच हा कीं, ही यातनांची

किंमत देतांना प्रत्येक माणसाच्या मनांत ही जाणीव असते कीं, मी माझ्या राष्ट्राच्या स्वातंत्र्यसंपादनाकरितां हें बलिदान करतो आहे. त्यांत यातना आहेत, दुःख आहे, परंतु त्याचबरोबर अमर असा अभिमानहि आहे. कारण त्या यातनामध्यें अनेकांच्या सुखाकरितां मी हें दुःख भोगतो आहे अशी अभिमानाची जागा असते. माझ्या यातना ह्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या अनेक कारणांपैकीं एक आहे अशी सुखसंवेदना त्यांत असतें. शिवाय ही दुःखें समजून उमजून अंगावर घेतलेलीं असतात. परंतु भारतीय स्वातंत्र्य-संपादनाच्या बाबतींत थोडासा वेगळा प्रकार झाला. लोकांच्या यातना ह्या स्वातंत्र्य-संपादनाचें कारण म्हणून न येतां स्वातंत्र्याबरोबर आलेली आपत्ति—परिणाम—म्हणून आल्या. ज्यांनीं पारतंत्र्यावर घणाचे घाव घातले, त्या सत्तावनच्या बंडांतील सैनिकांपासून तों बेचाळिसातल्या सत्याग्रह्यांपर्यंत सर्वांच्या वांट्याला हा त्यागाचा अभिमान आला. स्वातंत्र्याबरोबरच आलेली आपत्ति ज्यांना अजाणतां भोगावी लागली अशा निर्वासितांच्या वांट्याला फक्त सर्वस्वाचा त्याग आला, अभिमान आला नाहीं. म्हणूनच केवळ या एका प्रश्नापुरते पहायचें झालें तर असें म्हणण्यावांचून गत्यंतर नाहीं कीं हिंदुस्थानला स्वातंत्र्याची किंमत असाधारण पण अजाणतां, द्यावी लागली.

निर्वासितांचा प्रश्न हा स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा सर्वांत महत्वाचा प्रश्न. हा प्रश्न निर्माण झाला असें म्हणण्यापेक्षां हा प्रश्न हिंदुस्थान व पाकिस्तानवर कोसळला असेंच म्हणणें सयुक्तिक ठरेल. कारण निरखून पाहिल्यास त्या प्रचंड दंगलीचीं बीजें जरी आपल्याला क्वचित दिसली तरी ज्या वेगानें ह्या वादळानें थैमान घातलें तो वेग मात्र खासच अनपेक्षित होता. ह्याची कबूली निर्वासितांनीं आणि नेत्यांनीं, अविरोधाने दिली आहे. त्याचप्रमाणें या साऱ्या अघटित घटना अगदीं एकाएकीं झाल्या हेंहि म्हणणें खोटें आहे. खरी गोष्ट ही आहे कीं, वादळाची अपेक्षा होती पण वेगाची कल्पनाच नव्हती.

जोपर्यंत नुसत्या निर्वासितांच्या बातम्याच येत असत तोंवर कल्पनेनें, एक राष्ट्रियत्वाच्या भावनेनें, स्वातंत्र्याच्या इर्षेनें म्हटलें जात होते कीं, निर्वासितांचा प्रश्न साऱ्या हिंदुस्थानचा आहे. परंतु त्यांच्यामुळें देशाच्या आर्थिक जीवनावर ताण पडतांच, मनाचा तोल ढळलेला निर्वासित, शेजारी म्हणून येतांच, सर्वांना या प्रश्नांच्या

गंभीरतेची जाणीव व्हायला लागली. केवळ भौतिक सुखसोयी पुरवून हा प्रश्न संपणारा नाहीं, त्याची मुळें समाजाच्या तळच्या थरापर्यंत शिरत आहेत, हें लक्षांत येतांच ह्या प्रश्नाच्या दोन्ही बाजूंची जाणीव, निर्वासित समाज व सरकार यांना व्हायला लागली. दूरच्या प्रांताबद्दल सहानुभूतीच्या प्रश्नाचे स्वरूप त्याला न उरतां त्यांची झळ थेट मद्रासपर्यंत सर्वांना लागूं लागली.

ऑगस्ट १९४७ च्या सुमाराला ठिकठिकाणच्या जातीय दंगलींनी उग्र स्वरूप धारण केलें आणि सुजल, सुफल अशा पंजाबला स्मशानभूमीची अवकळा आली. त्यावेळीं राजकीय घडामोडींना असा कांहीं वेग आला होता कीं त्यांत सामान्य मनाला भोंवळ न आली तरच नवल. पण या साऱ्या राजकीय घडामोडींची पार्श्वभूमि म्हणून जो प्रचार जनतेंत केला जात होता, जीं ध्येयें पुढे मांडलीं जात होतीं, त्याचा साहजिक परिणाम म्हणून जन्मोजन्म एकत्र राहिलेलीं अंतःकरणें एकमेकांपासून दुरावूं लागली होतीं. माझी भाषा पुश्तु, माझा देश सरहद्दी सुभा, मी प्रथम पठाण असे म्हणणाऱ्या शेजाऱ्यांतच पूर्वी कमी प्रमाणांत असलेली मी हिंदू आणि तो मुसलमान ही भावना तेवूं लागली आणि हा विषारी वणवा वाढतां वाढतां कित्येक माणसांची केवळ ते दुसऱ्या धर्माचे आहेत म्हणून—कत्तल करण्यांत आली ! ज्यांची भाषा एक, वेष एक, देश एक त्यांच्यामध्यें पराकाष्ठेचे अंतर पडत गेलें ही घटना कांहीं अचानक घडणें शक्य नाहीं.

स्वातंत्र्याचा उंबरठा ओलांडला न ओलांडला तोंच नवागत राष्ट्रांच्यासाठीं काय वाढून ठेवलें होतें ? दंगली आणि जाळपोळींना ऊत आला. अकबर, कबीर, बुद्ध आणि गांधी यांच्या देशांत सहिष्णुतेचा दिवसाढवळ्या खून झाला. स्वस्तांतल्या स्वस्त व्यापारांत स्त्रीत्वाचा विक्रय करण्यांत आला. आणि ज्यांच्या ओठावरचे दूधहि वाळले नसेल अशा निरागस अर्भकांना रक्ताची आंघोळ घालण्यांत आली. युगानुयुगें ज्या धरणीवर त्यांनी प्राणापेक्षां प्रेम केलें ती जमीन परक्याची ठरली. आणि धुळीनीं माखलेली, उपाशी तापाशी अगणित माणसें कित्येक मैलांची वाटचाल करीत भारतीय सरहद्दीकडे निघालीं. त्यांना केवळ अन्न आणि आसरा नको होता. महाग झालेली दया आणि

सहानुभूति याची ते अपेक्षा करीत होते. अशीं असंख्य माणसें भारतीय सीमेंत आलीं, उभी राहिली. त्यांची ती केवळ अपेक्षाच नव्हती, हक्क होता. त्यांनी सारें कोणाकरितां सोसले ? त्यांच्याकरितां तर झालेच, पण हें आपल्याकरितां नाहीं असे इतर प्रांताना म्हणतां येईल काय ?

## अघटित घटना

या साऱ्या अनपेक्षित दंगलीचें स्वरूपच वेगळे होते. पंजाब व सरहद्द प्रांतांत मुसलमान गुंड व क्वचित पाकिस्तानी सैनिकांनी अल्पसंख्यांकाच्यावर अनन्वित अत्याचार केले, शूर पंजाबी व धीराचे हिंदू पठाण यांनी घरेंदारें मागें टाकून, मिळेल त्या साधनानें भारताकडे आसऱ्याकरितां धांव घेतली. साठ सात हजार माणसांचा एक काफला याप्रमाणे कैक काफले आले. एक काफला तर सुमारें पंचाहत्तर मैल लांबीचा होता. असंख्य माणसे केवळ दयेवर जगण्याची आशा करीत होती. अशा अकल्पित घटना जव्हां घडतात, तेव्हां त्या केवळ मूठभर लोकांनी भावनावश होऊन केल्या असतील, किंवा याला केवळ एखादा तत्कालिक जातीय दंगा किंवा राजकीय प्रक्षोभ कारण असूं शकेल यावर विश्वास बसणें अशक्य होते. म्हणूनच सारी विकारवशता, भावना, बाजूला ठेवून जर विचार करावयाचे ठरले तर एक गोष्ट अगदीं स्पष्टपणानें लक्षांत येतें ती ही कीं, या अनर्थाची मुळें फार खोल रुजली आहेत केवळ एका जागच्या दंग्याचा सूड म्हणून हें घडलें नाहीं, केवळ भावनाशील मनावर जातीय निखारे फुलवल्यामुळें हें घडलें नाहीं, तर ही भावना, ही वृत्ति कित्येक वर्षें रुजत होती. अर्थातच यांत हिंदू व मुसलमान यांची जबाबदारी किती या प्रश्नाचे आतां महत्व नाहीं. कारण खुद्द पंडित नेहरूच एप्रिल १९४७ मध्यें निर्वासितांसमोर कुरुक्षेत्रांत म्हणाले कीं "स्वातंत्र्य संपादनामागोमागच पंजाब आणि सरहद्द प्रांतांत अभागी घटना घडल्या. लाखों निष्पाप जीवांचा बळी घेण्यांत आला. आणि सर्वांत वाईट हें कीं, स्त्रीत्वाचा मान हें एक सहज खेळणें झालें. याचा दोष कोणत्या जमातीवर किती प्रमाणांत जातो याची वांटणी करीत बसण्यांत अर्थ नाहीं. आपले हात रक्तानें भरले आहेत..." आणि म्हणूनच या प्रश्नाचा विचार करितांना या प्रश्नाच्या जन्माची थोडी पार्श्वभूमि पाहणे अगत्याचें व अत्यावश्यक आहे.

# वादळाचा वेग

हिंदुस्थानांत पाय घट्ट करण्याकरितां धूर्त ब्रिटिश मुत्सद्यांनीं फोडा आणि झोडा या तत्वाची अंमलबजावणी केली आणि भारतीय राजकारणांत जातीय त्रिकोण निर्माण केला. एकराष्ट्रीयत्वाच्या जाणावेनें याला वेळींच विरोध झाला असता तर या त्रिकोणाचे तीन तेरा वाजवणें फारसें कठीण नव्हतें. पण जातीयतेनें अंध झालेल्या राजमान्य जिनांनीं त्याच राजनीतीची तळी उचलली व अल्पसंख्यांकांना संरक्षण मिळवलें. ह्या जातीय निवाड्याची ही घोरपड जी एकदां भारतीय राजकारणाच्या गळ्यांत पडली ती भारताचें अंतःकरण विदारूनच बाहेर पडत आहे. जातीय निवाड्यामुळें राजकारणांत हिंदु व मुसलमान असे उघड उघड दोन वेगळे मतदारसंघ व म्हणून गट निर्माण झाले. धर्म-जाति निरपेक्ष राजकारणाचें तत्व केवळ तत्वच राहिलें आणि व्यवहारांत राजकारणाची गाडी रूळ बदलून धांवूं लागली. यांत मुसलमानांना एक नवी दृष्टि प्राप्त झाली व जातीय हिरवटपणा पाकिस्तानच्या मागणीपर्यंत जाऊन भिडला. याचें बीं, ब्रिटिश साम्राज्यशाहीनें घातलें आणि जातीय राजकीय पक्षांनीं याला पाणी पुरवलें. हें जरी खरें असलें तरी त्याला उपेक्षेचे कुंपण कोणीं दिलें ? आळवणी, आर्जवा, न्यायाविरुद्ध असूनहि नमतें घेणें या कोणत्याहि उपायानें श्री. जिना वळले नाहींत. त्यांनीं आपले पाकिस्तानच्या मागणीचे तुणतुणें चालूच ठेवलें.

जातीय पायावर राष्ट्राच्या फाळणीची मागणी त्यांनीं केली व त्या मागणीच्या पाठोपाठ १९ ऑगस्ट १९४६ ला मुस्लीम लीगनें प्रत्यक्ष चळवळीचा ( Direct action ) झेंडा उभारला. जागोजाग जातीयतेच्या ज्वाला उफाळल्या. १६ ऑगस्टला हजारों नागरिकांचा बळी कलकत्त्यांत घेण्यांत आला. जिथें केवळ मूठभर हिंदु आहेत अशां शांत नौखालींत या वणव्याची झळ पोचवली गेली. १० आक्टोबरला सुरुवात होऊन योजनाबद्ध रीतीनें नौखाली, टिप्पेरा या भागांत ७०० खेड्यांची जाळपोळ, लुटालूट करण्यांत आली. जबरदस्तीचीं धर्मांतरें व बलात्कार यामध्यें प्रत्यक्ष चळवळीनें कळस गांठला. लीग मंत्रिमंडळाचे अस्तित्व, ऑगस्टचे दंगे याचा विचार करतांना एक घटना विशेषत्वानें दिसते ती ही कीं, १६ ऑगस्टपूर्वीं केवळ अठराच दिवस कलकत्त्यांत कैक हिंदु आणि मुसलमान नागरिक, डाकखात्याच्या संपाला सहानुभूति म्हणून खांद्याला खांदा भिडवून मिरवले होते. पण या साऱ्याचा अन्वयार्थ सांगू नये इतका उघड आहे. अर्थातच याची तीव्र प्रतिक्रिया बिहारमध्यें झाली. तेथील मंत्रिमंडळाची जबाबदारी किती याचा विचार येथें अगत्याचा नाहीं. पण बिहारचा बदला सरहद्द प्रांतांत व पश्चिम पंजाबांत घेतला गेला. आणि या सर्व प्रांतांतून अल्पसंख्यांकांच्या घरांत स्मशानें बसवली गेलीं. ऑगस्ट १९४६ मध्यें कलकत्त्यांत सुरू झालेली ही दंगलीची लाट ४६ च्या अखेरीस निवळली असें वाटलें. पण दोन चार महिन्यांतच ती अधिक जोमानें पंजाबमध्यें उफाळून आली. या साऱ्या गतिमान् घटनांचे विश्लेषण येथें प्रस्तुत नाहीं, परंतु झालेल्या घटनांची साखळी अशी होती हें स्पष्ट आहे.

## आम्ही सहभागी आहों

याचवेळीं नव्या नव्या राज्यघटनेच्या योजना राष्ट्रापुढें मांडल्या जाऊं लागल्या, त्यांचा स्वीकार, धिक्कार, यांची चर्चा सुरू झाली, यामुळें साऱ्याच राजकारणाला विलक्षण वेग आला होता, स्वातंत्र्य व फाळणी यांच्या चर्चेला ऊत आला. निदान फाळणीनें तरी या प्रश्नाची सोडवणूक व्हावी म्हणून कॉंग्रेस पुढाऱ्यांनी फाळणीला मान्यता दिली. ज्या तत्वावर लीगनें देशाची फाळणी

मागितली तच तत्व उलटवून काँग्रेसनें प्रांतांच्या फाळणीची मागणी केली. जातीय मतदार संघ जाण्याची शक्यता तरी होती पण त्या मागणीचे फलित म्हणून जातीय पायावर फाळणी ही अधिक धोक्याची व कायम स्वरुपाची होणार होती. स्वतः महात्माजी याबाबत म्हणाले कीं "धार्मिक पायावर प्रांतांची निर्मिति करण्याचा परिणाम कदाचित ब्राह्मणीस्थान, द्रविडीस्थान अशीं 'स्थाने' निर्माण करण्यांत आणि जातीय तेढीला एक प्रकारचें शाश्वत स्वरूप देण्यांत होईल." (पाटणा येथील भाषण). तरीसुद्धां या प्रश्नानें इतकें गंभीर भीषण स्वरूप धारण केलें नव्हतें. सरदार पटेल म्हणाले "ज्या गोष्टी ईश्वरानेंच अखंड निर्माण केल्या आहेत त्या कोणत्याहि कारणामुळें कायमच्या दुभंगल्या जाऊं शकत नाहीत." हाच आशावाद साऱ्या जनतेच्या अंतःकरणांत होता. त्यांचा आपल्या नेत्यावर विश्वास होता. पण शेवटीं फाळणीला मान्यता मिळाली, सिल्हेट, सरहद्दप्रांत, पंजाब यांची तड लागली. दि. १५ ऑगस्ट १९४७ला रात्रीं घोषणा होऊन स्वतंत्र हिंदुस्थान जन्माला आला. पाकिस्तानचे बारसें झाले. त्याचवेळीं पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनीं आश्वासन दिले कीं, जे दुर्दैवानें आमच्यापासून तोडले गेले आहेत ते बांधव आमचेचे आहेत, आमचेच राहातील आणि कांहींहि घडले तरी त्यांच्या सुखांत आणि दुःखांत आम्ही सहभागी राहूं. येथपर्यंतहि परदेशी झालेल्या आपल्या बांधवांना क्षितिजावर जमणाऱ्या काळ्या मेघराशींची कल्पना आली नव्हती. कोणीहि निर्वासित झाले नव्हते. फाळणीच्या छायेंतहि मनांत आशा वागत होती. स्वातंत्र्याची घोषणा झाली आणि भारतीय इतिहासाच्या एका नव्या कालखंडांत हिंदुस्थाननें प्रवेश केला.

## फाळणी व स्थलांतराची कल्पना

तत्पूर्वी झालेल्या जातीय दंगलींच्या आगींत राष्ट्राच्या सीमा ठरतांच तेल आतल्यासारखें झालें. इतके दिवस स्वमवत् मानलेली फाळणी प्रत्यक्षांत आली. १७ ऑगस्ट ला दोन्ही राष्ट्राच्या सरहद्दी निश्चित झाल्या. हें कार्य करणाऱ्या रॅडक्लिफ समितीवर दोन्ही राष्ट्रांचे प्रतिनिधि काम करीत होते. या समितीचा

निर्णय दोन्ही राष्ट्रांनीं मानला आहे. याचवेळीं एक गोष्ट लक्षांत घेणें अवश्य आहे. श्री. जिना यांनीं लोकसंख्येच्या अदलाबदलीचा प्रश्न निर्माण केला होता. पण इतक्या गंभीरपणाने त्या प्रश्नाकडे पहाण्याची आवश्यकता दोन्ही पक्षांना वाटली नाहीं. कालचे शेजारी आज एकमेकांचे हाडवैरी बनतील यावर कोणाचा विश्वास बसणेंच शक्य नव्हतें. श्री. जिना यांनीं मुस्लीम लीगच्या १९४० च्या पाकिस्तानच्या ठरावापासून लोकसंख्येच्या स्थलांतराला विरोध केला होता. परंतु बिहारमधील दंगलीनंतर त्यांनीं ती कल्पना कराचीस जाहीरपणानें उचलून धरली. तथापि तथाकथित 'त्यांच्या' सहा प्रांतांतील हिंदु बहुसंख्य असलेल्या पूर्वबंगालवार त्यांचा हक्क सिद्ध करण्याकरितांच हा पाठिंबा होता. कारण त्या वेळीं (स्वातंत्र्या-पूर्वी) देशाची फाळणी कां प्रांतातून लोकसंख्येची अदलाबदल असा प्रश्न श्री. जिना व इतर राजकीय नेत्यांच्या पुढे होता. कांहींहि असलें तरी केवळ फाळणी मुळें दोन शेजारीं एकमेकांचे गळे कापतील अशी कल्पनाच कोणाला नव्हती. इतकेंच काय तेथील लोकांनी दिलेल्या माहितीवरूनच असे म्हणावेसे वाटते कीं, खुद्द त्यांची त्यांनाच कल्पना नव्हती.

## परस्पर विश्वास

पाकिस्ताननें अल्पसंख्यांकाना असा विश्वास दिला होता की, ज्यांना जायचे असेल त्यांनी खुशाल जावे, त्यांना मुळींच बंदी नाहीं, व ज्यांना राहायचे असेल त्यांच्या सर्व प्रकारच्या पालनाची व रक्षणाची जबाबदारी राष्ट्र घेईल. गांधीजींवरील श्रद्धा, आपापल्या नेत्यांवरील विश्वास यामुळे लोकसंख्येच्या अदलाबदलीच्य प्रश्नाला कोणींच मानले नाहीं. अशी वेळ येईल अशी अपेक्षाच नव्हती. परस्परांवर थोड्या प्रमाणांत कां होईना विश्वास होता. याला पुरावा एकच म्हणजे स्वातंत्र्या-पूर्वीं स्थलांतर करणारे गट कोणते याचा विचार करणे हा होय. पाकिस्तानां-तून हिंदुस्थानांत येणाऱ्या मध्यें मनांत किंचित भीति वाटल्यानें व आपल्या उद्योगधंद्याला पुष्कळ वाव मिळेल अशा अपेक्षेनें येणारे मध्यमवर्गीय व उच्च वर्गीय लोकच होते. हे लोक बहुशः विमानानें आपली बँकांमधील खातीं बदलून घेऊन येत होते. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतून पाकिस्तानांत गेले

मुसलमान गट जर आपण पाहिले तर हें लक्षांत येईल कीं, पाकिस्तानच्या धर्मराज्याच्या तत्वावर अमर विश्वास अगर हिंदुस्थानांत आपल्या जीविताची सुरक्षितता स्वातंत्र्यानंतर राहणार नाहीं म्हणून जाणारे मुसलमान कितीसे होते ? उलट, नवे राष्ट्र जन्माला येत आहे त्याच्या आशेत गुंतलेल्या भारतीय मुसलमानांना नव्या नोकऱ्या, पाकिस्तानांतील मोठे पगार, नवीं क्षेत्रे, नवें राज्य याचा भौतिक मोह पडला व म्हणून त्यांनीं बिस्तरे बांधायला सुरुवात केली. पाकिस्तानांत नोकरीचाकरींचे कांही स्वर्गीय प्रमाण नाही, हें पहातांच परत येणारे शेकडो मुसलमान हेच सिद्ध करीत आहेत. यावरून हे स्पष्ट होईल कीं, १५ ऑगस्टपूर्वी विमानातून हिंदुस्थानात आलेले उच्चवर्गीय हिंदू व भारतांतून आशेनें पाकिस्तानात गेलेले मुसलमान हे दोन्ही निर्वासित नव्हेत.

ह्याच वेळीं सरकारने योजना करून स्थलांतराची व्यवस्था केली असती तर झालेल्या घटना टाळतां आल्या असत्या, असे म्हणणारा एक पक्ष आहे. याचा विचार करितांना हें विसरतां येणार नाहीं कीं, या कल्पनेच्या मागे असलेले तत्व असें होतें कीं, हिंदू आणि मुसलमान यांची दोन स्वतंत्र राष्ट्रे झालीं. एका रात्रींत शेजारचा पंजाबी मुसलमान परकीय ठरला. पंजाबी हिंदूवर भीषण आपत्ति आली असून त्याला आपल्याकडे घेतला पाहिजे ही भावनाच प्रथम मुळीं नव्हती. दोन्ही देशांत थोड्या फार प्रमाणांत विश्वास होता. सरकारनें योजना केली असती तर मुर्गीच्या बदली मुर्गी मिळेल अशा तत्वावर, व शांततेने संपात्ति आणली जाईल या आशेनें व नव्या देशांत, आपल्या देशांत चला अशा भावनेने लोक कदाचित आले असते. पण युगानुयुगे धरणीवर प्रेम करणारे लोक आपला भूभाग 'वतन' सोडून द्यायला कितपत तयार झाले असते याची शंकाच आहे. अशा घडवून आणलेल्या स्थलांतरानें परस्पर संशय व दुजाभाव वाढला यांत आश्चर्य काय ? शिवाय असे स्थलांतर शांततेने पार पाडतां आले असते याचा काय भरंवसा ? कारण राष्ट्रसंघाच्या दृष्टीखालीं झालेल्या अशा सर्वच प्रयत्नांना यश आले आहे असे नाहीं. पण दंगलींची ही सांखळी दिवसेदिवस वाढत गेली आणि स्थलांतर अपरिहार्य झालें.

# दंगलीपासून यादवीपर्यंत

## यादवीचीं रणक्षेत्रें.

पाकिस्तानच्या मागणीमधून निर्माण झालेले दंगे शेचाळीस सालच्या अखेरी अखेरीला कमी होऊं लागले होते. त्या साऱ्या दंगलीच्या मागें पाकिस्तान मिळवावयाचे ही ईर्षा होती. पण ऑगस्ट १९४७ च्या सुमाराला झालेले दंगे पाकिस्तान मिळालें या वृत्तीचे निदर्शक होते. शेचाळीसची अखेर व सत्तेचाळीसचे पहिले दोन महिने दंगल विझू लागल्यासारखे वाटत होते. परंतु लगेच पंजाब पेटला आणि वणव्याचा वेग वाऱ्यानें वाढवावा त्याप्रमाणें बघतां बघतां जातीयतेच्या ज्वालांनीं पंजाबचा निसर्गसमृद्ध प्रांत वेढून टाकला. या दंगलींत पंजाबचा पहिला बळी पडला व पाठोपाठ ही आग सरहद्द प्रांत, बलुचिस्तान भावलपूर वगैरे भागांत पसरली. ऑक्टोबरपर्यंत या दंगलीनें इतकें भीषण स्वरूप धारण केलें कीं, त्याला भारतीय इतिहासांत तोड सांपडणें कठीण आहे. ही आग सिंध व बंगालमध्यें पुष्कळ उशीरा पोहोचली. परंतु तोंपर्यंत या समस्येची थोडी फार कल्पना व कटु अनुभव आल्यानें सिंध व बंगाल प्रांतांत दंगलीची उग्रता पुष्कळच कमी होती. भावलपूर, शेखपुरा यासारख्या विभागांत पहिल्या कालखंडांत क्रूरतेची कमाल झाली. साऱ्या दंगलीला काबूत आणण्याचे प्रयत्न फार थोड्या प्रमाणांत यशस्वी झाले. दंगलीच्या उत्तरार्धांत यादवीला ओहोटी लागली याचें मुख्य कारण हे कीं, जातीय दंगलीचें भक्ष्य म्हणजे अल्पसंख्य

जमाती यांना संरक्षण मिळालें किंवा त्यांनीं मिळेल त्या साधनांनीं स्थलांतर केलें. म्हणजे दंगेखोरांत फारसा बदल झाला नाहीं, पण त्यांच्या दंगेखोरीची साधनें व भक्ष्यें दोन्हीं नाहींशीं झालीं. या दंगलीची वाढ व तिचे वाढणारे स्वरूप जर निरखून पाहिलें तर एक गोष्ट पुन्हा पुन्हा प्रत्ययाला येते. माणसे सुसंस्कृत दिसतात, याचें कारण त्यांच्या असंस्कृतपणाला संधि मिळत नाहीं हेंच होय. थोडासा जरी वाव मिळाला तरी शेकडों वर्षें प्रयत्न करून उज्ज्वल केलेल्या मानवी संस्कृतीची, झिलई निघून जाते आणि पाशवी रक्ततृष्णेचें नागडें स्वरूप चटकन् समोर उभे राहतें. दोन्ही सरहद्दींतील दंगेखोरांची स्थिति अशी आहे. या दंगलींनीं मुख्यत: थैमान घातलें तें पंजाब, सरहद्द प्रांत, बलुचिस्तान ( कांहीं प्रमाणांत ) पंजाबी संस्थानें यांमध्यें. यांत पंजाबच्या भागांत याचें तीव्रतम स्वरूप दिसलें. त्या मानानें सिंध व बंगालची परिस्थिति पुष्कळच संयमित राहिली.

संयुक्त बंगालमध्यें हिंदूंची लोकसंख्या सुमारें ४५% पेक्षां जास्त होती. परंतु प्रथमपासूनच बंगालच्या इतिहासांत उग्र स्वरूपाच्या जातीय दंगलीना फारशी जागा नव्हती. पंजाबची झळ लागली तरी सुद्धां मुळांतच लोकांची वृत्ति अशा उठावणीला फारशी अनुकूल नव्हती. तरीहि थोड्या अवधींत तिथेहि जातीय वृत्ती फोफावली. सिंधमध्यें हिंदूंची लोकसंख्या सुमारे २७% होती. पूर्वीच्या शिरगणतीप्रमाणे सिंधी हिंदू १३$\frac{1}{2}$ लक्ष होते. १९४७ च्या आसपास ते १५ लक्ष पर्यंत असावे असा अंदाज केला जातो. सिंधी हिंदूमध्यें, शहरांमधून आढळणारे क्रोडोपति फारच थोडे, परंतु सर्वसामान्य सिंधी हिंदू हा इतर प्रांतातील कोणत्याहि सर्वसाधारण हिंदूपेक्षां अधिक सुस्थितींत होता असे म्हणायला हरकत नाहीं. बंगालमध्यें स्थलांतराच्या व दंगलीच्या प्रश्नानें पंजाबाइतके क्रूर स्वरूप घेतले नाहीं. पण सिंधमध्यें थोडासा त्रास होत होता. सिंधमधील सामान्य हिंदू हा व्यापारी पेशावर जगणारा होता. भावलपूर, सरहद्द प्रांत व प. पंजाब यामध्येंच अधिक गंभीर परिस्थिति निर्माण झाली. पंजाबमध्यें जमीनदार असा सुमारे ५० लक्ष जाटांचा वर्ग आहे. यांत $\frac{१}{२}$ मुसलमान $\frac{३}{८}$ हिंदू व $\frac{१}{८}$ शीख आहेत. सामान्य धंदा शेती आहे,

म्हणजे जमीनदार, शेतावर काम करणारा मोलकरी व स्वत:ची जमीन कसणारा शेतकरी असे पूर्वीच्या शिरगणतिप्रमाणे सुमारे ६५% लोक शेतीवर जगणारे आहेत. जमीनदार बहुधा जाट आहेत. (यांत हिंदूजाट, मुसलमानजाट वगैरे प्रकार आहेत) हिंदू, शीख, मुसलमान या शिवाय रजपूत, जाट, गुजर वगैरे पोट जाती आहेतच. लोकसंख्येचे प्रमाण, भौगोलिक परिस्थिति, मानसिक घडण या साऱ्या गोष्टींची कारणपरंपरा या स्थितीच्यामागें आहे.

जी गोष्ट पंजाबची, तीच थोड्याफार प्रमाणांत सरहद्द प्रांताची. सरहद्द प्रांतामध्यें सामाजिक वृत्ति थोडी वेगळी आहे इतकेच. आजपर्यंत दोन विरोधी गटांच्या सरहद्दीवर राहण्याचे या प्रांताच्या नशिबांत आहे. ही हद्द ओलांडली की पंजाब प्रांत लागतो. हिंदुस्थानच्या आजपर्यंतच्या इतिहासांत पंजाबला 'बफर स्टेट'चे रंगरूप आलें आहे. आलेल्या बहुतेक हल्ल्यांना पंजाबने आपल्या छातीवर झेलले. पंजाबनंतर त्याची झळ इतर प्रांतांना लागत असे. ज्यास्तीत ज्यास्त सैनिक व शेतकरी पुरवणाऱ्या या प्रांताला दंगल कांहीं नवी नाहीं. इतिहासांतील कैक पानें त्यानें रंगलीं आहेत, पण प्रत्येक वेळी सशस्त्रांच्या विरुद्ध सशस्त्र असा तो झगडा होता. शांततेच्या ब्रिटिश राज्यानंतर सशस्त्रांनीं निशःस्त्रांची केलेली कत्तल असे स्वरूप स्वातंत्र्यानंतरच्या या दंगलीनाच आहे.

## दंगलीमागील मनोवृत्ति

सत्तेच्या समतोलपणाकरितां कधीं या जातीला तर कधीं त्या जातीला उचलून धरण्याच्या ब्रिटिश मुत्सद्दिगिरीमुळे हिंदू व शीख यांचेहि संबंध फार प्रेमाचे होते असे म्हणवत नाहीं. परिस्थितीचा परिणाम म्हणून निर्माण झालेली लढाऊ, भांडखोर, भावनाशील वृत्तीहि यांत असेल. पण दंगलीच्या मागे असणारी मुसलमानांची वृत्ति मात्र अभ्यसनीय आहे. त्यांच्या मनाचे जर विश्लेषण केलें तर असें दिसून येईल कीं, गेलीं कांहीं वर्षे त्यांच्यांत इस्लामी धार्मिक व जातीय भावना चेतवली जात होती. ज्यावेळीं या भावनेनें पाकिस्तानची मागणी केली त्यावेळीं व त्यानंतर 'प्रत्यक्ष चळवळी' पर्यंत मुसलमानांना जवळजवळ धर्मयुद्धाकरितां पिसाट करण्यांत आले होते. यामुळें सामान्य मुसलमानांची

अशीहि अपेक्षा असेल कीं, या साऱ्या राजकारणाचा शेवट 'जिहाद' मध्यें होईल. या मनोवृत्तीचा कैफ त्यांना चढत होता. या विषारी वृत्तीला लीगनें आपल्या जहाल व कटु भाषणांनीं पाणी घातले होते. आपल्या उपेक्षेनें व क्वचित विरोधानें त्याला कुंपण मिळाले व हा विषवृक्ष फोफावत गेला. त्याचप्रमाणें पाकिस्तानच्या प्राप्तिकरितां काय करूं न करूं असे झालेल्या उतावळ्या लोकांना मिळालेले पाकिस्तान हें अगदीं अकल्पित होतें. संकल्पाच्या मानानें पाकिस्तान मिळवण्याकरितां फारसे श्रम पडले नव्हते. तेव्हां त्या तयारीची खुमखुम होतीच. कदाचित १५ ऑगस्ट १९४७ नंतर, 'आतां आमचे राज्य झाले, आम्ही पुन्हा राज्यकर्ते झालों' ही मध्ययुगीन वृत्ति त्यांच्यांत सळसळूं लागली असेल, हे राज्यकर्तेपण कसें प्रगट करायचे, लोकांना कसें जाणवून द्यायचे हेंच त्यांना आकलन होईना. शेवटीं सांहांजिकपणेंच आंत सांठवलेल्या साऱ्या वृत्तींना वाव मिळतांच त्याचा स्फोट दंगलींत झाला.

प्रतिकारार्थ म्हणा अगर तत्व म्हणून हिंदूमध्येहि या वृत्तीनें मूळ धरले होते. शीखांचा धार्मिकपणा, रा. स्व. संघाचे कार्य या साऱ्या गोष्टींनी त्याला पालवी फुटली. ज्या वेळीं कृपाण काढून घोषणा केल्या, त्यावेळचे मास्टर तारासिंगांचे असेंब्लीतील नाट्यपूर्ण भाषण कोण विसरेल ? निश्चितपणानें अखंड-भारतवादी असून व तपशीलांत झुकतां कांटा देऊन सुद्धां ऐक्य व राष्ट्रहित साधावे असा हिंदू राजकीय वारा होता. या साऱ्या तयार असलेल्या ज्वाला-ग्राही परिस्थितीवर 'प्रत्यक्ष चळवळी'नें आग ओतली आणि पंजाबाची शांतता ढळली.

लौकरच उलटसुलट बाजूनीं हालचाली होऊं लागल्या. दंग्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच गेलें. अमृतसर, लाहोर, येथें एकामागून एक आगीचे लोळच्या लोळ उठूं लागले. निरनिराळ्या राजकीय योजनांचा स्वीकार, धिक्कार यामुळें साऱ्या हालचालींना एकप्रकारचा वेग आला होता. — त्या तंग वातावरणात — जनतेचा मानसिक तोल जात चालला होता. त्यामुळेंच या दंगलीचे स्वरूप बदलत जाऊन तिचे योजनाबद्ध यादवींत रूपांतर होऊं लागले. लोकसंख्येच्या अदलाबदलीची सरकारी योजना जरी झाली नाहीं तरी ज्या लोकांना साऱ्या

घटनेचा वास लागला होता त्यांनीं आपणहूनच १५ ऑगस्टपूर्वीं स्थलांतर कां केले नाहीं ? असा प्रश्न विचारला जातो. पण वर निर्देशिलेल्या घटना हेच दाखवतात कीं, दंगलीनें यादवीचे स्वरूप ऑगस्टनंतर घेतलें. त्याच्या आधीं चाललेली दंगल लोकांना फारशी नवी नव्हती, रूप जरा भडक होते इतकेंच. लोकांची अपेक्षा अशी होती कीं, दंगल होईल, फार तर मोठ्या प्रमाणावर होईल, पण घरदार सोडून पळावे लागेल, अशा यादवीची कल्पना सीमेवरील कांहीं खेडीं सोडल्यास कोणालाच नव्हती. पंधरा ऑगस्टपूर्वीं स्थलांतर करणारे लोक आर्थिक दृष्ट्या वरच्या वर्गांतले होते. शहरांतून शहरांत आलेले ते लोक होते – लाहोर ते दिल्ली !– ते शरणार्थी नव्हेतच, खालच्या थराला ही यादवीची अपेक्षा नव्हती म्हणूनच त्यांच्यांत स्थलांतराचें प्रमाण पंधरा ऑगस्टपूर्वीं फार कमी आहे.

## वाऱ्याची दिशा समजली.

पाकिस्तानी प्रदेशांत १५ ऑगस्टपूर्वीं दंगे चालूच होते, पण यादवी नव्हती. नौखाली, टिप्पेराचे अत्याचार, त्याची बिहार युक्तप्रांतांतील प्रतिक्रिया, त्याची झळ लागून पंजाब व सरहद्दी सुभ्यामध्यें पेटलेलीं खेडीं, ही साखळी पाहिली म्हणजे दंगलीचे यादवींत परिवर्तन कसें होत गेले हें स्पष्ट होईल. दंगल म्हणजे, एकाएकीं भावनेच्या आहारीं जाऊन थोड्या काळपर्यंतच चालणारी केलेली हिंसा, असे म्हटले तर ज्यावेळीं त्यांत पूर्वनियोजन व दीर्घकाल हे दोन घटक येतील त्या वेळीं त्या दंगलीचे यादवींत रूपांतर होईल. पंजाब व सरहद्द प्रांतांत यादवीचा सुरुंग भरला जात होता. " आम्ही काडतुसे तयार करून ठेवली होतीं " ( सरहद्द प्रांत ) व ' अमृतसरच्या उधमसिंगानें शेदोनशें घोडेस्वार तलवारी देऊन तयार केले होते ' ( पंजाब ) अशी माहितीहि मिळते. दंगलीला यादवीचें स्वरूप येत चालले त्या वेळींहि सामान्य हिंदूला अगर मुसलमानाला वारे कोणत्या दिशेनें वाहात आहेत हे कळले होते, पण त्याच्या वेगाची कल्पनाच आली नाहीं. तयारी होत होती ती मोठ्या दंगलीची--यादवी युद्धाची--नव्हे. तशी अपेक्षाहि नव्हती. खूप दंगा होईल, शीख प्रतिकार करतील, हिंदू झगडतील, पण पुन्हा सर्व स्थिरस्थावर होईल असे वाटत होते. पण एकदां प्रवाहांत

सांपडल्यावर स्वतःचा वेग आवरणें मुसलमान, पाकिस्तानी पोलीस, सैनिक कोणालाच शक्य झाले नाहीं व अल्पावधींत दंगलींतून यादवीचें भीषण तांडव सुरू झाले.

## यादवीच्या पायऱ्या


प्रथम एखाद्या खेड्यांत दंगा होई. अल्पसंख्य हिंदू कुठे तरी जमा होत. दंगेखोर विजयी वीर दुसऱ्या खेड्यावर चालून जात. जागोजागचे पराभूत अल्पसंख्य कुठें तरी कळप करून रक्षणाचा अयशस्वी प्रयत्न करीत. याप्रमाणें शहराच्या राजकारणांतून आलेली आग खेड्यांपर्यंत पोचली. नंतर खेड्यांतून सुरू होऊन शक्यतेच्या मर्यादेपर्यंत पसरली. ही आगीची लाट पसरली आणि ओसरली. आज खालीं फक्त रांगोळी उरली आहे. प्रथम आपले खेडें, मग शेजारचे खेडे, मग शरणार्थी एकत्र आले. ते असंरक्षित छावणींत गेले. तिथें जाळपोळ झाली आणि उत्तरार्धांत दंगेखोर इतके बेहोष झाले कीं, त्यांची मजल दिल्ली सैन्याच्या रक्षणाखालील निर्वासित छावणीवर हल्ला करणें, राजरोस आगगाड्या लुटणें वगैरे पायऱ्या ओलांडून हिंदी सीमेच्या आंतील खेड्यावर हल्ला करण्यापर्यंत ती पोचली.

या साऱ्या दंगलींत मुसलमान गुंडांना मोकळे रान मिळालें, पाकिस्तानी पोलीस व सैनिकांनीं क्वचित ठिकाणीं त्यांना मदत केली तर पुष्कळशा ठिकाणीं सहानुभूतिपूर्वक दुर्लक्ष केले. लष्करांतून परतलेले शिपाई, रानटी टोळ्या, या सर्वांनीं यांत हात धुवून घेतले. दुःखाची गोष्ट ही कीं, भारतीय सैन्य व पोलिसांतहि ही वृत्ति अगदीं क्वचित अपवादानें सांपडली. मात्र भारतीय सैन्यदलानें, निर्वासिताकरितां केलेल्या महान कार्याकडे पहातां ते उपेक्षणीय समजावें, इतके अत्यल्प आहे. पाकिस्तानी अधिकाऱ्यानें मदत केली असल्याचे एक ठसठशीत उदाहरण मला मिळाले. इतरहि कांहीं असतील. पाकिस्तानी हद्दींत अल्पसंख्याकांवर जे जुलुम झाले, अत्याचार घडले, धर्मांतरें झालीं, बलात्कार झाले, त्यांची कहाणी शब्दांनीं सांगण्याच्या पलीकडे आहे. सिंध आणि बंगालमध्यें असे प्रकार जवळजवळ नाहींत. त्यांचा सारा भर पंजाब व सरहद्द प्रांत, भावलपूर या प्रदे-

शांत होता. आर्थिक नुकसान, कुटुंबसंस्थेचे सामाजिक नुकसान याकडे आपण कांहीं काळ दुर्लक्ष केलें तरी गुंडांनीं जे पाशवी–पाशवी म्हणणेंहि चुकीचे ठरेल. कारण त्या गुंडांच्यापेक्षां पशुसुद्धां सुसंस्कृत आहेत–अत्याचार केले त्याकडे डोळेझांक करणें अशक्य आहे.

आर्थिक व सामाजिक नुकसानीपेक्षांहि या अत्याचारामुळें निर्वासितांच्या मनाचा जो तोल ढळला आहे, त्यांचे जे मानसिक नुकसान झालें आहे ते भरून येणे अशक्य आहे. लहान मुले हे कांहीं काळाने विसरूं शकतीलहि कदाचित; पण पुरुष — ज्यांच्या डोळयांदेखत त्यांच्या घराण्याचे सौभाग्य ओढले गेले ते हे विसरतील कां ? विशेषतः स्त्रिया–ज्या कुलस्त्रियांनी पदा न ओढतां घराबाहेर कधीं पाऊल टाकले नव्हते—त्यांच्या शरिराची जाहीर विटंबना कशी विसरावी ? आणि अपहृता ? अनाथ निराधार मुलें ? यांच्या कथा ऐकून दगडाचे पाणी होईल, ते विसरणे मानवी अंतःकरणाला शक्य आहे का ? मात्र असे अमानुष प्रकार मोठ्या प्रमाणावर कांही ठराविक जिल्ह्यांतच झाले. शेखपुरा हा त्यांत अग्रगण्य आहे. आणि एक गोष्ट महत्वाची आहे ती ही कीं, इतरत्र पुष्कळदां प्रत्यक्षापेक्षां अधिक सांगितले गेले. क्रूर घटनांना कल्पनेची कल्हई लागली आणि नव्या नव्या गोष्टी प्रचलित होऊं लागल्या. पण या साऱ्या यादवीचा एक परिणाम झाला. लोकांनी देशांतराकरिता पाऊल उचलले.









छावणींतील दृश्यें







छावणींतील दृश्यें

# शोकयात्रा

" कालचा दोस्त आज दुष्मन झाला. समोर क्षितिजाच्यापाशीं भारतीय सीमा आहे. काय आहे तिथें ? माती पेरली तर सोनें फुलेल अशी समृद्ध जमीन सोडून आम्ही निघालो आहों. क्षणभर वाटतें, असेंच मागें वळावें आणि धांवत परत जावें. मागें मान फिरवली आणि पाहिलें तों मागोमाग घरचा कुत्रा येत होता. पोट खपाटीला लागले होते. माणसांनाच खायला नाहीं तर त्याला कोठलें ? कुत्रा पाठोपाठ आला. खरा दोस्त. पण माणसें मात्र माणुसकी विसरली. कुठें जायचें तरी मागें उध्वस्त स्मशान आहे आणि पुढें काय आहे, एक देवालाच ठाऊक."

लोकांनीं दंगलीच्या अपेक्षा बाळगलेल्या होत्या, क्वचित उधमसिंग ( अमृतसर ) सारख्या लोकांनीं तयारीहि केली असेल. पण कायमच्या स्थलांतराची स्वप्नें कोणालाच पडत नव्हती. पुढाऱ्यांच्यावर विश्वास, पाकिस्तानची आश्वासनें, साऱ्यांचा आधार वाटे. परंतु याला धक्का देऊन यादवीला वेग आला. खेड्याखेड्यांतून आग पेरली गेली आणि स्थलांतराकरितां पहिलें पाऊल टाकलें गेलें.

## पहिलें वर्गीकरण

स्थलांतराचा विचार करतांना प्रथमच एक गोष्ट विचारांत घ्यायला हवी. ती म्हणजे स्थलांतराचे कालमानानें वर्गीकरण. त्यांत स्वातंत्र्यघोषणा होण्यापूर्वीचे म्हणजे १५ ऑगस्ट पूर्वीचें स्थलांतर. १५ ऑगस्ट ते चार सप्टेंबरला सरकारी व्यवस्था होईपर्यंतचे स्वयंस्फूर्त स्थलांतर ( Exodus. ) व चार सप्टेंबरनंतरचे योजनाबद्ध स्थलांतर ( Evacuation ) असे त्याचे तीन भाग पडतात. यापैकीं १५ ऑगस्टपूर्वीं ज्या लोकांनीं स्थलांतर केलें ते लोक आर्थिकदृष्ट्या वरच्या वर्गांतले होते. आपल्याला पाकिस्तानांत वाव मिळणार नाहीं ही भीति व भारतांत आशा यांमुळें हे धनिक बहुशः विमानानें भारतीय सरहद्दीकडे झेप घेत. परंतु हें स्थलांतर एका शहरांतून दुसऱ्या शहरांत येवढेंच असे. बँकेंत असलेले खातें बहुधा बदलून घेतलेले असे. जेवढे वरकड सोनें नाणें असें तेंहि आणण्याचा प्रयत्न केला जाई. स्थलांतरामधील या पहिल्या गटांत व स्थलांतर संघटित झाल्यावर अगदीं शेवटच्या शेवटच्या गटांत नुकसान टाळण्याचा शक्यतों अधिक प्रयत्न केला गेला. ह्या पहिल्या विभागांत धनिकांनीं आपल्या पैशाचा उपयोग करून हीं प्रवाससाधनें उपलब्ध करून घेतलीं. प्रत्यक्ष रुपये, आणे, पै मध्यें हिशोब करावयाचा तर धनिक गटामध्यें जास्त नुकसान झालें आहे. कारण त्यांचें नुकसान हजारांनीं व लाखांनींच मोजायचे. परंतु दुसऱ्या गटामध्यें सरकारी दृष्टीनें त्यांचें नुकसान कमी असलें तरीहि त्या मुख्यतः खालच्या वर्गांतल्या लोकांचें यांत सर्वस्व गमावलेलें आहे. स्थळांतराच्या या गटांतहि त्यांना बरोबर कांहीं नेणें अशक्य-प्रायच होते. ज्यांनीं कांहीं आणण्यचा प्रयत्न केला ते कोठें लुटले गेले, लुबाडले गेले, पाकिस्तान सीमेवर तपासणी म्हणून, जकात म्हणून घेतले गेले. ते कांहींहि असले तरी या १५ ऑगस्टनंतरच्या स्थलांतरांतील गटांत पश्चिम पंजाब, सरहद्द प्रांत, क्वचित काश्मीरकडील भाग यांतून जे निर्वासित आले ते सर्वस्वी आर्थिक दृष्टीनें भिकारी बनूनच आले. कानांतल्या सुवर्ण कुंडलासाठीं कान तोडायला किंवा दागिन्याकरितां स्त्रियावर हात टाकायला मागेपुढें पाहिलें गेले नाहीं. पहिल्या गटांतील लोकांची संपत्ति मुख्यतः बँक व सोनेंनाणें यांतच होती.

प्रत्यक्ष घरेंदारें, कारखाने, दुकानें यांचें जे कांहीं नुकसान झालें असेल तेवढेंच धनिक वर्गाचें नुकसान, पण या खालच्या वर्गातल्या लोकांच्या जवळची अपुरी धनसंपत्ति वेगळ्याच स्वरूपाची होती. ज्यांची संपत्ती म्हणजे कणगीतलें धान्य, पुष्ट जनावरें, फार तर खळींत पुरलेले पैसे आणि सुजला, सुफला अशी जमीन. त्यांनीं ही संपत्ती बरोबर कशी आणायची; १५ ऑगस्टपासून ते ४ सप्टेंबर-पर्यंत आलेल्या या असंख्य निर्वासितांचा हा प्रश्न होता. जे थोडेफार घेता आले ते लुटले गेल. त्यांनीं आपली संपत्ति, वैभव, सारे सारे मागे सोडले आहे आणि त्यांच्याजवळ त्यांचे फक्त अस्तित्व आहे. त्यामुळें १५ ऑगस्टनंतर निर्माण झालेला प्रश्न हा निर्वासितांचा प्रश्न आहे. तत्पूर्वी आलेल्या लोकांना या अर्थानें निर्वासित म्हणतां येणार नाहीं.

## गट दुसरा

### स्वयंस्फूर्त स्थलांतर

१५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबरपर्यंतच्या या काळांतले व पुढें कांहीं दिवस घडणारे स्थलांतर हें लोकांचे स्वयंस्फूर्त व असंघटित असे स्थलांतर होतें. सर्वस्व गमावलेले लाखों निर्वासित आपले क्षीण डोळे भारतीय सीमेकडे लावून मैलों-मगून मैल पायीं तुडवत आले. सर्वांत कठिण असा हा कालखंड होता. त्यांना कोणाची मदत नव्हती, कोणाचे संरक्षण नव्हते. बहुधा सारे पायदळी काफिले असत. असंख्य हतभागी माणसें एकत्र येत व आसऱ्याच्या शोधार्थ रानोमाळ चालू लागत. वाटेंत लुटालूट, पळवापळवी होई; पण गेले ते गेले असे समजून पाय उचलायचा. वाटेंत हल्ल्यामध्ये जखमी होत. कोणी आजारी असत, शक्य तिथ-पर्यंत त्यांना न्यायचे, त्यांची काळजी करायची. नाहीतर तिथेच परमेश्वराच्या स्वाधीन म्हणून सोडून द्यायचे. प्रेतें तशींच टाकायची आणि पुढें चालू लागायचे. असंघटित स्थलांतर हा साऱ्या शोकयात्रेचा पूर्वार्ध आहे. पुष्कळसे स्थलांतर या भागांत पायींच झाले. बैलगाड्या, घोडे असत. शक्य तितकीं जनावरें जीं नेतां येतील तीं सारी तांड्याच्या पुढें घालायचीं, मग बैलगाड्या, बायका पोरें म्हातारे, सारे पायी निघत. साधारणपणें प्रत्येक तांड्यांत सात हजार माणसें

## पहिलें वर्गीकरण

स्थलांतराचा विचार करतांना प्रथमच एक गोष्ट विचारांत घ्यायला हवी. ती म्हणजे स्थलांतराचे कालमानानें वर्गीकरण. त्यांत स्वातंत्र्यघोषणा होण्यापूर्वीचे म्हणजे १५ ऑगस्ट पूर्वीचें स्थलांतर. १५ ऑगस्ट ते चार सप्टेंबरला सरकारी व्यवस्था होईपर्यंतचे स्वयंस्फूर्त स्थलांतर ( Exodus. ) व चार सप्टेंबरनंतरचे योजनाबद्ध स्थलांतर ( Evacuation ) असे त्याचे तीन भाग पडतात. यापैकीं १५ ऑगस्टपूर्वीं ज्या लोकांनीं स्थलांतर केलें ते लोक आर्थिकदृष्ट्या वरच्या वर्गांतले होते. आपल्याला पाकिस्तानांत वाव मिळणार नाहीं ही भीति व भारतांत आशा यांमुळें हे धनिक बहुश: विमानानें भारतीय सरहद्दीकडे झेप घेत. परंतु हें स्थलांतर एका शहरांतून दुसऱ्या शहरांत येवढेच असे. बँकेंत असलेले खातें बहुधा बदलून घेतलेले असे. जेवढे वरकड सोनें नाणें असें तेंहि आणण्याचा प्रयत्न केला जाई. स्थलांतरामधील या पहिल्या गटांत व स्थलांतर संघटित झाल्यावर अगदीं शेवटच्या शेवटच्या गटांत नुकसान टाळण्याचा शक्यतों अधिक प्रयत्न केला गेला. ह्या पहिल्या विभागांत धनिकांनीं आपल्या पैशाचा उपयोग करून हीं प्रवाससाधनें उपलब्ध करून घेतलीं. प्रत्यक्ष रुपये, आणे, पै मध्यें हिशोब करावयाचा तर धनिक गटामध्यें जास्त नुकसान झालें आहे. कारण त्यांचें नुकसान हजारांनीं व लाखांनींच मोजायचे. परंतु दुसऱ्या गटामध्यें सरकारी दृष्टीनें त्यांचें नुकसान कमी असलें तरीहि त्या मुख्यत: खालच्या वर्गांतल्या लोकांचें यांत सर्वस्व गमावलेलें आहे. स्थळांतराच्या या गटांतहि त्यांना बरोबर कांहीं नेणें अशक्य-प्रायच होते. ज्यांनीं कांहीं आणण्याचा प्रयत्न केला ते कोठें लुटले गेले, लुबाडले गेले, पाकिस्तान सीमेवर तपासणी म्हणून, जकात म्हणून घेतले गेले. ते कांहीहि असले तरी या १५ ऑगस्टनंतरच्या स्थलांतरांतील गटांत पश्चिम पंजाब, सरहद्द प्रांत, क्वचित काश्मीरकडील भाग यांतून जे निर्वासित आले ते सर्वस्वी आर्थिक दृष्टीनें भिकारी बनूनच आले. कानांतल्या सुवर्ण कुंडलासाठीं कान तोडायला किंवा दागिन्याकरितां स्त्रियावर हात टाकायला मागेपुढें पाहिलें गेले नाहीं. पहिल्या गटांतील लोकांची संपत्ति मुख्यत: बँक व सोनेंनाणें यांतच होती.

प्रत्यक्ष घरेंदारें, कारखाने, दुकानें यांचें जे कांहीं नुकसान झालें असेल तेवढेंच धनिक वर्गाचें नुकसान, पण या खालच्या वर्गांतल्या लोकांच्या जवळची अपुरी धनसंपत्ति वेगळ्याच स्वरूपाची होती. ज्यांची संपत्ती म्हणजे कणगींतिलें धान्य, पुष्ट जनावरें, फार तर खळींत पुरलेले पैसे आणि सुजला, सुफला अशी जमीन. त्यांनीं ही संपत्ती बरोबर कशी आणायची; १५ ऑगस्टपासून ते ४ सप्टेंबरपर्यंत आलेल्या या असंख्य निर्वासितांचा हा प्रश्न होता. जे थोडेफार घेता आले ते लुटले गेल. त्यांनीं आपली संपत्ति, वैभव, सारे सारे मागे सोडले आहे आणि त्यांच्याजवळ त्यांचे फक्त अस्तित्व आहे. त्यामुळें १५ ऑगस्टनंतर निर्माण झालेला प्रश्न हा निर्वासितांचा प्रश्न आहे. तत्पूर्वीं आलेल्या लोकांना या अर्थानें निर्वासित म्हणतां येणार नाहीं.

## गट दुसरा

### स्वयंस्फूर्त स्थलांतर

१५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबरपर्यंतच्या या काळांतले व पुढें कांहीं दिवस चहणारे स्थलांतर हें लोकांचे स्वयंस्फूर्त व असंघटित असे स्थलांतर होतें. सर्वस्व गमावलेले लाखों निर्वासित आपले क्षीण डोळे भारतीय सीमेकडे लावून मैलांमागून मैल पायीं तुडवत आले. सर्वांत कठिण असा हा कालखंड होता. त्यांना कोणाची मदत नव्हती, कोणाचे संरक्षण नव्हते. बहुधा सारे पायदळी काफिले असत. असंख्य हतभागी माणसें एकत्र येत व आसऱ्याच्या शोधार्थ रानोमाळ चालू लागत. वाटेंत लुटालूट, पळवापळवी होई; पण गेले ते गेले असे समजून पाय उचलायचा. वाटेंत हल्ल्यामध्ये जखमी होत. कोणी आजारी असत, शक्य तिथपर्यंत त्यांना न्यायचे, त्यांची काळजी करायची. नाहीतर तिथेच परमेश्वराच्या स्वाधीन म्हणून सोडून द्यायचे. प्रेतें तशीच टाकायची आणि पुढें चालू लागायचे. असंघटित स्थलांतर हा साऱ्या शोकयात्रेचा पूर्वार्ध आहे. पुष्कळसे स्थलांतर या भागांत पायींच झालें. बैलगाड्या, घोडे असत. शक्य तितकीं जनावरें जीं नेतां येतील तीं सारी तांड्याच्या पुढें घालायचीं, मग बैलगाड्या, बायका पोरें म्हातारे, सारे पायी निघत. साधारणपणें प्रत्येक तांड्यांत साठ हजार माणसें

असत. साऱ्यांच्या मनांत पुढें चला हा मंत्र असे. जे पडले त्यांना पडूं द्या, कोणालाच त्यांच्यासाठीं रडायला वेळ नाहीं, रात्र पडली कीं कुठेंही थांबायचे, ना आंथरुण ना पांघरुण. मनांत भीति आणि भीषण स्मृति. सकाळ झाली की ही संस्कृतीची स्मशानयात्रा पुढें चालू लागे. या कालखंडांत काफिल्यांना मुळींच संरक्षण नसे. दिवसेदिवस हिंदुस्थानकडे येणारा निर्वासितांचा लोंढा वाढूं लागला. पश्चिम पंजाब, वायव्य सरहद्द-प्रांत बलुचिस्तान, सगळीकडूनच आभाळ फाटलें. पाकिस्तानांत प. पंजाब, सरहद्द-प्रांत, बलुचिस्तान, सिंध, भावलपूर या भागांत दंगल वाढली. हिंदुस्थानांत पूर्व पंजाब, युक्त प्रांताचा वायव्य भाग, दिल्ली या भागांत भडका उडाला. क्षितजाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत एकच दृश्य दिसे. कंटाळलेली थकलेली असंख्य माणसें निस्तेजपणानें स्वतःला पुढें ढकलीत असत.. एका वेळीं तर एका पायदळी तांड्याची लांबी ७२ मैल लांब होती. आणि त्यांत सुमारे एक लाख शरणार्थी होते. गाड्या, घोडे, उंट यावर लादून सामान भरलेले असे. असे तांडे बालेकी हेडवर्क्स, अमृतसर किंवा रैवंद या जागीं भारतीय सरहद्दीमधे प्रवेश करीत असत. कल्पनातीत अपेष्टा आणि दुःखानीं भरलेली ही यात्रा असे. याच काळात पूर्व पंजाब रेल्वेने यांना मदत देण्याचा प्रयत्न केला. साधारणपणें रोज सहा आगगाड्या हजारो शरणार्थी भाईंना पूर्व पंजाबांतील केंद्रांत आणून पोचवीत असत. प्रत्येक आगगाडींत सुमारे तीन हजार निर्वासित असत. याच कालखंडांत आगगाड्यावरचे हल्ले ही एक नित्यक्रमाचीच गोष्ट होऊन बसली होती.

## गट तिसरा

### संघटित स्थलांतर

या साऱ्याचा परिणाम म्हणून स्थलांतराच्या योजनेकडे सरकारनें लक्ष देण्याचे ठरवलें. त्याप्रमाणें ताबडतोब दि. ४ सप्टेंबर १९४७ ला 'लष्करी स्थलांतर संघटना' स्थापन करण्यांत आली. याचें मध्यवर्ती केंद्र अमृतसर येथें ठेवण्यांत आले. ही व्यवस्था प्रथम ब्रिगेडियर चिमनि व नंतर ब्रि. मोहिते हे पहात होते. याचें कार्यकेंद्र लाहोर येथें ठेवून पाकिस्तानी लष्कराशी शक्य ती संल-

५८०१

ला ठेवण्यात आली होती. प्रत्येक जिल्ह्यांत एक संघटनाधिकारी नेमण्यांत आला. हे सर्व अधिकारी लाहोर केंद्राला जबाबदार असत. हे अधिकारी निर्वासितांच्या संख्येचा हिशोब ठेवीत असत व पाकिस्तान अधिकाऱ्यांकडून कांहीं अडथळे आल्यास त्याची नोंदणी तावडतोब लाहोर केंद्रांत करीत असत. यामुळें दोन्ही वसाहतींमध्यें होणाऱ्या समान बैठकींत या प्रश्नाची तड लावणें शक्य होत असे. अधिकांत अधिक माणसांना वाचवण्याकरितां कमींत कमी-कालावधींत जास्तीत जास्त माणसांचें स्थलांतर करणें आवश्यक होतें. याकरता शक्य तों रेल्वे, मोटार ट्रकस, व विमानें यांचे साह्य घेण्यांत आलें. दोन्ही राष्ट्रामधली दळणवळणाची व्यवस्था खिळखिळी झाली असल्याकारणानें प्रत्येक काफिल्याबरोबर लष्करी संरक्षण देण्याची व्यवस्था करणें जरूर होतें. जास्तींत जास्त माणसें आणण्याकरितां पायदळी काफिल्यांची व्यवस्था अत्यंत सोयीची ठरली. लष्करी स्थलांतर संघटना दि. ५ सप्टेंबरपासून या कामाला लागली व तिसऱ्या कालखंडाला सुरुवात झाली.

## स्थलांतराचीं साधनें

तेव्हांपासून या पायदळी काफिल्यांना संरक्षण देण्याची थोडीफार व्यवस्था करण्यात आली. प्रत्येक गटांत सुमारे ३० ते ४० हजार माणसें लायलपूर आणि मॉंटगॉमेरीच्या सुपीक प्रदेशांतून निघून हा १५० मैल रस्ता तुडवत जात. पुष्कळदां या चालणाऱ्या काफिल्यांना पाकिस्तानच्या हद्दीमध्यें, धान्य, शिजवलेलें अन्न व इतर जरूरीच्या गोष्टी यांचा पुरवठा विमानांतून करावा लागला. औषधें, प्रतिबंधक लस, डॉक्टर वगैरे विमानानें वा ट्रकमधूनच पाठवले जात. भारतीय सरहद्दींत येतांना त्यांना इनॉक्युलेशन्स करण्याकरितां व इतर मदतीकरितां रणक्षेत्रांतील शुश्रुषापथकें पाठवण्यांत आलीं. या चालत्या दलांना मदत देणें सर्वांत कठिण काम होतें. पण या कामीं आर. आय. ए. एफ्. ची विमानें अमृतसर आणि दिल्ली येथपासून जरनवाला, लायलपूर, चुरखाना, दभानसिंगवाला, बलोकी हेडवर्क्स येथपर्यंत झेप घेत असत. वाटेंत जागोजाग हल्ले होत व उरले सुरले सामानसुद्धां लुटले जाई. त्याचवेळीं

निसर्गानेंहि प्रकोप केला. या दुर्दैवी संकटाला पुरानें साथ दिली. शरणार्थी भाईंच्या यातनांना अंतच उरला नाहीं. पण त्यांचा धीर सुटला नाहीं. जीवनाच्या अमर आशेनें ते भारतीय सीमेच्या दिशेनें पावलें उचलीत होते. १९४७ च्या अखेरीस ही मोठ्या प्रमाणावरची पायदळी यात्रा संपली. शेवटचा सुमारें दहा हजार माणसांचा काफिला, मे १९४८ च्या मध्यांत माँटगॉमेरीहून हिंदुस्थानांत आला.

पायीं येणाऱ्या काफिलयांच्या खालोखाल आगगाड्यांनीं कामगिरी बजावली. फाळणीच्यामुळें रेल्वेच्या नोकरांचीहि अदलाबदल झाली होती. याशिवाय पायीं येणारे काफिले, मोटारी, आगगाड्या, पश्चिम पंजाबांतील निर्वासित छावण्यांना साऱ्यांना लष्करी संरक्षण द्यायच होतेच. या साऱ्या अडचणींना लष्करी संघटना तोंड देत होती. आणि स्थलांतराचें कार्य सुरू होऊन महिना झाला असेल नसेल, कामाला जरा गति येऊं लागली असल नसेल तोंच मुसळधार पावसानें शरणार्थींना झोडपण्याचे ठरवले. रेल्वे रस्ते वाहून गेले, पूल पडले, आणि कित्येक मैलच्या मैल रेल्वेची वाहतुक बंद झाली. हजारोंनीं लोक उघडे पडले. जे वाचले त्यांनीं जवळच्या निर्वासित छावणींत इतकी गर्दी केली कीं, साथीचे रोग फैलावण्याची भीति क्षणोक्षणीं वाढूं लागली, पण हिंदी लष्करानें या वेळीं बाजू सावरून धरली. बंद झालेले रस्ते टाळण्याकरितां लांबच्या रस्त्यानें गाड्या जाऊं लागल्या. नवीन पूल बांधण्यांत आले. वाहून गेलेले रस्ते दुरुस्त करण्यांत आले आणि तुटलेली सांखळी पुन्हा जोडण्यांत आली. पूर्व पंजाब रेल्वेनें या बाबतींत प्रशंसनीय कामगिरी केली आहे. विशेषत: कोळशाचा तुटवडा, पुरामुळें निर्माण झालेल्या अडचणी, कुशल अशा ड्रायव्हस व यंत्रज्ञांची अपुरी संख्या, यासारख्या अडचणींतूनहि त्यांनीं केलेलें कार्य पहातां अधिकच कौतुक वाटतें. आगगाड्यांच्याबरोबर रक्षणाकरितां दिलेल्या पाकिस्तानी लष्करानें विश्वासघातकीपणाहि केला. रस्ता अडवला जाई. क्वचित, पुरेसे दंगखोर जमेपर्यंत गाडी एखाद्या आडवळणी स्टेशनवर अडकवली जाई. मग दंगखोर या असंरक्षित गाडीची लुटालूट करीत. २७ ऑगस्ट १९४७ पासून ६ नोव्हेंबर १९४७ पर्यंत ६७३ पेक्षां अधिक आगगाड्या भारतीय सीमेंत व सीमेबाहेर

गेल्या आणि त्यांनीं सुमारे २३,००,००० इतके निर्वासित हलवले. यापैकीं १३,६२,००० इतके मुसलमानेतर व ९,३९,००० इतके मुसलमान, यांना अनुक्रमें भारतांत व पाकिस्तानांत सोडले. यावेळीं पूर्व पंजाब रेल्वेच्या नित्याच्या गाड्या बंद ठेवण्यांत येऊन त्यांचा उपयोग, निर्वासित आणणें व भारतीय सीमेंत येतांच जागोजागच्या छावण्यांत पोचवणें, या कामांत करण्यांत आला. रोज प्रत्येकींत सरासरी तीन हजार निर्वासित असलेल्या अशा सहा गाड्या जा-ये करीत असत. सरकारी योजनेच्या पूर्वीं—म्हणजे १७ ऑगस्टपासून पूर्व पंजाब रेल्वेनें सुमारें ३००,००० च्या वर निर्वासितांना भारतीय सीमेच्या आंत आणून पोचवले आहे. मधल्या एका काळांत, म्हणजे डिसेंबर १९ ते जानेवारीपर्यंत रोज आठ गाड्या प. पंजाबांतून येत असत. यापैकीं तीन गाड्या वायव्य सरहद्द प्रांतांतून येत असत.

खेड्यापाड्यांतून पसरलेल्या अल्पसंख्य हिंदूंना रेल्वेनें हिंदुस्थानात आणण्याकरितां प्रथम त्यांना खेड्यातून आणून रेल्वे स्टेशनवर पोचवणे हें महत्त्वाचें कार्य होतें, आणि हें काम मोटारींच्या योगानें सुकर झाले. परंतु य मार्गांतहि झडत्या, अडवणुकी इत्यादि अनेक अडथळे आलेच. लष्करी स्थलांतर संघटना १२०० लष्करी व नागरी ट्रक्सचा उपयोग करीत होती. संयुक्त प्रांतानें ६०० गाड्या दिल्या व कांहीं गाड्या खाजगी संस्थांनीं दिल्या. इतक्यांना ड्रायव्हर्स मिळवणेहि मुश्कील झाले होते. हिंदुस्थानच्या सर्व भागांतून ड्रायव्हर्स घेण्यांत आले. सुमारे ४००,००० पेक्षा जास्त हिंदु व शीख या साधनांनीं आणले गेले व सुमारे २,००,००० पेक्षां जास्त मुसलमान निर्वासित पोचवले गेले. बारीकसारीक खेड्यांतून लोकांना रेल्वे स्टेशनपर्यंत आणणे आणि कांहीं ठिकाणीं खेड्यांतून सरळ भारतीय सीमेत लोकांना पोचवणे हें काम या गाड्यांनीं केले.

स्थलांतराच्या कामीं विमानांचा इतक्या मोठ्या प्रमाणांत उपयोग करण्यांत आला कीं, शांततेच्या काळांतला आपल्याकडील हा त्यांचा पहिलाच सामुदायिक प्रयत्न म्हणायला हरकत नाहीं. सुरवातीला विमानाच्या जागा राखून

ठेवण्यांत येत असत. या पद्धतीवर तीव्र टीका झाल्यानंतर ही पद्धत बंद करण्यांत आली. ऑगस्ट अखेरीला या संघटनेनें विमानें वापरावयाची ठरवल्यानंतर निरनिराळ्या हवाई वाहतुक कंपन्यांची दहा विमानें घेण्यांत आली. सरगोदा, लायलपूर, मुलतान, आणि रावळपिंडी येथून दिल्लीला निर्वासित आणण्याकरतां रोज सरासरी सहा ते सात विमानें जात असत. याच्याशिवाय नित्याच्या अशा दिल्ली ते कराची, क्वेट्टा, लाहोर, रावळपिंडी, पेशावर या विमान वहातुकीची व्यवस्थाहि सुधारून नियमित करण्यांत आली प्रत्येक विमानाबरोबर एक संघटनाधिकारी जात असे व खऱ्याखुऱ्या निर्वासितांची योग्य व्यवस्था पहात असे. येवढ्या प्रचंड वाहतुकीमध्यें एकहि हवाई अपघात झाला नाहीं. उलट एका विमानांत एका जीवानें जन्म घेतला. नोव्हेंबर १९४७ अखेरपर्यंत सुमारे ३२,००० निर्वासितांची वाहतुक दोन्ही बाजूनें करण्यांत आली. यांत २१,००० पेक्षां जास्त हिंदु होते. केवळ या स्थलांतराच्या कामीं ६,००,००० गॅलन इतके हवाई वाहतुकीस अवश्य असलेले पेट्रोल वापरले गेले. पाकिस्तानांत नीट व्यवस्था होत नसल्याने, पाकिस्तानांतील प्रत्येक विमानतळावर एक हिंदी अधिकारी नेमलेला असे. जाण्याचा अनुक्रम व सामान वगैरे बाबतींत हे अधिकारी निर्णय देत असत.

सिंधमधील स्थलांतराच्या कामीं आगबोटींचाहि उपयोग करण्यांत आला. ब्रिटिश इंडिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनीच्या नित्याच्या बोटींच्याशिवाय आणखी नऊ बोटींची व्यवस्था सरकारनें केली होती. ह्या आगबोटी कराचीहून निर्वासितांना घेऊन मुंबईला आणीत असत. कराची बंदराच्या अधिकाऱ्यांच्या सांगण्याप्रमाणे रोज दोन हजार याप्रमाणे निर्वासित आणण्याची व्यवस्था झाली होती नोव्हेंबर अखेरपर्यंत सुमारे १,३२००० निर्वासित या मार्गानें हिंदुस्थानांत आणण्यांत आले.

या साऱ्या महायात्रेंत अनेक अडचणी आल्या. तोकड्या जागेंत जास्तीत जास्त माणसे आणायची असत. पण याच्या उलट निर्वासितांची तर अधिकांत अधिक सामान बरोबर आणायची उत्कट इच्छा असे. त्यामुळें पुष्कळदां विरोधाचे प्रसंग येत. विशेषतः विमानाच्या वाहतुकींत हा प्रश्न फार

प्रकर्षानें उद्भवे. वाढत्या संख्येबरोबरच त्यांचे अन्न, वैद्यकीय मदत, व मुख्यत: संरक्षण यांचा प्रश्न वाढतच गेला. पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी मान्य केल्याप्रमाणें सहकार्य दिले नाहीं ही गोष्ट निर्विवाद आहे. अशा नेहमी बातम्या येत कीं, वाटचालींतील किंवा पाकिस्तानातील छावणीतल्या निर्वासितांना अन्न मिळत नाहीं. अशा बातम्या येतांच शिजवलेले अन्न विमानानें पाठवण्यांत येई- दिल्लीतील कॉलेज विद्यार्थि-विद्यार्थिनी व नायकांनीं या कामीं अमूप मदत दिली. वैद्यकीय मदतीला सर्वत्र प्राधान्य देण्यांत येई. प्रथम लष्करी संरक्षण पुरेसे नसल्याने पायीं येणाऱ्या काफिल्यांच्यावर हल्ले होत, हजारोंनीं माणसें मारली जात, संपत्ति लुटली जाई, पुढें तर आगगाड्यावरहि हल्ले होऊं लागले. गुजरातच्या गाडीवरील हल्ला कोण विसरेल? पण वाढत्या लष्करी संरक्षणाबरोबरच निर्वासितांच्या मनांतहि धीर वाढत गेला व पुढें पुढें लष्कराच्या खांद्याला खांदा लावून तेहि प्रतिकार करीत.

## दुसरें वर्गीकरण

केवळ कालखंडाने स्थलांतराच्या प्रश्नाचे वर्गीकरण करून स्थलांतराच्या शोककथेची पुरेशी कल्पना येणार नाहीं. मध्यवर्ती संघटनेच्या दृष्टीनें त्याची आवश्यकता आहे. पण भारतीय संघराज्याचे प्रांत हे सर्वांत महत्वाचे घटक असल्याने भौगोलिक विभागाप्रमाणेहि याचा विचार करणे अगत्याचे आहे. पाकिस्तानच्या पूर्व भागांत ( बंगाल ) हा प्रश्न थोडा वेगळ्या स्वरुपाचा आहे. परतु प. पाकिस्तानांत या प्रश्नानें खरोखर उग्र भीषण रूप धारण केले. म्हणूनच १५ ऑगस्टला स्वातंत्र्य मिळाल्यावर मंत्रीमंडळाला जर सर्वांत महत्वाचा असा कोणचा प्रश्न हाताळावा लागला असेल तर तो पश्चिम पाकिस्तानामधील अल्पसंख्य हिंदू व शीख निर्वासितांच्या स्थलांतराचाच. १९४७ च्या अंदाजाप्रमाणे पश्चिम पाकिस्तानांत ( बहावलपूर, खैरपूर व बलुचिस्तान ही संस्थानें पाकिस्तानात सामील झाली, ती धरून ) हिंदू व शीख यांची संख्या ६,१००,००० असावी. १९४१ च्या शिरगणतीपेक्षां यात अंदाजें १२% ची वाढ आहे. या लोकसंख्येची वाटणी खालील प्रमाणें होती.

| | | |
|---|---|---|
| पश्चिम पंजाब...... | ४०,५०,००० | लोकसंख्या |
| सरहद्द प्रांत ...... | २,६२,५०० | ,, |
| सिंध ............ | १४,१२,५०० | ,, |
| खैरपूर संस्थान ... | ५०,००० | ,, |
| बलुचिस्तान ...... | ६२,५०० | ,, |
| बलुचिस्तान संस्थानें | १२,००० | ,, |
| बहावलपूर......... | २,५०,५०० | ,, |

ह्या अल्पसंख्यांकाच्या संख्येपैकीं एप्रिल अखेरपर्यंत ५४,००,०००. इतके लोक हिंदुस्थानात आणले गेले होते. त्यांची वाटणी खालील प्रमाणे.—

| | |
|---|---|
| पश्चिम पंजाब<br>सरहद्द प्रांत (एजन्सीज व रानटी प्रदेश धरून } ...... | ४१,६२,२६१ |
| सिंध, खैरपूर संस्थान, बलुचिस्तान............... | ११,१५,००० |
| बहावलपूर ............................... | १,२५,८३५ |

## पंजाब

स्थलांतराचा सर्वात कठिण भाग म्हणजे पश्चिम पंजाब, वायव्य सरहद्द प्रांत, बहावलपूर व बलुचिस्तान. या साऱ्या भागातच क्रूर कत्तली झाल्या. त्यामुळे व इतर अनेक अडचणींमुळें येथील स्थलांतर लष्कराशिवाय होऊच शकले नसते. शिवाय स्थलांतराकरिता, भारतीय सीमेकडे पहिले पाऊल पडले ते याच प्रांतातून. ही योजना करताना १९४१ च्या शिरगणतीचे आकडे पाया म्हणून धरले होते. त्याप्रमाणे पश्चिम पंजाबची हिंदू शीख लोकसंख्या ३२·०४ लक्ष, सरहद्दप्रांत ३·५, लक्ष, आणि बहावलपूर २·४ लक्ष, एकूण ४१ ९४ लक्ष इतकी होती. नोव्हेंबर अखेरपर्यंतच सिंध धरून या भागांतून ४० लक्षा-पर्यंत लोक आणले गेले. याच कालखंडांत सर्व साधने मिळून रोज सरा-सरी अर्धा लक्ष लोक तरी हिंदुस्थानांत येत होते. स्थलांतरामधील सर्वांत महत्वाचे सर्वांत प्रथम सुरू झालेले व सर्वात धोक्याचे असे जें

पंजाब, सरहद्दी सुभा, बहावलपूर, बलुचिस्थान वगैरे भाग यातील अल्पसंख्यां-कांचे स्थलांतर आता संपले आहे. आतां केवळ बारिकसारिक भागांत राहिलेले लोक, अपहृत स्त्रिया, धर्मांतरित माणसे यांची व्यवस्था लावायचे काम सुरू आहे.

## सिंध

पंजाबच्या विलक्षण अनुभवामुळें धडा शिकून सिंधमधील स्थलांतर होतांना परिस्थिति आटोक्यांत ठेवण्याचा प्रयत्न केला गेला व त्यामुळें पुष्कळच प्राण-हानि वाचली. वस्तुतः हा प्रश्न पंजाबपेक्षां उशिरा सुरू झाला. किंवा पंजाबच्या हत्याकांडामुळेंच येथील स्थलांतराला तोंड फुटले असें म्हणायला हरकत नाहीं. पंजाबमधें बहुसंख्य वर्ग शेतकऱ्यांचा (जमिनीवर जगणाऱ्यांचा) होता तर याच्या उलट सिंधमध्यें बहुसंख्यवर्ग हा व्यापारावर जगणारा होता. सिंधी हिंदूंचें राहाणीचे मानसुद्धां जरा वरच्या पातळीचेच होते. त्यामुळें नुकसान होऊनसुद्धां पंजाबी निर्वासिताइतकी सिंधी निर्वासितांची परिस्थिति वाईट झाली नाहीं. शिवाय पंजाब-इतके दंगे, अत्याचार न घडूं दिल्यामुळें सिंधी हिंदूंना स्थलांतर पुष्कळसे सुसह्य झाले. सिंधमधील स्थलांतर मुख्यतः आगबोटी व रेल्वेच्या मार्गानें झाले. स्थलां-तराच्या उत्तरार्धांत सिंधमधील स्थलांतराला गति येऊं लागली. १५ मार्चपर्यंत २४ जहाजांतून ४०,००० माणसें पाठवण्यांत आली होती हे यावरून स्पष्ट होईलच. तोंपर्यंत सर्व मिळून सुमारें ८ लक्ष लोकांनीं सिंध सोडला होता. रोज सुमारें दोन हजार लोक गाडीनें जात असत. सक्कर, शिकारपूर, हैद्राबाद अशा मोठ्या स्टेशनावर लोक वाट पहात बसलेले असत. भारतीय हायकमिशनर श्री. श्रीप्रकाश यांनीं सिंधमध्यें दौरा काढला आणि परिस्थितीची पहाणी केली. त्यानंतर अधिक जहाजांची व्यवस्था करण्यांत आली. सिंधमधून १२ लक्ष निर्वासित आजवर आले असावेत. (सिंधमधील हिंदूंची संख्या १९४७ च्या अंदाजाप्रमाणें १५ लक्ष असावी.) आतां सिंधच्या बाबतींत स्थलांतराचा प्रश्न जवळ जवळ संपला आहे.

## बंगाल

बंगालची बाब तर वरील दोन्ही भागापेक्षां वेगळी आहे व सुलभ आहे. याचे कारण पूर्व बंगाल व पश्चिम बंगाल यांमधील सलोखा घालवून जाण्यासारखा नाहीं. तिथें स्थलांतराचा प्रश्न पंजाबइतका गंभीर कधींच नव्हता व नाहीं. मागें बंगाली भाषेला सरकारी मान्यता ( राजभाषा म्हणून ) देण्याचें नाकारलें, दोन बंगालमध्यें वस्तूंचे अनिर्बंध दळणवळण होऊं शकत नाहीं असें सांगितलें, यामुळें थोडी चीड निर्माण झाली होती. पण त्या वेळीं स्थलांतराच्या प्रश्नाची तीव्रता फार कमी होती. पंजाब व सरहद्द प्रांतापासून धडा घेऊन सीमारक्षणा-करितां एक स्वयंसैनिकांचे दल उभारण्यांत आले आहे. त्यांच्या शिक्षणाला सुरवात झाली असून, योजनेचा खर्च दहा लक्षापर्यंत येईल असा अंदाज आहे. आतांपर्यंत पूर्वबंगाल्यांतून पश्चिम बंगाल्यांत ११ लक्ष ५० हजार निर्वासित आले आहेत.

वरील सर्व प्रांतांतून झालेलें स्थलांतर हें दळणवळणाच्या साधनांच्या अभावीं कधींच शक्य झाले नसते. फाळणीनंतर या खात्यामध्यें मोठी अडचण निर्माण झाली होती. कारण पूर्व पंजाबांतील पोष्ट, तार, टेलिफोन सान्यांचे केंद्र लाहोर येथें होते व लाहोर पाकिस्तानांत जातांच पूर्व पंजाबांतील दळणवळण लुळे पडणारसे वाटूं लागले, परंतु ताबडतोब दिल्ली, अमृतसर, अंबाला, जालंदर, फिरोजपूर वगैरे महत्वाच्या शहरामधील दळणवळणाची व्यवस्था करण्यांत आली. आगगाड्या तर होत्याच पण खास मोटारींतून टपाल रवाना करण्यांत येऊं लागले. या-शिवाय दिल्ली, गुरुदासपूर, अंबाला, जालंदर, फिरोझपूर या मार्गानें जाणारे खास टपाली विमान सुरू करण्यांत आले. आणि हे विमानतळ दिल्ली, रोहतक, हिस्सार, गुरुगांव, आणि अंबाला ते सिमला, कर्नाल त्याचप्रमाणें जलंदर ते लुधियाना, होशियारपूर या मोटार मार्गांना जोडण्यांत आले. एकदां दळणवळण व वाहतुक सुरू होतांच जनतेच्या मनांत एक प्रकारचा दिलासा, धीर निर्माण झाला.

## लष्करी संघटना

हे सारे प्रचंड कार्य हिंदी सैन्य व हिंदी हवाईदल यांच्या मदती-शिवाय होणें अशक्य होते. सुमारें एक सप्टेंबर १९४७ पासून हिंदी सैन्यदलानें

पश्चिम पाकिस्तानांतून हिंदु व शीखांना सोडवून आणण्याची जबाबदारी उचलली व पाकीस्तानी सैन्यानें पूर्व पंजाबांतून अल्पसंख्य मुसलमानांना हलवण्याचे शिरावर घेतले. निर्वासितांना गोळा करणें, मोटार, रेल्वे, विमान, आगबोट, मिळेल त्या साधनानें त्यांची ठायीं ठायीं वसवलेल्या निर्वासित केंद्रांत व छावण्यांत रवानगी करणें, त्यांना संरक्षण देणें, त्यांना अन्न, वैद्यकीय साहित्य वगैरे आवश्यक गोष्टींचा पुरवठा करणें, साऱ्या गोष्टींकडे लष्करी संघटनेला लक्ष द्यावें लागत होते आणि या बाबतींत हिंदी दलांनी एक नवा आदर्श निर्माण केला असे म्हणण्यांत मुळींच अतिशयोक्ति नाहीं. ५ सप्टेंबरला त्यांनीं कामाला सुरुवात केली. लाहोर, अमृतसर येथें त्यांचे मुख्य केंद्र होते. हिंदु निर्वासित आणणें, मुसलमान निर्वासित पोचवणें, दोन्ही स्थलांतरें त्यांना पहावी लागत. या संघटनेचा पहिला ५० मोटारींचा तांडा साचा सौदा येथें जाण्याकरतां ५ सप्टेंबर १९४७ ला अमृतसरहून निघाला. हा मार्ग शेखपुऱ्याच्या पलीकडे १७ मैल होता. हा तांडा दुसऱ्याच दिवशीं ३,५०० निर्वासित स्त्रिया, मुले, माणसें घेऊन परत आला. प्रथम माणसें मग सामान असा नियम असल्यानें प्रत्येक तांड्यामध्यें प्रत्येकी एक साधारण आकाराची ट्रंक व वळकटी येवढेंच आणण्याची परवानगी देण्यांत आली होती. प्रत्येकाच्या काफिल्याबरोबर थोडीशीं शिधासामुग्री नेण्याची व्यवस्था असे. तांड्यांच्या हालचालींच्या बातम्या त्वरित मध्यवर्ती केंद्राला पोचवण्याकरितां वेगळे अधिकारी नेमलेले होते. संघटना सुरू झाल्यापासून पहिल्या आठवड्यांतच १० लक्ष लोकांचे स्थलांतर करण्यांत आले. सर्वांत जास्त लोक पायीं आले. आगगाडीनें २००,००० आणि मोटारींनें १००,००० च्या पेक्षां जास्त लोक आले. ही संघटना कार्य संपतांच थांबवण्यांत आली व आता केवळ पंजाबांतील बारिकसारिक भागांत राहिलेले हिंदू व शीख यांना आणायचे काम पंजाबांतील स्थलांतराच्या भागांत उरले आहे. आतांच्या अंदाजावरून ते सुमारे ५० ते ६० हजार असावेत. या संघटनेच्या पाकिस्तानांत कार्य करणाऱ्या शाखेनें आतां अपहृत स्त्रिया व जबरीच्या धर्मांतरामुळें मुसलमान झालेले लोक यांचा प्रश्न हातीं घेतला आहे. पुरामुळे रेल्वे लाइन वाहून जातांच भराभरा पूल दुरुस्त करून व ड्रायव्हर्स

कमी पडतांच स्वतः काम करून हिंदी सैन्याने असामान्य कामगिरी बजावली आहे. वैद्यकीय मदत, संरक्षण, सान्या बाबतीत हिंदी सैन्य हा निर्वासितांचा आसरा होता. म्हणूनच पुढें पुढें प्रतिकाराच्या वेळीं हिंदी सैन्याच्या बरोबरीनें लोक लढाईला तयार होत असत.

आज स्थलांतरानें अशी स्थिति झाली आहे कीं, पाकिस्तान आपल्य नागरिकांना मुकले आहे आणि हिंदुस्थानला आपले मुकलेले दुःखी भाई परत मिळालें आहेत. ते येतांना शरीरानें खचलेले पण मनाचा जोम कायम ठेवून आले आहेत. जिथे वर्षानुवर्षे काढलीं तेथून आपला जीवनवृक्ष समूळ उपटून नव्या वातावरणांत रुजवायचा म्हणजे केवढी तपश्चर्या आहे; स्थलांतरामधील संघटित भाग सोडला तरी शोकयात्रेचा पाहिला स्वयंस्फूर्त व असंघटित भाग म्हणजे यातना, भीति आणि मृत्यू या वेगळे कांहीं नाहीं. भारतीय इतिहासातल्या अनेक शोककथामध्ये या रक्तरंजित पानाची नवी भर पडली आहे. पण निर्वासितांनीं दाखवलेल्या न ढळणाऱ्या धैर्यामधेंच नवराष्ट्राची अमर आशा आहे. भारत सरकारने ४ सप्टेंबरला तातडतीने निर्णय घेऊन योजना केल्यामुळें हें काम पुष्कळच वेगाने व कौशल्याने झालें. जगांत आजवर झालेल्या लोकसंख्यांच्या स्थलांतरापेक्षां याचा अनपेक्षितपणा, यातना वेगळ्या होत्या. व म्हणूनच हिंद सरकारनें केलेल्या या आश्चर्यजनक गतिमान स्थलांतराची व संघटनेची आंतरराष्ट्रीय तज्ञांनीं मुक्तकंठानें स्तुति केली आहे. ५५ लक्षांपेक्षां जास्त माणसे अन्न, वस्त्र, आसरा यांच्या शोधार्थ भारतीय सीमेंत आली आणि त्यानी शोकयात्रेंतला पहिला महत्वाचा टप्पा मागे टाकला.

# छावण्या आणि प्राथमिक गरजा

ज्यावेळीं पाकिस्तान, हिंदुस्थानचा उत्तर भाग व सरहद्द यांमध्यें दंगे सुरु झाले त्यावेळीं पीडितांबद्दल सर्वत्र सहानुभूति दाखवण्यांत आली. निर्वासित येऊन त्यांच्या छावण्या वसूं लागतांच सगळीकडून शक्य ती आर्थिक मदत व कार्यकर्ते पाठवण्यांत आले. त्यावेळीं कित्येक लोकांची कल्पना अशी होती कीं, पश्चिम पंजाबातून पूर्व पंजाब वा युक्त प्रांत यांत लोक जातील व परस्पर तेथेंच हा प्रश्न संपेल. पण मागे दिलेले आकडे व शेजारी रहायला आलेले निर्वासित पाहून हे स्पष्ट होईल कीं, हा प्रश्न केवळ आर्थिक मदत देऊन सुटण्यासारखा नव्हता. पाकिस्तानांत निर्वासित असेतोपर्यंत शाब्दिक सहानुभूति दाखवणें सोपें होतें पण भारतीय सीमा ओलांडून हे असंख्य भाई हिंदुस्थानांत येतांच आपल्या सरकारवर व त्याहिपेक्षां समाजावर मोठी जबाबदारी पडली.

केवळ भीतिमुळें जे लोक इकडे निघून आले ते, किंवा बंगाल व सिंध येथील निर्वासित यांची स्थिति पुष्कळ बरी होती. पण ज्या भागांत खरोखरीच दंगल झाली तेथील सामान्य लोकांची स्थिति मोठी अनुकंपनीय होती. ते निर्वासित इकडे आले ते जवळजवळ भिकारी होऊनच आले. अंगावर अपुरी वस्त्रें, हृद्यांत दाटलेली सूडाची भावना व दुःख, मनामध्यें मागच्या दुष्ट आठवणी येवढेच ओंडवल त्यांच्याजवळ होते. आलेल्या निर्वासितांची स्थिति कशीहि असली तरी

आलेल्या लोकांना अन्न, आसरा आणि वस्त्रें देण्याची जबाबदारी सरकारवर पडली. पश्चिम पंजाबमधून आलेल्या निर्वासितांची प्राथमिक व्यवस्थेची जबाबदारी पूर्व पंजाब, दिल्ली, संयुक्त प्रांत या प्रांतांच्यावर, सिंधमधील निर्वासितांची मुख्यतः मुंबईवर आणि पूर्व बंगालची पश्चिम बंगालवर येऊन पडली.

## छावण्यांची आंकडेवारी

पूर्व पंजाबमधील जवळजवळ प्रत्येक मोठ्या शहरांत कित्येक छावण्या उघडल्या गेल्या. सर्वसाधारणपणें प्रत्येक छावणांत पाच हजारापासून पन्नास हजारापर्यंत लोक असत. ज्यावेळीं साऱ्या स्थलांतराला कमालीचा वेग आला होता त्यावेळीं पूर्व पंजाबांत ८५ छावण्यांतून ७००,००० निर्वासित होते. खुद्द पुनर्वसाहत खात्यानें एक छावणी चालवायला घेतली. जगांत सर्वांत मोठी अशी छावणी कुरुक्षेत्र येथें वसवली गेली. या छावणींत एका वेळीं जवळ जवळ ३००,००० निर्वासित रहात होते. जागोजाग पसरलेल्या या छावण्यांतील लोकांना आसरा, अन्न, वस्त्र, वैद्यकीय मदत, इतर आवश्यक गोष्टी पुरविण्यांची तांतडीनें व्यवस्था करणें म्हणजे एक परिक्षाच होती. आलेल्या निर्वासितांची दाटी मुख्यतः पूर्व पंजाब, दिल्ली, मुंबई, युक्तप्रांत, पंजाबी संस्थानें, बिकानेर, जोधपूर या भागांत होती. नोव्हेंबर १९४७ च्या अखेरीला हिंदुस्थानांत केवळ छावण्यांतूनच राहणाऱ्या निर्वासितांची संख्या १२,५०,००० होती. त्यावेळींच ५,००,००० पू. पंजाबमध्यें, २,५०,००० कुरुक्षेत्रामध्यें, १५०,००० दिल्लीमध्यें व उरलेले इतर प्रांतांत होते. केवळ या प्राथमिक गरजा भागवण्याच्या कामाकरितांच डिसेंबर १९४७ मध्यें दहा कोटी रुपयांच्या रकमेला मान्यता देण्यांत आली. अमृतसर, गुरुदासपूर, फिरोझपूर, लुधियाना, जालंदर, होशियारपूर, हिस्सार, रोहटक, अंबाला, कर्नाल, गुरगांव या जिल्ह्यांतून छावण्या उघडल्या होत्या. लुधियाना व अंबाला जिल्ह्यांत प्रत्येकी एकच छावणी होती, तर गुरुगांव जिल्ह्यांत चाळीस छावण्या होत्या.

त्यावेळीं साऱ्या देशांत मिळून जवळजवळ १६० निर्वासितांच्या छावण्या होत्या. व त्यात सुमारे १,२५०,००० निर्वासितांची व्यवस्था होते. त्यांची वाटणी खालील प्रमाणें—

| | | | |
|---|---|---|---|
| पूर्व पंजाब | ... ... ... ८५ छावण्या | ... ... | ७२१,३९६ निर्वासित |
| फरीदकोट, उदेपूर<br>इंदूर, अलवार<br>ग्वाल्हेर रेवा<br>रतलाम वगैर संस्थानें | ... आंकडा आला नाहीं | ... | ५३,००० ,, |
| मुंबई | ... ... .. ... ३२ ,, | ... ... | १३,००० ,, |
| संयुक्तप्रांत | ... ... ... ३१ ,, | ... ... | ३०,००० ,, |
| मद्रास | ... ... ... ३ ,, | ... ... | ६०० ,, |
| मध्यप्रांत | ... ... आंकडा आला नाहीं | ... | १,५०० ,, |

वरील आकडे केवळ छावणीतील निर्वासितांचे आहेत. वरील व्यवस्थेंत नंतर बराच बदल झाला आहे. डिसेंबर १४ ला लष्करी स्थलांतर संघटनेनें सामुदायिक स्थलांतराचें कार्य संपवलें. त्यावेळीं बंगाल सोडून इतर भागांतून ४३,६२,००० इतके निर्वासित आणले गेले होते. छावण्यांतून आसरा घेत-लेल्यापैकीं आतां मुंबई प्रांतातल्या छावण्यांच्या लोकसंख्येचे आकडे असे आहेत.

| भाग | छावण्या | लोकसंख्या |
|---|---|---|
| बृहत् मुंबई | चेंबूर | १०,१८७ |
| ,, | नारी सेवासदन कुर्ला | ८०६ |
| ठाणें | पावरी | १,७२४ |
| | विरार | ५६० |
| | मुलुंद | १,८७० |
| | H. M. I. S. Akbar | १२,११३ |
| | कल्याण | ७१,६६९ |
| पुणे | उरळीकांचन | २,१५० |
| | पिंपरी | ७,४६६ |
| अहमदनगर | विसापूर | ९,६४० |
| नाशीक | द. देवळाली | १८,५०० |

| भाग | छावण्या | लोकसंख्या |
|---|---|---|
| | जवाहर छावणी, देवळाली ... ... ... | ८,६९९ |
| | Lake Beale ... ... | १९,९८५ |
| अहमदाबाद ... ... | तलिया मिल्स, दारियापूर, शहापूर ... ... | ३,६१७ |
| ,, ... ... | साबरमती ... ... ... | २,४६७ |

यांतहि कांहीं बदल होत आहेत. झाले आहेत.

छावणीतल्या निर्वासितांना, मोफत आसरा, अन्न, कपडे, वैद्यकीय मदत, स्वच्छतेची व्यवस्था, साबण, काड्याच्या पेट्या अशा गोष्टी पुरवाव्या लागतात. लहान मुले व गर्भवती स्त्रियांना वेगळे अन्न देण्याची व्यवस्था लागते, थंडीच्या मोसमांत वेगळे कपडे दिले जात होते.

## प्राथमिक गरजा

### अन्न

नेहमीच्या शिधापद्धतीची अंमलबजावणी छावणींत नंतर केली जते. प्रथम आल्याबरोबर व्यवस्था होईपर्यंत, मोफत अन्न पुरवले जाई. शिधापद्धतीत अन्न पुरेसें व चांगल्या दर्जाचे मिळत नव्हते अशी त्यावेळची साऱ्या देशांतच तक्रार होती. त्याला छावण्या तरी कशा अपवाद होतील, परंतु साऱ्या छावण्यांतून पुरेसे अन्न दिले जाई. अन्न नाहीं अशी तक्रार कोठेच आढळली नाहीं. अर्थातच बदलत्या प्रांताबरोबर बदलत्या चवीचा प्रश्न येणारच. उदाहरणार्थ, आज मुंबई प्रांतांत राहिलेले सिंधी लोक आहेत त्यांची मागणी हीच असते कीं, तांदूळ कमी करा पण गहू जास्त द्या, ह्या डाळीच्याऐवजीं दुसरी डाळ द्या पण या मागण्या थोड्या सवडीनंतर पुऱ्या केल्या गेल्या. ज्याला अन्नाची प्राथमिक गरज म्हणता येईल अशी कोणत्याच छावणीत नव्हती. नेहमीच्या अन्न पुरवठ्यापेक्षां केवळ ऑक्टोबर नोव्हेंबर १९४७ करितां फक्त पूर्व पंजाबला २८००० टन धान्य

जास्त द्यावे लागले. त्यावेळी योजनेप्रमाणें हे धान्य पश्चिम पाकिस्ताननें द्यावयाचें होतें. कुरुक्षेत्राच्या छावणीचा अन्न पुरवठा अन्न खात्यानेंच उचलला होता. याचा अर्थ त्या छावणीला रोज सुमारें ८० टन आटा पाठवावा लागत असे. तेथपर्यंत सुमारें २१० टन दुधाची भुकटी छावण्यांतून वाटण्यात आली होती, जरी दोन्ही सरकारांनी सर्व निर्वासितांना सारख्या प्रमाणांत अन्न पुरवठा करण्याचें कबूल केले होते तरी सुद्धा हिंद सरकारला, जारनवाला, बलोकी, खुदियन, चुनियन वगैरे पश्चिम पंजाबातील कैक ठिकाणीं हवाई दलाकडून अन्न टाकावें लागलें. याशिवाय लष्करी स्थलांतर संघटनेनें अन्न पुरवठा केला तो वेगळाच.

## वस्त्र

साधारणपणें नेसत्या वस्त्रांची चणचण फार क्वचित भासली पण ज्याला पांघरुण म्हणतां येईल अशा तऱ्हेच्या कपड्यांची व कापडाची व्यवस्था हा विशेषतः थंडीच्या मोसमांत कठिण प्रश्न झाला होता. अर्धपोटी माणसाला पंजाबातली थंडी सोसणे जरा जड्च त्यामुळें ज्यांच्याजवळ गरम कपडे अथवा पुरसे लोकरी पांघरुण नव्हते त्यांचे विलक्षण हाल झाले असते. कैक दिवसांच्या अर्धपोटी माणसांची कित्येक मैल चालून आल्यावर किती दुबळी अवस्था झाली असेल याची कल्पनाच होत नाही. त्यामुळें त्यांची सर्वांत मोठी गरज लाखो रजया, रग, पांघरुणें, कपडे यांची होती. त्यामुळें निर्वासितांच्या खात्यानें हा प्रश्न तावडतोब हातांत घेऊन लाखो रजया व कांबळी फुकट वाटण्याकरितां पाठवली. नव्या करितां मागण्या नोंदवल्या व जर्सी व जाकीटें यांचाहि शक्य तितका पुरवठा केला. जवळ जवळ २००,००० पौंड इतकी लोकर निरनिराळ्या प्रांतांत विणून कपडे मिळवण्या-करितां पाठवण्यात आली. केवळ पंजाब आणि दिल्ली भागांत १४ डिसेंबर पर्यंत २६६,७०३ व ७९१,९१० इतक्या रजया व कांबळी वाटण्यात आली. याशिवाय शर्टिंग, मलमल, खाकी, ड्रिल वगैरे अनेक प्रकारच्या कापडाचा पुरवठा करून तयार कपडे शिवून घेण्यांत आले आणि हा पुरवठा केवळ पूर्व पंजाबातच करावयाचा होता असे नव्हे तर १०००० ब्लँकेटें पश्चिम

पंजाबकरितां लाहोर येथील संघटनाधिकाऱ्यांकडे पाठवण्यांत आली. सरगोधा आणि इतर जिल्ह्यांत असलेल्या अल्पसंख्याकांच्या करितां त्यांचा उपयोग करण्यात आला. साधारणपणे प्रत्येकाला एक रजई, एक पायजम्याची जोडी किंवा सलवार (फक्त स्त्रियांकरितां) शिवाय कुर्ती, किंवा दुपट्टा (स्त्रियांकरितां) बंडी वगैरे इतके कमीतकमी कपडे असत. पुढें प्रत्येक कुटुंबांत जेवढी माणसें असतील त्याच्या ३।४ इतके कापड द्यायचे किंवा प्रत्येकी गुण (Marks) देऊन त्या प्रमाणांत वस्त्रवांटप करायचे अशा योजना कुरुक्षेत्र व इतर छावणीत करण्यांत आल्या. स्थलांतरनंतराच्या पहिल्या थंडीच्या मोसमांत केवळ सरकारी खात्याचे वतीनेंच १४००,००० रजया, ३५०,००० ब्लँकेटें, १५०,००० जर्सी व २,०००,००० कापडाचे सुटे तुकडे इतके वाटण्यांत आले. कांपड वाटपामुळे प्रत्येकाला समाधानकारक जरी नव्हे तरी आवश्यक तेवढे कपडे व पांघरुणें मिळालीं.

## आसरा

आलेल्या निर्वासितांच्या प्राथमिक गरजांपैकीं आसरा ही अत्यंत कठीण अशी समस्या होऊन बसली होती. याचें कारण पश्चिम पंजाबांत जीव व वित्त इतके धोक्यांत होते कीं, शक्य तितक्या लवकर त्यांना हिंदुस्थानांत आणावे लागत होते. तेहि पश्चिम पंजाब सरकारनें सुचवलेल्या केंद्रापासून ते पूर्व पंजाब सरकारनें सुचवलेल्या केंद्रापर्यंत. कैक वेळीं दळणवळणाच्या अपुऱ्या व्यवस्थे-मुळें गोंधळ होई व येणाऱ्या निर्वासितांची संख्या तर येवढी मोठी असे कीं त्यांची तावडतोब कोठें तरी राहण्याची व्यवस्था करणें अशक्य होऊन बसे गाड्या भरभरून लोक येत, पायीं येत. दिल्ली शहरांत तर राहण्यालाच काय पण थोडा वेळ बसण्यालासुद्धां योग्य नसलेल्या जागा राहण्याला वापरल्या जाऊं लागल्या. आठवड्यांच्या आठवडे लोक स्टेशनवरच राहूं लागले. नोंदणीच्या वेळीं कुठें राहतां ? या प्रश्नाला प्लॅटफॉर्मवर वा फुटपाथवर हें उत्तर अगदीं नेहमींचे झालें होतें. हा लोंढा आवरण्याकरितां तावडतोब व्यवस्था करणें अगत्याचे होते. पं. नेहरू यांनीं दिल्लींतील निर्वासितांच्या निवाऱ्याची सोय एका आठवड्यांत

होईल असें आश्वासन दिलें. त्याप्रमाणें दिल्लीच्या पुराण्या किल्ल्याचें रूपांतर छावणींत करण्यांत आलें. तेथें वीज, इस्पितळ वगैरे व्यवस्था केली गेली. शिवाय दिल्ली शहराच्या इतर भागांतहि जागोजाग छावण्या टाकल्या गेल्या. गेलेल्या मुसलमानांनीं सोडलेल्या रिकाम्या जागा, सार्वजनिक संस्था, मंदिरें, बराकी जी जागा मिळेल त्यांत निर्वासितांची व्यवस्था करण्यांत आली. याशिवाय कैक निर्वासित आपल्या आप्त वा स्नेही यांच्याकडे राहात होते. अमृतसरपासून कर्नालपर्यंतच्या रेल्वे रस्त्यावरच्या बहुतेक सर्व मोठ्या स्टेशनावरून निर्वासितांची गर्दी झाली होती. यानंतर १८१,५४८ इतक्या तंबूंची व्यवस्था करण्यांत आली. यांपैकीं बहुतेक लष्करानें दिलेले होते. परंतु ७००,००० माणसांची व्यवस्था करण्याला इतके तंबू अगदींच तोकडे पडत. अमृतसर, जालंदर, लुधियाना, फिरोझपूर येथें कायम स्वरूपाच्या तंबूंच्या छावण्या उभारण्यांत आल्या. तेथें पाणी, स्वयंपाक घरें, स्नानगृहें, संडास, इस्पितळें, क्रीडांगणें, भाजी लावायला वाफे वगैरेची सुंदर व्यवस्था केली गेली. अशाच तऱ्हेचे आणखी कांहीं कॅम्प्स वसवले जात होते. कायम स्वरूपाच्या या छावण्या सोडल्या तर नेहमींच्या छावण्यामध्यें तंबूंतील राहणें काय त्रासाची व अडचणीची, विशेषतः इतक्या दाट वस्तींत व पावसाळ्यांत याची कल्पना अनुभवावांचून येणें कठीण. पण वैद्यकीय मदत प्रथम थोडी असूनहि, क्वचित निवारा नसूनहि, रोगराई उपासमार अगर निवारा नसल्यानें होणारी मृत्युसंख्या लक्षांत घेण्याइतकीहि नव्हती हें एक आश्चर्यच आहे. अजूनहि निवाऱ्याचा प्रश्न भेडसावीतच आहे. कायम स्वरुपाच्या छावण्यांचा प्रश्न तावडतोब हाताळाला गेला पाहिजे. पुनर्स्थापनेचे काम ही याची पहिली पायरी आहे. मुंबई व मध्यप्रांत वगैरे भागांत पूर्व पंजाब इतकी निर्वासितांची दाटी नसली तरी त्यांच्या निवाऱ्याचा प्रश्न कठिणच आहे. जोपर्यंत त्यांच्या कायम वस्तीचा भाग ठरला नाही. तोंवर त्यांच्या निवाऱ्याची व्यवस्था करणेहि शक्य होत नव्हते. परंतु आतां त्यांची प्रांतावर वाटणी झालेली आहे. तेव्हां आलेल्या निर्वासितांना तंबूचे कायमचे रहिवासी न करता त्यांच्या निवाऱ्याची व्यवस्था करणे प्रत्येक प्रांतिक सरकारचे कर्तव्य आहे. आतां जागोजाग तात्पुरती घरांची व्यवस्था केली जात आहेत. व निर्वासितांच्याकरितां

वेगळ्या, कॉलनीज ' स्थापल्या जात आहेत. जर त्यांना जन्मभर शरणार्थी म्हणून वेगळे ठेवायचे नसेल तर त्यांची राहण्याची वस्ती रानटी वनवासी जमातींच्या सारखी दूर कोठे तरी न ठेवता तत्प्रांतीय लोकांच्या मोठ्या वस्तीच्या जवळपास ठेवावी म्हणजे संस्कृतिसंगम शक्य होईल. नाहीं तर विनाकारण तेढीला वाव सांपडतो.

## वैद्यकीय मदत

फाळणीमध्यें झालेल्या वाटणीमध्यें लाहोर येथील वैद्यकीय साहित्याचा मोठा सांठा पाकिस्तानकडे गेला. त्यामुळें मुंबई, कलकत्ता इतक्या लांबून वैद्यकीय साहित्य मागवावे लागले, नंतर कर्नाल व नवी दिल्ली येथे अशा तऱ्हेचे साठे ठेवण्यांत आले. आरोग्य खातें, लष्करी मदत यामुळे रोगराई दूर ठेवणे पुष्कळ सुकर झालें. आरोग्यखात्यानें तर पाकिस्तानला ३१४०,१०० व ज्या संस्थानातून निर्वासित गेले त्यांना २२०,००० इतकीं प्रतिबंधक औषधें पाठवली. अमेरिकेनें ३०० पौंड व कानडाचे ९३ पौंड पेनिसिलिन पाठवून हिंद सरकाराला मदत केली. हिंदुस्थानांतील कैक संस्थांनी स्वयंसेवक, डॉक्टर्स, व नर्सेस पाठवल्या व देवी, कॉलरा वगैरे रोग प्रतिबंधक लसी लगेच टोचण्याचे काम सुरु झाले. एक वेळी बलोकी हेडवर्क्स वरून येणाऱ्या पायदळी काफिल्यास एका दिवसांत ६०,०००, या गतीनें ही लस टोचण्यांत आली. प्रत्येक छावणींत इस्पितळ स्थापन करण्यात आले होते व अवश्य ती वैद्यकीय मदत विनामूल्य पुरवण्यांत येत होती.

## छावण्यांतील लोकसंख्या

१९४८ च्या जूनमध्ये मध्यवर्ती सरकारनें सर्व निर्वासितांच्या छावण्यांची जबाबदारी प्रांतिक सरकारांच्यावर टाकण्याचा निर्णय जाहीर केला. कुरुक्षेत्र छावणीची व्यवस्था पूर्वपंजाब सरकारकडे देऊन मध्यवर्ती सरकार छावण्यांच्या व्यवस्थेतून मोकळे झाले. नंतरची सर्व व्यवस्था प्रांतिक सरकारांनी बघावयाची होती. जून १९४८ मधे निरनिराळ्या छावण्यातून बाहेर राहणाऱ्या सर्व

निर्वासितांची वांटणी खालीलप्रमाणें होती. जूनमध्यें १०,५५,५०२ निर्वासित निरनिराळ्या प्रांतांत वांटले गेले होते:—

| | |
|---|---|
| पूर्व पंजाब | ४२९,२१३ |
| दिल्ली | ४५,१५५ |
| कुरुक्षेत्र | १७०,००० |
| राजपुताना | ४६,६२३ |
| काठियावाड | २४,९३७ |
| मुंबई | १५८,९७० |
| मध्यप्रांत व इतर | ४३,९३७ |
| संयुक्तप्रांत | १२६,६०७ |

छावण्यांतून न राहणाऱ्या इतर निर्वासितांपैकीं बहुसंख्य निर्वासित पूर्व पंजाबमध्यें आहेत. ४००,००० दिल्लीमध्यें, ५००,००० पश्चिम संयुक्तप्रांतांत आणि आलेल्या ७००,००० सिंधी निर्वासितांपैकीं बहुतांशीं लोक मुंबई मध्यप्रांत आणि राजपुताना संस्थानांत आहेत.

## संधिकाल

सर्व तऱ्हेच्या आपत्तींमधून गेल्यानंतर जवळजवळ भिकारी बनून निर्वासित छावण्यामध्यें आले, व हळूहळू त्यांची व्यवस्था लागू लागली. प्राथमिक गरजा भागवल्या गेल्या. या संधिकाळामध्यें त्यांच्यामध्यें अभ्यसनीय अशा मानसिक घडमोडी झाल्या. अशा विचित्र व हळव्या मनःस्थितींत निर्वासित येत कीं त्यांचे त्यांनाच भान नसे. वृत्तीनें भावनावश असलेल्यांचा तर पुरा तोल गेलेला असे. नोंदणीच्या वेळीं कित्येकांना घरच्या माणसांचीं नांवें आठवत नसत, कोणी स्वतःवरच संतापत असत. कांहींनीं भोगलेल्या अपेष्टा इतक्या तीव्र असत कीं, ते मुकेच राहात आणि एकदां बंधारा फुटून बोलूं लागले कीं, थांबतच नसत. स्वगत भाषणाला मग अंतच नसे. पण अशी उदाहरणें थोडी. अत्याचारांत हळवी झालेली मनःस्थिति लष्कराच्या दमदाटीच्या नेण्याआणण्यांत व छावण्यांतील लष्करी व्यवस्थेंत दुबळी होई. सर्वस्व गेल्यानें, आधार नाहीं अशा भावनेनें

व शरणार्थी, शरणार्थी म्हणून प्रत्येकानें बोलून त्याची मनावृत्तीच न्यूनगंडाची होत होती. त्याचा प्रत्यक्ष परिणाम भिकारी वृत्तींत दिसे. सुरवाती सुरवातीला तर छावणींत कोणीहि चांगल्या कपड्यातील व्यक्तीनें पाय टाकतांच भोवतीं गराडा पडे. त्यांना पैसे नको असत; रेशन, कपडे, कंबल हवी असे. केविलवाण्या मुद्रेनें, धडधाकट माणसानें कोणाच्या पायावर लोळण घेणें हें कशाचें लक्षण आहे? पाहिल्या गरजा भागनांच ही वृत्ति कमी होत गेली. नाहीं तर रोटीकरतां कशाची किंमत द्यायची याचा विवेक स्त्रिया वा पुरुषांना राहत होतांच असे नाहीं. छावण्यांची ही व्यवस्था होतांच त्यांच्या मनाचा लंबक दुसऱ्या टोकाला जाईल कीं काय अशी भीति वाटे. कारण आजवर दया म्हणून मागणारी वस्तू न हक्कानें लुबाडण्याच्या पातळीवर आले होते. सुरवातीला छावण्यांतून मोठा दोष हाच असे कीं, निर्वासितांना पुष्कळच रिकामा वेळ सापडे. या रिकाम्या वेळांत पूर्वीच्या यातनांच्या आठवणी काढून काढून व रिकाम्या मनांतून नव्या नव्या अत्याचाराच्या गोष्टी निर्मून व त्यांचा प्रसार करून सूडाची भावना चेतायला लागली होती. याचे प्रत्यक्ष स्वरूप छावणींतील निर्वासित मुसलमानांच्या गाडीवर हल्ला करायला ते बाहेर पडत असत त्या वेळीं दिसे. आलेल्या लोकांत बिगर धंद्याचे लोक क्वचित भेटत. फारच थोडी गुंड वृत्ती होती. त्यामुळें पंचाना मारणें, छावणीप्रमुखाला वेढणें असे प्रकार घडत. पण ह्या साऱ्या क्वचित सांपडणाऱ्या गोष्टी आहेत. यांतूनच सर्वसाधारण निर्वासितांची निराश, दुःखी; भिकारी, कृतज्ञ, हक्कानें मागणारा असे स्थित्यंतर होत गेले. भारतावर त्यांचा केव्हांहि हक्क आहेच आहे. सर्वसाधारण निर्वासितांनीं साऱ्या व्यवस्थेंत उत्कृष्ट सहकार्य दिले. वरील निरीक्षण मुख्यतः पूर्व पंजाबांतील छावण्यामधील आहे. इतरत्र विशेषतः सिंध व बंगाल यांच्या बाबतींत इतके तीव्र वातावरणच नव्हते. पण छावण्यामधें वाटणारी मनोवृत्ति पुढच्या व्यवस्थेमुळें थांबली व दुःखाचे महान पर्व संपले.

# भौतिक पुनर्स्थापना

"पश्चिम पाकिस्तानांत कोंडलेल्या निर्वासितांना खायला अन्न नसे. भुकेलेली लेकरेंबाळें आपल्या कृश आईच्या अंगाला बिलगत आणि म्हणत 'मा, रोटी!' आई तरी काय करणार? ईश्वरावर हवाला ठेवून आभाळाकडे पहात कोंडीत सापडलेल्या या निर्वासितांकरिता हिंदी हवाई दलाकडून आकाशांतून रोट्यांचा पाऊस येई. भारतांत राहावयाला जागा नव्हती तेव्हां मिळेल ती जागा आपलीच समजून वापरली. कपडे मिळाले. पण येवढ्याने का सारे भागले? खरा प्रश्न तर याच्यापुढेंच आहे!"

## विकेंद्रीकरण

निर्वासितांच्या प्राथमिक गरजा भागवल्या गेल्या आणि पुनर्स्थापनेच्या महत्वाच्या कालखंडाला सुरुवात झाली. त्यांच्या कायम स्वरुपाच्या व्यवस्थेच्या योजना व्हायला लागल्या. पण या सर्वांची पहिली पायरी म्हणजे ज्यांची पुनर्स्थापना करायची त्यांची संपूर्ण माहिती तयार करायला हवी होती. त्याप्रमाणे निर्वासितांच्या नोंदणीची व्यवस्था करण्यांत आली. त्यांच्या व्यक्तिशः मुलाखती घेण्यांत आल्या व पुढें येणाऱ्या सर्व योजनांमध्यें जी माहीति 'ग्रथित' करण्यात आली ती जमवण्यांत आली. त्यांत गरीब, खालचा मध्यम वर्ग, उच्च मध्यम वर्ग, श्रीमान् असे वर्गीकरण करण्यांत आले. स्त्रिया, पुरुष, मुलें—संरक्षित, निराधार

वेगळी नोंदण्यांत आली. पूर्वीचा उद्योग, संपत्ति, विद्या, जेवढी शक्य होती तेवढी सारी माहिती एकत्र करण्यांत आली. जमवलेल्या माहितीचे चिकित्सिकरण व विश्लेषण करून पुनर्वसाहतीच्या योजनांचा पाया भरण्यांत आला. जरी ही व्यवस्था पूर्व पंजाब, दिल्ली या व इतर कांहीं भागांत करण्यांत आली तरी मुंबईसारख्या प्रांतांत ही आवश्यक माहिति अजूनहि जमा करणें शक्य झालेले नाहीं. ही 'ग्रथित माहिती एकदां जमा होतांच पुनर्व्यवस्थेच्या दृष्टीनें पहिलें पाऊल टाकण्यांत आले, ते म्हणजे निर्वासितांचे विकेंद्रीकरण. पूर्व पंजाब, दिल्ली, व थोडाफार संयुक्त प्रांत अशा भागांत निर्वासितांची प्रचंड संख्या एकत्र ठेवणें, आर्थिक, सामाजिक वा त्यांच्या मानसिक दृष्टीनेंहि इष्ट नव्हते, शक्य नव्हते. त्यामुळें या प्रश्नाचा विचार जुलैमध्यें भरलेल्या पंतप्रधानांच्या परिषदेंत करण्यांत आला; व कोणकोणत्या प्रांतांनीं व संस्थानांनीं आपल्या आर्थिक घडींत किती निर्वासित सामावून घ्यावेत याचा निश्चय करण्यांत आला. विकेंद्रीकरणाची ही योजना निश्चित होतांच त्याप्रमाणें प्रांतवार वा संस्थानवार निर्वासितांची पाठवणी होऊं लागली. आलेल्या वाटणींत पूर्व पंजाबमधें, आलेल्या १३००,००० शहरी निर्वासितांशिवाय पूर्व पंजाब व पंजाबी संस्थानें यांनीं पश्चिम पंजाबमधून आलेली सर्वच्या सर्व ग्रामीण निर्वासितांची संख्या सामावून घ्यावी व पश्चिम पाकिस्तानांतून आलेल्या इतरहि पंजाबी निर्वासितांची व्यवस्था करावी असें ठरवण्यांत आले. उरलेल्या निर्वासितांची वांटणी खालीलप्रमाणें करण्यांत आली:—

| | | | |
|---|---|---|---|
| मुंबई ...... | ४००,००० | जयपूर ... | १००,००० |
| संयुक्तप्रांत ... | ३००,००० | दिल्ली...... | १००,००० |
| मध्यप्रांत ... | ३००,००० | सौराष्ट्र ... | १००,००० |
| माळवा ... | २००,००० | बिकानेर ... | ५०,००० |
| मत्स्य ...... | १००,००० | अजमेर ... | ५०,००० |
| उदयपूर ... | १००,००० | जोधपूर ... | ५०,००० |
| | | विंध्य...... | ५०,००० |

नोंदणीच्या वेळीं पुष्कळशा निर्वासितांना (पू. पंजाब) त्यांना कोठे जावयाची इच्छा आहे असा एक प्रश्न विचारण्यांत येत असे. यांत शिखांच्या-

पैकीं बहुतेकांना पतियाळा संस्थानांत जाण्याची इच्छा होती. निदान शिखांना एका गटानें रहावे असे वाटत असे; परंतु ते पूर्णपणानें अंमलांत आणणें शक्य आणि इष्टहि नव्हते. एक सर्वसाधारण धोरण असे दिसले कीं, बहुतेकांना पूर्व पंजाब, दिल्ली, संयुक्तप्रांत या भागांत जाण्याची इच्छा होती. त्यांच्या दृष्टीनें ते बरोबरच होते. कारण एका पठाण हिंदूनें तामीळ प्रांतांत जाऊन राहणें व तेथें मिसळणें फारच कठिण. पण सर्वांनाच या प्रांतांतून जागा तरी कशी मिळायची? संयुक्त प्रांतासंबंधीं बोलतांना एक मंत्री म्हणाले कीं, युक्त प्रांतानें शक्य तितके निर्वासित घेतले आहेत. प्रत्येक माणसाला अवश्य ती अडीच एकर जमीन मिळेल. त्याहून जास्त लोक प्रांतांत आले आहेत. आतां आणखी माणसें पाठवणें म्हणजे स्थानिक शेतकऱ्यावर अन्याय करण्यासारखें आहे. वर निर्देशिलेल्या पंतप्रधानांच्या समितींत झालेली विभागणी ही पुष्कळशी समाधानकारक होती असें म्हणायला मुळींच हरकत नाहीं.

## हे निर्वासित नव्हेत!

निर्वासितांच्या पुनर्स्थापनेचा विचार करण्यापूर्वींच निर्वासित या संज्ञेचा संपूर्ण अर्थ लक्षांत घेणें अवश्य आहे. १५ ऑगस्टपूर्वीं जे लोक आपली सर्व आवराआवर करून पाकिस्तानांत गेले त्यांना हिंदुस्थानांतून कोणीहि घालवलें नव्हतं किंवा जा म्हणून अप्रत्यक्ष सूचनाहि दिली नव्हती. हिंदुस्थानांतील नोकरी सोडून ते पाकिस्तानांतील नोकरी घेत होते. अगदीं साधा सौदा होता हा. त्यांच्याचप्रमाणें १५ ऑगस्टपूर्वीं पाकिस्तानांतून जे पुंजीपति विमानांतून अथवा गाड्यांतून सामान भरभरून लादून आपले किडुकमिडुकसुद्धां घेऊन आले त्यांच्याहि बाबतींत हीच गोष्ट आहे. मात्र अशा हिंदूंचें प्रमाण पाकिस्तानांत जाणाऱ्या मुसलमानांच्या मानानें फार कमी आहे. कांहींहि असलें तरी हे दोन्ही गट केव्हांहि निर्वासित नव्हेत. त्यांना निर्वासितांचे हक्क मागण्याचा कांहींहि अधिकार नाहीं. त्याचप्रमाणें प्रथम वैभवाच्या आशेनें पाकिस्तानांत गेलेले पण तेथील अपेक्षा फोल ठरतांच हिंदुस्थानांत परतणारा मुसलमानांचा एक वर्ग आहे. अशा मुसलमानांना पाकिस्तानमधून बाहेर पडतांना परवाने देण्यांत येत असत व केवळ

तात्कालिक स्वरूपाच्या कामासाठीं कोणी हिंदुस्थानांत येत असेल तर त्यांच्या परवान्यावर तशी नोंद केली जाते असे. एप्रिल, मे व जून १९४८ या दरम्यान सुमारें ५२,००० मुसलमान परतल्याचे कळतं. १९ जुले ते ११ ऑगस्टपर्यंत चालू असलेल्या या पद्धतींत कराचीहून रोज सुमारें ३०० परवाने दिले गेले व लाहोरहून सुमारें २,९९९ परवाने एकूण दिले गेले यावरून परतणाऱ्या मुसलमानांच्या संख्येची कल्पना येईल. या मुसलमानांपैकीं थोडे असे होते कीं, ज्यांना दंग्यामुळें घरदार सोडून जावे लागले पण पुष्कळसे असे होते कीं, जे पाकिस्तान विषयीं उराशी भरमसाट स्वप्नें बाळगून गेले होते व निराश होऊन परत येत होते. या वर्गाला कोणीहि भारतांतून जा म्हटलें नव्हते, तो त्यांचा निर्णय होता. त्यामुळें कदाचित ते कायम वस्तीकरितां म्हणून पाकिस्तानांत गेल्यावर त्यांचा घर सरकारनें ताब्यांत घेतली असतील. आतां ते परत आल्यानंतर त्यावर त्यांचा हक्क राहूं नये. कारण जाण्याचा निर्णय त्यांचा होता. यांना सरकारवर कसलीच जबाबदारी येत नाहीं. त्यांच्या प्रांतांत त्यांना परत आल्यावर राहण्याची जरूर सोय व्हावी पण निर्वासित म्हणून त्यांना कोणतेही हक्क मागतां येणार नाहींत. याची जाणीव त्यांनी व सरकारने कायम ठेवायला हवी.

## पुनर्व्यवस्था

प्रथम दंगे पाकिस्तानांत वा सरहद्दीवर वाढत गेले व हिंदू निर्वासित झाले. त्यांची प्रतिक्रिया म्हणून हिंदुस्थानांत दंगली झाल्या व मुसलमान निर्वासित झाले. निर्वासितांच्या निर्मितीनें नवराष्ट्राच्या पुढे हा नवा प्रश्न उभा टाकला. ह्यापैकीं जे धनवंत निर्वासित होते त्यांनीं आपापला प्रश्न पुष्कळशा प्रमाणांत सोडवला आहे. पण कनिष्ठ मध्यमवर्ग व गरीब वर्ग ह्या वर्गांतील निर्वासितांच्या पुनर्वसाहतीचा प्रश्न मात्र हाताळणें कठीण झालें आहे. त्यांतहि ह्या निर्वासितांच्या पुनर्वसाहतीच्या योजनेंत महत्त्वाचा भाग हा येतो कीं, शहरीं निर्वासितांची व्यवस्था वेगळ्या तऱ्हेनें हवी व ग्रामीण निर्वासितांची व्यवस्था वेगळ्या तऱ्हेनें व्हायला हवी. कारण कराचीमधील व्यापाऱ्याला विजापूर जिल्ह्यांत शेतकरी बनवणें जितके हास्यास्पद तितकेच पंजाबमधील खेडूताला शहरांत ठेवून कर्ज देतो म्हणणें हास्यास्पद

आहे. आणि म्हणूनच आज राष्ट्रावर बोजा म्हणून वाढणारी निर्वासितांची शक्ती उत्पादक श्रमांत रूपांतरित करण्याचें काम अधिक अवघड होऊन बसले आहे. उदाहरणार्थ, पूर्व पंजाबला ६००,००० निर्वासितांची प्रांतांत व्यवस्था करणें शक्य आहे, कारण १९४७ च्या अंदाजाप्रमाणें तेथील मुसलमानांची संख्या ५०००,००० होती. त्यांतील बहुतांशीं लोक गेलेले असल्यानें या नव्या लोकसंख्येला सामील करणें कठीण नाहीं. पण शिरगणतीच्या ठोकळेबाजीनें असे प्रश्न सुटत नसतात—कारण पश्चिम पंजाबमधून आलेल्या हिंदू व शीखांची राहणी, पूर्वपंजाबांतून गेलेल्या मुसलमानांपेक्षां कितीतरी उच्च होती. यामुळें त्याच दर्जाच्या दृष्टीनें त्यांना तेथें कोंबतांना विलक्षण अडचण निर्माण होणार आहे. दुसरी अडचण म्हणजे त्यांच्या धंद्याची भिन्नता. पाकिस्तानांत गेलेल्या मुसल-मानांचें धंदे जवळ जवळ केवळ मुसलमानांचे म्हणूनच असत. म्हणूनच पूर्व पंजाबमधें आलेल्या लोकांचा आज धंद्याच्या दृष्टीनें छेद घेतला तर असें दिसून येईल की, पूर्व पंजाबांत पुष्कळसे सुतार व लाकडावर काम करणारे आहेत पण लोहारांचे प्रमाण त्या मानानें फार कमी आहे. याचें कारण लोहाराचा धंदा पुष्कळसा मुसलमानांच्याचमधें होता. किंवा पोलीस घेतले तरीसुद्धां दिल्लीमध्यें फाळणीनंतर पोलिसांची चणचण भासत होती. म्हणून केवळ लोकसंख्येच्या दृष्टीनें पुनर्स्थापनेच्या प्रश्नाकडे पहातां येणार नाहीं. कारण माणसें हीं मेंढ्या नव्हेत की मोजून या कोंडवाड्यांतून त्या कोंडवाड्यांत घालावीं. त्याचा विचार त्यांचे पूर्वीचे धंद्यांतले ज्ञान, अनुभव, राहणीचा दर्जा व संस्कृति, आहार या सार्‍या दृष्टीनें करायला हवा. पुनर्स्थापना म्हणजे त्यांना मोफत अन्न देणें नव्हे तर त्यांना उत्पादक अशी शक्ती बनवून स्वत:च्या पायावर उभे करणें व आपल्या समाजांत सामील करून घेणें. निर्वासितांच्या पुनर्स्थापनेकरतां त्यांचे शहरी व ग्रामीण असे वर्गीकरण करण्यापूर्वी त्यांची धंदेवार विभागणी कशी आहे हे पहाणें उद्बोधक ठरेल. आलेल्या निर्वासितांची विभागणी खालीलप्रमाणें आहे:—

| धंदा | % | त्यावर काम करणारे व अवलंबून राहणारे एकूण | त्यावर प्रत्यक्ष काम करणारे |
|---|---|---|---|
| १ शेती | ५०·० | २,७५०,०० | ९१६,६६७ |
| २ उद्योग (Industry) | २०·० | १,१००,००० | ३६६,६६७ |
| ३ धंदे (Trade) | १५·० | ८२५,००० | २७५,००० |
| ४ वाहतूक (Transport) | ३·० | १६५,००० | ५५,००० |
| ५ पोलीस | २·० | ११०,००० | ३६,६६७ |
| ६ सार्वजनिक राज्यव्यवस्था (Public administration) | २ ० | ११०,००० | ३६,६६७ |
| ७ Liberal Arts | ३ ५ | १९२,५०० | ६४,१६७ |
| ८ उत्पन्नावर जगणारे | ० ३ | १६,५०० | ५,५०० |
| ९ घरगुती नोकर | २·५ | १३७,५०० | ४५ ८३३ |
| १० इतर | १·७ | ९३,५०० | ३१,१६६ |

## ग्रामीण-निर्वासित शेतकरी

वरील आंकडेवारीवरून हें लक्षांत येईल कीं, शेतजमिनीचे मालक, कसवून घेणारे आणि स्वतः कसणारे, दुसऱ्याच्या शेतीवर काम करणारे, व शेती कामांत मजुरी करणारे ह्या लोकांचा वर्ग मोठा आहे, अर्थातच यांची पुनर्स्थापना शहरांत होऊं शकत नाहीं. त्यांना शहरांत घालून फार तर त्यांचे मजूर बनतील. म्हणून जवळ जवळ पन्नास टक्के असलेल्या या लोकसंख्येचा प्रश्न खेड्यामधूनच सोडवला गेला पाहिजे. पूर्व पंजाबमधून गेलेल्या मुसलमानांच्या रिकाम्या जमिनी आलेल्या निर्वासितांना १९४८ ची रब्बी पिकें येईपर्यंत देण्याचें ठरवण्यांत आलें. त्या जमिनींची वाटणी करतांना गटांच्या पद्धतीनें जमिनी द्याव्या व पश्चिम पंजाबां-तील ठराविक जिल्ह्यांतील लोकांना पूर्व पंजाबांतील ठराविक जिल्ह्यांत जमिनी देण्यांत याव्या असेंहि ठरवण्यांत आलें. परंतु हे नियम इतक्या मोठ्या प्रमाणा-

चर काम करतांना काटेकोरपणानें अंमलांत आणणें अशक्य आहे हें अनुभवानें सिद्ध झालें. गेलेल्या मुसलमानांनीं सुमारें ४,५००,००० एकर जमीन मागें सोडली होती. या उलट पश्चिम पंजाबांतून येतांना मुसलमानेतर निर्वासितांनीं ५,७००,००० एकर जमीन सोडली होती. पूर्व पंजाबांत सोडलेल्या भूमिपैकीं ३,३८०,००० हजार एकर जमीन शेती करण्याच्या दृष्टीनें उपयुक्त आहे. आजवर जितकी जमीन देणें शक्य होते तेवढी दिली गेली आहे. सरहद्द प्रांतांतील लोकांना संयुक्त प्रांताच्या पूर्व भागांत वसवावें अशी एक मागणी होती. परंतु तेथें सरासरी जमिनीचे प्रमाण १५ एकरापासून ५ एकराच्या खालीं घसरल्यामुळें आतां अधिक लोकसंख्या सामावणें अशक्य आहे. ह्या वर्गाचा प्रश्न मुख्यतः सरहद्द, पंजाब या भागांतील शेतकरी वर्गाचा असल्यानें मुंबई प्रांतांत या शेत जमिनीच्या प्रश्नाचा फारसा उद्भव होत नाहीं. मुंबई प्रांतांत आलेले निर्वासित मुख्यतः दलाल, व्यापारी व उद्योगपती असल्यानें त्याच्याकरितां शेतीच्या, कालव्याच्या योजना निरुपयोगी आहेत. त्या निर्वासितांत जे शेतकरी असतील त्यांना कालव्याच्या शेतीची संवय असल्यानें आपल्या इकडील पावसावरच्या शेतीत काम करणे त्यांना अशक्य होत आहे याचा अनुभव सरकारला आलाच आहे.

पण शेतकऱ्याला केवळ जमीन देवून भागणार नाहीं. आज निराधार असलेल्या या शेतकऱ्याला जनावरे खरेदी करणें, खतें, बियाणें यांची आवश्यकता आहे. हे ओझे मध्यवर्ती सरकार, प्रांत व संस्थानें यांनीं उचलावयाचे आहे. पूर्व पंजाबमध्यें याकरितां, १५,७५०,००० इतक्या रुपयांची तगाई कर्जे देण्याची योजना आंखण्यांत आली आहे. यांत बैल खरेदी, घरदुरुस्ती व खते याकरितां वांटणी केली आहे. जवळजवळ ८४,००० टन गव्हाचे बीयाणें निरनिराळ्या जिल्ह्यांत वाटण्यांत आले आहे. शिवाय ओरिसा सरकारकडून ६००० टन व मध्यवर्ती सरकारकडून १००९ टन बियाणें मिळवले आहे. शिवाय सुमारे दहा हजार एकर जमीन नांगरटीखाली आणण्याजोगी व्यवस्था, संपूर्ण साधनासह ट्रॅक्टर्स देऊन, शेतकी खात्यानें ( मध्यवर्ती ) केली आहे. खेड्यामध्यें सहकारी तत्वावर शेती

करण्याचा हा एक नवा प्रयोग केला जात आहे. शिवाय गट व्यवस्थेत कांहि कुटुंबे मिळून जमीन मिळणार असल्याने कुटुंबरचना, खेड्यांची संघटना वगैरे बाबतीत नवा प्रयोग पुष्कळ आशादायक आहे. प्रत्येक कुटुंबाला, १० एकर जमीन मिळेल. येणाऱ्या विवाहित कामकरी मनुष्याच्या बाबतींत तीन एकर व अविवाहित कामकऱ्याच्या बाबतींत दोन एकर जास्त देण्यात येतील. परंतु पांच नवीन माणसांच्या पर्यंतच हा वाढावा देण्यांत येईल. याशिवाय १४ ते १५ हजार एकर बागाईत, डेअरी, व पोल्ट्री वगैरे करिता ठेवण्याची योजना झाली असून त्यांत सुशिक्षित अनुभवी शेतकऱ्यांना प्रथम वाव देण्यांत येईल. संयुक्त प्रांतांत भूमीची वांटणी करून देण्यांत आली असून डेअरी व शेतीच्या योजना होत आहेत. मध्यप्रांतात सुमारे २००,००० एकर जमिनीवर शेतकऱ्यांना वसवण्यांत येऊन सहकारी संस्थांच्या पद्धतीच्या वाटणीची योजना केली गेली आहे. मत्स्य संघातील ५०,००० एकर जमीन तावडतोब लागवडीखाली आणायची असून प्रत्येक कुटुंबाला २० एकर जमीन देण्याची व्यवस्था झाली आहे. झंग जिल्ह्यातून आलेल्या ४०० कुटुंबाना ४००० एकर जमीन अलवार संस्थानात देण्यांत येणार आहे. मध्यवर्ती सरकारकडून येत्या खरीफ मोसमाकारितां २२० ट्रॅक्टर्स मिळवण्याची योजना यशस्वी झाली आहे. पूर्वपंजाबांत जाणाऱ्या व गेलेल्या या ट्रॅक्टर्सकारितां पुरेसे डिझेल तेलहि देण्याची व्यवस्था आतां झाली आहे. तेथें जर टयूबवेलसची (विहिरींची) पद्धत यशस्वी करतां आली तर २००,००० एकर नापीक जमीन लागवडी खाली येण्याची शक्यता आहे. या योजनेचा मध्यवर्ती सरकारने जरूर विचार करावा. याशिवाय फळांची सांठवणी, पाठवणी यासारखे धंदे आहेतच. त्यांनाहि उत्तेजन द्यावे. योग्य दिशेने प्रयत्न केल्यास त्यांत अमूप यश मिळते हें संयुक्त प्रांतांत सिद्ध झाले आहे. गंगा खद्दार हा आजवर ओसाड, टाकाऊ समजला गेलेला भाग आता ट्रॅक्टरखाली आणला गेला आहे. शिवाय मध्यवर्ती सरकारच्या मदतीनें संयुक्तप्रांतांत सुमारे २०,००० एकर टाकाऊ जमीन आतां शेत जमीन ठरणार आहे. जागोजाग खेडुत वस्त्या वसतील. वैयक्तिक मालकी १० ते २० एकरांच्या दरम्यान राहील आणि जमिनीचे वाटणीनें तुकडे होणार नाहींत. नव्या भूमींत नव्या साधनांनीं नांगर घातला

तर सोनें पिकेल. ग्रामीण निर्वासितांत शेतकऱ्यांचा मोठा भाग असला तरी शेतकरी म्हणजेच ग्रामीण निर्वासित नव्हेत. प्रत्येक खेडेगावांत बारीकसारीक धंदे करणारे म्हणजे गवळी, चांभार, लोहार या साऱ्यांचीच व्यवस्था व्हावयाची आहे. परंतु हे धंदे परावलंबी म्हणजे वस्तीच्या दुय्यम गरजा भागवणारे असल्या-कारणानें प्रामुख्याने असणारी कसणाऱ्यांची वस्ती होतांच या लोकांचाहि प्रश्न हळूहळू सुटत जाईल. शिवाय त्यांचे प्रमाणहि पुष्कळ कमी आहे. दर-म्यानच्या काळांत त्यांना शहरी धंदेवाल्यांच्या बरोबरीनेच त्या त्या विषयांत धंदेशिक्षण देण्याची योजना कांही ठिकाणी करण्यांत येत आहे.

शहरी निर्वासितांचा प्रश्न अगदी वेगळा आहे. पुष्कळदा, त्यांना उपाजीविकेच्या धंद्यांच्या शिक्षणाची जरूरी भासते. म्हणून नागरी निर्वासितांच्या पुनर्स्थापनेची योजना वेगळ्याच पायावर व्हावयाला हवी.

## पूर्व पंजाब

पूर्व पंजाबमध्यें १२००,००० ते १६०००,००० इतके नागरी निर्वा-सित आजवर आले आहेत. पूर्व पंजाबमधली शहरें या वस्तीला सामावून घ्यायला अगदी असमर्थ आहेत. शिवाय या वर्गातील लोकांना खेड्यात वसवणे सरकार व निर्वासित दोघांनाहि गैरसोयीचे होत असते. एक वेळ खेड्यातला शेतकरी, धंदेशिक्षण घेऊन शहरात वसवता येईल पण शहरातील—दलाली करणारा अगर कारकून खेड्यात वसवणे जड जाते. मुंबई प्रांतापुढें उभा असलेला प्रश्न अशाच स्वरुपाचा आहे. कारण आलेल्या सिंधी निर्वासितांत मुख्य भरणा नागरी जनतेचा आहे. पूर्व पंजाबचाच विचार करायचा तर आलेल्या नागरी निर्वासितांना संपूर्ण सहाय्य देऊन सुद्धां शहरात जागा देता येणार नाही. प० पंजाब मधून आलेल्या फक्त शहरी निर्वासितांनाच शहरात वसवण्यात येईल हे सारे ठरवून व पार पाडून सुद्धां ५५०,००० लोकांना तातडतोब निवारा देणें कठिण जाईल. मुसलमानांनी सोडलेली घरें, नवीन बांधलेली घरें सारी धरुन-सुद्धां पूर्व पंजाबमध्ये ७५,००० ते १००,००० इतक्या घरांचा तुटवडा

आहे. उपजीविकेच्या दृष्टीनें पाहिले तर, प्रांतात ७००,००० इतक्या शेती-शिवाय इतर धंद्यावर जगणाऱ्या लोकांच्या पुनर्स्थापनेची व्यवस्था व्हायची आहे. हा आकडा केवळ प. पंजाबमधून आलेल्या निर्वासितांचा आहे. नव्या योजनेप्रमाणें सरहद्द प्रांत, बहावलपूर, बलुचिस्तान यामधील पंजाबी लोकांच्या पुनर्स्थापनेचे काम पूर्व पंजाबवरच पडणार असल्यामुळें शेतीवर जगणाऱ्या व इतर अशा दोन्ही गटांची संख्या वाढणार आहे. मुसलमानांचे असे तें धंदे होते, ते बसल्याने व आलेल्या प्रचंड संख्येमुळें, पूर्व पंजाबच्या सामाजिक अर्थजीवनावर विलक्षण ताण पडला आहे. शहरी निर्वासितांच्या उरलेल्या संख्येला कित्येक दिवस तरी तंबूखाली काढणें भाग पडले. जागेची चणचण इतकी भयंकर असल्यानेच फेब्रुवारी १९४८ पर्यंत कैक शिक्षणसंस्था बंद करून त्यांत माणसी ५० चौरस फूट व मुलाला ३० चौरस फूट याप्रमाणें राहण्याची जमीन वाटावयाचा प्रसंग आला होता. वस्तीची वाढ करण्याच्या दृष्टीनें जालंदर, लुधियाना यांची पहाणी पूर्ण झाली असून याच तऱ्हेनें अमृतसर, अंबाला व फिरोझपूर या शहरांची वाढ करण्याची योजना आहे. पूर्व पंजाब मध्यें नवी राजधानी करण्याचा प्रश्न तर समोर आहेच. या साऱ्यामुळे नव्या वस्तीच्या दृष्टीनें राहण्याची जागा बहुतेकांना मिळतु आहे. २५ शहरें वाढविण्याची २००,००० कोटी रुपयांची योजना अतिशय फलदायी आहे.यामुळे पुनर्वसाहतीत राहण्याची जागा, हे पहिले पाऊल तरी यशस्वी रीत्या पडत आहे.

## दिल्ली, संयुक्तप्रांत व इतर

दिल्लीमध्यें नझिमुद्दीन वाढावा, नव्या दिल्लीचा उत्तर वाढावा, किंग्जवे कॅम्पमधली व इतर नवी बांधली जाणारी घरें साऱ्यांचा एकत्रित अंदाज घेतला. सुमारे ८०,००० निर्वासितांच्या राहण्याची व्यवस्था त्यांत झाली आहे. शिवाय १५००० निर्वासितांची व्यवस्था कालकाजी व शेख सराई या भागांत करण्यांत येणार आहे. संयुक्त प्रांतांत १४,००० घरें निरनिराळ्या शहरात बांधण्यात येणार असून अलाहाबाद भोंवती तीन उपनगरे वसवण्याच्या योजनेचा विचार चालू आहे. मध्य प्रांतात सुमारें ३००० घरें बांधण्यात येणार आहेत. मध्य प्रांतात

हा प्रश्न महत्वाचा आहे. याचे कारण मध्य प्रांतात येणाऱ्या निर्वासितांपैकीं ८०% निर्वासित व्यापारी (Traders) आहेत. मत्स्य संघातहि घर बांधणीच्या प्रश्नाचा विचार ठरला असून लहान लहान शहरें वसवावयाची व्यवस्था होत आहे. मुंबई प्रांतात तर हा प्रश्न जास्तच महत्वाचा आहे. कारण आलेल्या निर्वासितांपैकीं वर म्हटल्याप्रमाणें बहुतेक निर्वासित नागरी आहेत. ज्या वरच्या वर्गातील लोकांना जागा मिळवणें शक्य होते त्यांनीं मिळवलीच आहे अनेक लोक नको असलेले पाहुणे बनून आप्तांच्याकडे राहात आहेत. सुमारें १७ छावण्यांत विभागलेल्या लोकांना कायमची जागा देण्याचा प्रश्न आज मुंबई सरकारपुढें आहे. बहुतेकांना तंबूतून काढून तात्पुरती घरें, टिनशेड्स किंवा, गोल घरें यांत हलवले आहे. कांहींची बराकींतूनहि व्यवस्था करण्यांत आली आहे. परंतु लष्करी अधिकाऱ्यांना कांहीं बराकी परत हव्या आहेत. आणि आज असलेल्या शेडस किंवा छोटे आसरे हे कायम राहण्याच्या दृष्टीनें [illegible] आहेत. मुंबई सरकार घर बांधणी, शहरें व उपनगरें यांच्या वाढीचा विचार करत आहे असे कळतें. पण खरा प्रश्न योजनांचा नसून त्या अंमलांत येण्याच्या वेगाचा आहे.

क्र. ५९०९

## नोकरी आणि धंदेशिक्षण

नोकरी देणारी केंद्रे दिल्ली, सिमला येथ उघडण्यात आली आहेत. शिवाय पूर्वपंजाब आणि ५० संयुक्त प्रांतात व मुंबई येथें एक खास केंद्र उघडण्यांत आले आहे. कित्येक निर्वासितांची या केंद्रात नोंदणी होऊन पुष्कळांना नोकऱ्याहि मिळाल्या आहेत. एक 'बदली खातें' निर्माण करून सर्व खात्यांना कळवण्यात आले आहे कीं, निर्वासितांपैकीं कोणाला घेणें शक्य नाहीं अशी खात्री झाल्यानंतरच इतरांना नोकऱ्या देण्यांत याव्या. १५ जानेवारी १९४८ पर्यंत बिहार, मुंबई, मध्यप्रांत आसाम, मद्रास, सारी केंद्रें मिळून ५०,५८४ पुरुष व १,२९५ स्त्रियांची नोंदणी करण्यांत आली. धंदेवारीची कल्पना येण्याकरतां त्यांची विभागणी पाहाणें बोधप्रद आहे. यामध्यें वऱ्हाड, दिल्ली, पूर्व पंजाब, संयुक्त प्रांत, पश्चिम बंगाल यामधील केंद्रांची सुद्धां आकडे-

वारी गृहीत धरलेली आहे. या साऱ्या आकडेवारीवरून आलेल्या निर्वासितांच्या धंदेवार विभागणीची कल्पना जरी आली नाहीं तरी नोकरी केंद्रांत कोणच्या वर्गातले लोक बहुधा येतात व त्यांची वाटणी कशी आहे व कितीकांना नोकऱ्या देणें शक्य आहे याचा विचार करणे शक्य होईल. त्यांचे वर्गीकरण असें आहे.

| | पुरुष | स्त्रिया |
|---|---|---|
| तांत्रिक (Technical) ... | १३,२५४ ... | ६०९ |
| कारकून व तत्संबंधी ... ... | २३,९०७ ... | ५९२ |
| शेतीवरचें मजूर ... ... | २२९ ... | २९ |
| जमिनीची गरज असणारे शेतकरी ... | १८२ ... | |
| घरगुती नोकर ... ... | ६८५ ... | ३८ |
| अकुशल कारखानी मजूर ... | ७९६ ... | २ |
| बाहेरचें काम ... ... | १,७१८ ... | ३२ |
| अकुशल सरकारी नोकर ... | ५,८१५ ... | ५० |
| वसाहतींत काम करणारे ... | ४७९ | |
| दुय्यम अधिकारी ... | ४८ | |

यामध्यें दिल्ली व अजमेर मारवाड या केंद्रांतून २२,०३७ इतकी माणसें नोंदली गेली व १,२३९ लोकांना नोकऱ्या देण्यांत आल्या. पूर्व पंजाबमध्यें ३९,३६४ नोंदली, ७९४२ ना नोकऱ्या दिल्या, पश्चिम बंगाल व आसाममध्यें ४० नोंदली व ३ ना नोकऱ्या मिळाल्या. बिहार ओरिसामध्यें ३६८ माणसें नोंदली व २१ ना नोकऱ्या दिल्या. मुंबईमध्यें ४,४८७ नोंदली, व १,०६५ ना नोकऱ्या मिळाल्या. मध्यप्रांत वऱ्हाडमध्यें ७४७ पैकीं ९१ ना नोकऱ्या दिल्या. मद्रासमध्यें १२६ पैकीं आठानाच मिळाल्या. आणि संयुक्त प्रांतांत ८,८९९ पैकीं १ ४२८ लोकांना नोकऱ्या दिल्या गेल्या. हीं सर्व केंद्रें मिळून जून १९४८ पर्यंत ७२,७९४ लोक नोंदले गेले व ८७२६ ना नोकऱ्या दिल्या गेल्या. १,०४१ स्त्रिया नोंदल्या गेल्या व ५९८ ना नोकऱ्या दिल्या गेल्या. विशेष शाखांत कुशलता

मिळवलेल्या लोकांकरतां एक वेगळे नोकरी केंद्र स्थापन करण्यांत आले आहे. पूर्व पंजाबमध्यें तर पुढील दोन वर्षांत प्रत्येक नोकरींत निर्वासिताला प्रथम वाव असावा अशी सरकारी आज्ञा आहे. अशाच स्वरूपाच्या विनंत्या सर्व प्रांतिक व संस्थानी सरकारांच्याकडे मध्यवर्ती सरकारकडून करण्यांत आल्या आहेत. ही सारी आकडेवारी देण्याचा एकच उद्देश आहे तो असा कीं, शेतकऱ्यांचा प्रश्न जमिनीमुळें सोडवला जातो, व्यापाऱ्यांचा प्रश्न भांडवल देऊन सुटतो पण नोकरी वा रोजंदारी पेशाच्या या कनिष्ठ मध्यम व गरीब वर्गाचे प्रश्न सोडवणें फार कठिण होऊन बसते.

शिवाय या सान्यामध्यें थोडयाशा कुशलतेची आवश्यकता असल्यानें त्यांच्या त्या त्या धंद्यामधील शिक्षणाची व्यवस्था करणें जरूर आहे. म्हणून अर्धकुशल व कुशल निर्वासितांच्या धंद्राशिक्षणाची व्यवस्था करण्याची योजना करण्यांत आली. पूर्वी लष्करांतून निवृत्त झालेल्या लोकांकरतां जे शिक्षणाचे मध्यवर्ती केंद्र होतें त्या केंद्रांत ४००० ज्या वर निर्वासितांची व्यवस्था करण्यांत आली. थोडयाशा शिक्षणानंतर रेल्वेच्या कारखान्यांतून पुष्कळ मोठी संख्या घेणें शक्य आहे. याचा विचार तांतडीनें व्हायला हवा. बहुतेक निर्वासित छावण्यांतून उत्पादक धंदे शिकवणारी केंद्रें निर्माण करण्यांत आलीं आहेत तिथें त्यांना कांतणें, विणणें वगैरे अनेक धंदेविषयक ज्ञान दिलें जातें. जवळजवळ २७ निरनिराळ्या धंद्याच्या प्राथमिक शिक्षणाकरितां लागणारे सामान सरकारनें पुरवलें आहे. पूर्व पंजाबमध्यें पुनर्स्थापनेकरितां लागणारे लोक शिकवण्याकरितां एक तांत्रिक व धंदेशिक्षणाची योजना करण्यांत आली आहे. अजमेर, मारवाड, दिल्ली, पूर्व पंजाब यांतील मिळून शिवाय नवी चार केंद्रें उघडून त्यांत निरनिराळे बारा धंदे शिकवले जातील. यांत धातूचे काम, विटा ओतणें, फिटिंग, शिवणकाम, गॅसचें काम, घडयाळ दुरुस्ती वगैरे प्राथमिक जरूरीचे धंदे आहेत. या योजनेंत २,२७२ विद्यार्थ्यांचा समावेश होणार असून शिक्षणकाल सुमारें सहा महिन्याचा राहील. सारी केंद्रें मिळून आतांपर्यंत २४५० विद्यार्थ्यांचें शिक्षण संपन आलें असून आणखी २००० नव्या विद्यार्थ्यांची सोय करण्यांत येत आहे. हें सारें शिक्षण देण्याकरितां १२० शिक्षकांच्या

करितांहि एक योजना करून ते निर्वासितांतून घेऊन त्यांची पुनर्स्थापना करण्याचे ठरत आहे.

याशिवाय ‘ ऑल इंडिया स्पिनर्स असोसिएशन ’ च्या योजनेप्रमाणें ५० सूत कांतणीची केंद्रें चालवायची असें ठरले आहे.यातील प्रत्येक केंद्रात २००० नियमित कामकरी विणकर तर राहतीलच पण १००,००० कुटुंबाना पोषक काम मिळून ६० यार्ड कपडाहि दर-कुटुंबी मिळत जाईल. शिवाय १०,००० विणकर व २००० सुतार व २६० इतर कामकऱ्यांनाहि या योजनेनें काम मिळणार आहे. त्यांच्याच दुसऱ्या योजनेप्रमाणें १४०,००० माणसें सहा महिन्यांत पांच केंद्रांतून तयार व्हायची आहेत. प्रत्येक केंद्रांत २००० चरखे काम करतील. शिवाय खेडुतांच्या धंदेशिक्षणांत याचा समावेश करण्यांत येईल.

## कर्जें व सहकारी संस्था

प्रांतीय पंतप्रधानांच्या गेल्या बैठकींत असे ठरवण्यांत आले कीं शक्य तो निर्वासितांना देण्यांत येणारी कर्जें सहकारी संस्था व गटाच्या तत्त्वावर देण्यांत यावीत. खुद्द दिल्लीमध्यें आलेले सर्व अर्ज मिळून १,५०,००,००० रुपयांच्या कर्जाची मागणी करण्यांत आली. पण वाटण्याकरतां असलेली रक्कम तर केवळ १५,००,००० रुपयांची आहे. तेव्हां सर्वांत उत्तम मार्ग हाच कीं, सहकारी तत्त्वावरच कर्जें देण्यांत यावीत. या दृष्टीनें सरकारनें पहिले पाऊल उचलून या खात्याच्या हातीं १०,००,००,००० रुपयांची रक्कम दिली. दिल्ली येथील व्यवस्थेकरतां १४,५०,००० ची रक्कम दिली आहे. याचप्रमाणें इतरहि प्रत्येक प्रांताला कर्जाऊ देण्याकरतां रकमांची वाटणी करण्यांत आली आहे. दिल्ली पासून दहा मैलांवर असलेल्या सावित्रीनगरांत एक आदर्श खेडे सहकारी तत्त्वावर वसवण्याचा प्रयत्न केला जात आहे. सहकारी संस्थांच्या शिक्षणाकरतां १०० निर्वासित पदवीधरांची शिक्षणाची सोय करण्यांत आली आहे. याचा फायदा उघड आहे. वैयक्तिक जबाबदारीवर दिलेल्या कर्जापेक्षां सहकारी पद्धतीनें दिलेले कर्ज अधिक उत्पादक ठरतें. को-ऑपरेटिव्ह बँकांच्या मदतीचीहि व्यवस्था केली जात आहे.

व्यक्तिशः अडचणी भागवण्याकरतां पूर्व पंजाबमध्यें ५,०००,००० रु. ची रक्कम मंजूर करण्यांत आली असून यापैकीं १५००,००० प्रत्येकीं जास्तीत जास्त ५००।– याप्रमाणें लहान व्यापारी, दुकानदार यांना देण्यांत यायचे असून प्रत्येकीं रु. ५०००।– या प्रमाणांत लहान उद्योगधंद्यामध्यें ३५००,००० रुपये वाटले जायचे आहेत. मध्यवर्ती योजनेंत ५०,०००,००० रु चें भांडवल असलेली ' रिहॅबिलीटेशन फिनान्स कार्पोरेशन ' रिझर्व बँकेच्या मदतीनें निर्माण करण्याचे ठरले असून त्याप्रमाणें या संस्थेला ५ ते १० हजारापर्यंत कर्ज देण्याचा अधिकार दिला आहे. हिंदी पार्लमेंटनें संमत केलेल्या बिलाप्रमाणें सात कोटीपर्यंत कर्ज देण्यांत येईल. शिवाय या संस्थेला बँका अगर तशा कर्जे देण्याऱ्या संस्थाना, निर्वासितांना दिलेल्या कर्जांत तोटा झाल्यास पन्नास टक्के तोटा सोसण्याची हमी देतां येते. एकूण सुमारें १० कोटीचा व्यवहार या संस्थेला करतां येईल. कांहीं कर्जांना दुसऱ्या वर्षापासून व्याज घेण्यात येईल. कर्जाची मुदत दहा वर्षे ठरवण्यांत आली असून व्याजाचा दरसुद्धां निश्चित करण्यांत आला आहे. घरगुती धंदे, छोटे कारखाने व दुकाने काढूं इच्छिणाऱ्यांना ५००० पर्यंत व डॉक्टर, वैद्य, हकीम, वकील वगैरे लोकांना तीन हजारापर्यंत व इतरांना ५०० पर्यंत कर्ज देण्याचे ठरवण्यांत आले आहे. याशिवाय निर्वासित असल्याचा दाखला दाखवणें वगैरे इतरहि अटि घालण्यांत आल्या आहेत. डॉक्टर, वकील वगैरे वर्गाची स्थैर्याच्या दृष्टीनें सोय करण्याकरतां ' बारच्या अटी ' व ' प्रॅक्टिसच्या कांहीं अटी ' फी वगैरेत सवलत देण्यांत आली आहे.

## बँका व इन्शुअरन्स

पाकिस्तान व हिंदुस्थान सरकारच्या सहकार्यानें व दोन्ही राज्यांतील बँकांच्या सहकार्याने पैशाच्या देवाण घेवाणीचा व्यवहार सुरळीत होण्याची व्यवस्था झाली आहे. बँकांतील शिलकी खातीं, पोस्टातली रक्कम, डिफेन्स व नॅशनल सेव्हिंग सर्टिफिकेट्स याबाबत परस्परांच्या पोस्टातून वा बँकातून मागणी करण्याची सुविधा झाली आहे. खातीं बदलून घेण्याचीहि व्यवस्था होत आहे

दंगलीच्या काळांत ज्यांना इन्शुअरन्सचे हप्ते भरता आले नाहींत त्यांचा अगर इतर अडचणींचा सवलती देऊन विचार करण्याचे आश्वासन बहुतेक कंपन्यांनीं दिले आहे. अर्थातच या सार्‍या गोष्टी सोई सोईनें व कलावधीनें होणार्‍या आहेत

आलेल्या निर्वासितांचे उच्च वर्ग, मध्यम वर्ग व कामकरी असे ढोकळ भाग पाडले तरीसुद्धा या प्रश्नाची सोडवणूक किती अवघड आहे हें लक्षांत येईल. वरचा वर्ग आपल्या पायावर उभा राहील. शेतकरी, कामकरी काम मिळ. वतील. परंतु बारीक सारीक धंदेवाल्यांचा प्रश्नच मोठा बिकट भासतो. या वर्गांत छावण्यातून मुख्यत: शिक्षक, डॉक्टर अकाउंटंट, विक्रेते, कारकून, स्वैपाकी विणकर, शिंपी, धोबी, मिस्त्री, व घरगुती नोकर हे वर्ग सांपडतात. छोटे धंदे सोडले तर कामकर्‍यांच्या करतां लोकलबोर्ड वगैरेमधून, नवीन बांधणी, रस्ते· बांधणें, वगैरे, व प्रांतिक व मध्यवर्ती सरकारने सार्वजनिक हिताची कामे काढा· वीत. मध्यवर्ती सरकारतर्फे उत्पादन शक्तीच्या वाढाव्याचा, बीजवाढाव्याचा ६६ कोटीचा राष्ट्रीय व प्रांतिक रस्ताबांधणी, शहरे बांधणी वगैरे कार्यक्रम आहेतच. मुंबई प्रांतात कोयना धरणाची योजना विचारात घेण्यासारखी आहे. या सार्‍यांतून त्यांचा समावेश होईल. 'कॉटेज इंडस्ट्रीजचा' विचार त्या त्या प्रांतांत आढळणार्‍या नैसर्गिक साधनसंपत्तीवर अवलंबून राहील. पूर्व पंजाबमध्यें, विणकाम, डेअरी, तंबाखू, वनस्पतीजन्य तूप, खेळणी, कागद वगैरे धंद्याच्या योजना आहेत. मोठ्या धंद्यात कापड, छपाई, इन्जिनिअरिंग, लाकूडकाम, रसा· यने वगैरेच्या योजना असून त्यापैकी बर्‍याच सुरूहि झाल्या आहेत. कामगारांच्या करतां मेजर रामचंद्र यांनी अंमलात आणलेली गटपद्धति पुष्कळ उपयोगी पडते असा अनुभव आला आहे. त्याचाहि अभ्यास व्हायला हवा. या पद्धतीने कार्य होत गेल्यास कालावधीने का होईना पण निर्वासितांची व्यवस्था हा आज आंतबट्ट्याचा होणारा व्यापार उद्यांच्या उत्कर्षाची बीजें पेरील.

---

* पाकिस्तान सोडलेल्यांच्या मालमत्तेचे वा नुकसानीचे संपूर्ण आकडे अजून आले नाहीत. एप्रिलपर्यंत रोख रकमेंत नुकसान पुढीलप्रमाणे होते. सरहद्दप्रांत ४६९, ५७२, ७९९, प. पंजाब—६९७५,१५३,०२०, सिंध—११०, २६९,५२०, संस्थानें—६९०,४८,२४४ बलुचिस्तान—३८,५६२,२९९. राहि· लेल्या या स्थावर व जंगम मालमत्तेकरता एक हिंदुस्थान व पाकिस्तान यांची संयुक्त समिति काम करीत असून तीच याबाबत योजनाबद्ध कार्यक्रम आखील.

# सांस्कृतिक पुनर्जन्म

“ मी पहिला घास घेणार तोंच समोर आलेल्या घरमला पाहून मला आश्चर्य वाटलें. शेजारचा आजारी म्हातारा अर्धपोटी राहातो, बरा होत नाहीं, अशी तक्रार त्यानें सकाळींच केली होती. रेशन कमी होते याची जाणीव मलाहि होती, वरून टाकलेल्या रोटया कोणाला अन् किती पुरणार; पण त्या आजारी म्हाताऱ्याला मिळालेली रोटी जाते कोठे हेच मला कळेना. चौकशी केल्यावर कळलें कीं त्या कोरभर भाकरीतलाच तुकडा तो म्हातारा आपल्या कुत्र्याला घालतो. तो म्हातारा म्हणे–सऱ्यांनी मला सोडलं, दोस्तानी गळा कापला, शेजारी शत्रू झाले, पण माझी यानं अजून साथ सोडली नाहीं. उन्मळून पडलेल्या-विशाल वृक्षाचे उरलेले जीर्णशीर्ण पान मी. माझ्या दुःखांत त्यानें भागी घेतली आणि मी जर त्याला सुखांत विसरलो तर भगवान काय म्हणेल ? कितीहि थोडे मिळो, कोरभर भाकर तो खाईल, उरलेली मी खाईन.—भारतीय संस्कृति म्हणतात ती याहून कां वेगळी आहे ! ”

मनुष्य केवळ भाकरीवर जगत नाहीं म्हणूनच निर्वासितांच्या प्राथमिक गरजा भागताच त्यांच्या इतर सांस्कृतिक पुनर्रचनेचा प्रश्न निर्माण झाला. कल्पना नसतांना विजेचा लोळच्या लोळ खाली आला तर क्षणभर लोक स्तिमित होतात. याद्वीच्या अकल्पित झंझावातामुळें लोक जन्मभर स्तिमित झाले आहेत.

तो धक्का विसरून नव्या आयुष्याला सुरुवात करण्याचा महान प्रश्न त्यांच्यापुढें आहे. आज त्यांना थंडीपावसापासून निवारा मिळेल, अंगभर वस्त्र मिळेल, पोट भरायला अन्न मिळेल. पण निर्वासित निर्वासित म्हणून जन्मभर दूर ठेवायचे असेल तर त्यांच्यात व अंदमानांतील बंदिवानांत फरक तो कोणता ? ज्या प्रांतांत जे लोक आले त्या प्रांतांत जर त्यांना आपलेपणाची ऊब मिळाली नाहीं, कायम परकेपणा त्यांच्या वाट्याला आला व दया म्हणून अन्नवस्त्र मिळाले तरी ही कां पुनर्स्थापना होणार आहे ? ही पुनर्स्थापना कसली ? माणुसकीचा तो एक उपहास ठरेल. मुंबईचे पंतप्रधान म्हणाले "आलेले निर्वासित हे कोणी परके नसून ते आपल्याच रक्तमांसाचे भाऊबंद आहेत. या प्रांतांतील इतर कोणत्याहि नागरिकांप्रमाणेंच त्यांनाही या भूमीवर हक्क आहेत, पण सांस्कृतिक संमीलनाचा प्रश्न सरकार सोडवू शकत नाहीं. तो समाजानेच सोडवला पाहिजे. ही सर्वस्वी सामाजिक जबाबदारी आहे म्हणूनच आजच्या निर्वासितांच्या बाबतींत ही सांस्कृतिक पुनर्रचना नसून त्यांचा हा सांस्कृतिक पुनर्जन्म आहे."

## शिक्षण

त्यांच्या सांस्कृतिक व सामाजिक योजनामध्यें सर्वांत प्रथम शिक्षणाचा भाग येतो. फाळणीमुळें ज्या शिक्षकांच्या उपजीविकेचे साधन गेले व ज्या विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबले त्यांच्याकरतां मध्यवर्ती शिक्षण खात्यानें नवी व्यवस्था करण्यांचे ठरवले. पश्चिम पंजाबांतून आलेल्या शिक्षकांना व विद्यार्थ्यांना आपल्या अडचणी नोंदण्याकरतां दिल्लींत एक वेगळे केंद्र उघडण्यांत आले. केवळ आक्टोबर १९४७ पर्यंत २९,८०० शिक्षकांनीं यांत आपल्या अडचणी नोंदल्या. दिल्ली व इतर भागांतील खाजगी शाळांनीसुद्धां या शिक्षकांना नेमावयाचे मान्य केले. इतर प्रांतांतहि असाच प्रयत्न करण्यांत येत आहे. आज परदेशांत शिक्षण घेत असलेल्या पश्चिम पंजाब व इतर दंगलीच्या भागांतून गेलेल्या विद्यार्थ्यांना पैशाची अडचण भासूं लागल्यास त्या त्या देशांतील प्रतिनिधी, हाय कमिशनर, ट्रेड कमिशनर

वगैरेंच्याकडून कर्जाऊ रकमा देण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. एका मध्यवर्ती शिक्षणविषयक संस्थेची योजना अंमलांत आणली असून या योजने-करतां २२, ४५,००० रुपयांचा खर्च येणार आहे. या संस्थेमध्यें १५० पुरुष व १५० स्त्रिया मिळून एकूण तीनशें विद्यार्थ्यांची सोय होणार आहे. या संस्थेंत निर्वासितांना अग्रहक्क देण्यांत आला आहे. शिवाय साठ विद्यार्थ्यांचें एक कॉलेज छावणींतच काढावें असें ठरलें आहे. आलेल्या निर्वासित विद्यार्थ्यांना सर्व तऱ्हेची मदत देण्याची विनंती सर्व प्रांतिक सरकारें व संस्थानें यांना करण्यांत आली आहे. दिल्ली विश्वविद्यालयानें सर्व तऱ्हेची मदत देऊन पूर्व पंजाब विश्वविद्यालयाच्या वतीनें कांहीं महत्त्वाचे शिक्षणक्रमहि सुरू केले आहेत. नवीं हायस्कुलें उघडून व इतर मार्गानें दिल्ली, मुंबई, संयुक्तप्रांत या भागांत शिक्षणाची सोय करण्यांत आली आहे. ३० पर्यंत प्राथमिक शाळा व तीन हायस्कुलें अजमेर भागांत उघडण्यांत आलीं आहेत. दिल्लीमध्यें दोन वेळां कॉलेज भरण्याची पद्धत अंमलांत आणून ३,२४८ विद्यार्थ्यांची सोय करून, ११२ प्राध्यापकांना नोकऱ्या दिल्या आहेत. निराधार मुलांच्या शिक्षणाकरितां शिष्यवृत्त्या देण्याचें ठरलें आहे. प. पंजाबांतून पूर्व पंजाबांत किंवा पूर्व बंगालमधून प. बंगालमध्यें जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रश्न सोपा आहे. याचे कारण त्यांची भाषा एक आहे. शिक्षणाचे माध्यम इंग्रजी असले तरी भाषाविषय म्हणून विश्वविद्यालयांत व माध्यम म्हणून प्राथमिक शाळांत हा प्रश्न येतोच. मुंबईत हा प्रश्न जरा वेगळ्या स्वरूपाचा आहे. आलेल्या सिंधी विद्यार्थ्यांच्या प्राथमिक शिक्षणाची सोय तर कोठें नव्हतीच पण कॉलेजांतहि भाषाविषय म्हणून सिंधी नव्हती. इतक्या प्रचंड संख्येनें मुंबईत आल्यावर त्यांच्या भाषेचा प्रश्न जरूर सोडवला गेला पाहिजे. गुजराथी, कानडी, मराठी त्यांत आतां सिंधीची भर घातली पाहिजे. भाषावार प्रांतरचना होईल तेव्हांचा प्रश्न निराळा पण आज तरी सिंधी प्राथमिक शाळांची जबाबदारी सरकारवर आहे. आतां छावण्यांतून शाळा सुरू झाल्यां आहेत. कॉलेजांतूनहि व्यवस्था होत आहे. मुख्य जबाबदारी खुद्द निर्वासितांच्यावरच आहे. याशिवाय अंध विद्यार्थ्यांचीहि सोय करण्यांत येत आहे.

# निराधार

आलेल्या निर्वासितांमध्यें निराधार व्यक्तींचा एक मोठा गट आहे. यामध्यें मुख्यत: वृद्ध माणसें, अपग माणसें, निराधार स्त्रिया व मुलें यांचा समावेश होतो. अपंग व्यक्तींची संख्या पुष्कळच कमी आहे. कारण इतक्या अडचणी संकटांतून यायचं म्हणजेच मोठें होतें कर्म त्यांचे.कुरुक्षेत्र छावणींत निराधार,वृद्ध व अपंगाची एक छावणी वेगळी करण्यांत आली होती. पण या प्रश्नापेक्षांसुद्धां महत्वाचा प्रश्न आहे तो अनाथ मुलें व निराधार स्त्रिया यांचा. या यादवींत ज्यांचे पालक नाहींसे झाले किंवा अगदीं क्वचित जवळचं कोणीच नसलेले अशी मुलें पुष्कळदां या लोकसंख्येंत सांपडतात. सामान्य नोंदणीमध्यें ही मुलें कधींच गवसायची नाहींत. याचें कारण ती नोंद करायला येतात कशाला व त्या संघटनेला त्यांचा पत्ता लागतो कशाला. अशी अनाथ मुलें जर दुबळी असली अगर अगदींच अल्पवयी असली तर त्यांचा निरनिराळ्या गैरवाजवी कामाकरता उपयोग केला जातो. जर ती जराशी धडधाकट असली तर मुळच्या उनाडपणाला मनसोक्त वाव मिळून त्यांचे अट्टल गुन्हेगारांत रूपांतर होण्याचा संभव असतो. निर्वासितामधील स्वयंसेवकांच्या व पुष्कळदा पोलीसांच्या आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या मदतीनें अशा मुलें शोधून काढावी लागतात. तशीच गोष्ट निराधार स्त्रियांची. त्यांच्या मनांतच जर निराधाराच्या कारितां उघडलेल्या अनाथाश्रमासंबंधी अढी असेल अगर मानासिक दृष्टीने ती स्त्री फार दुबळी असेल तर अशा स्त्रिया अनाथाश्रमापर्यंत पोचतच नाहींत आणि मग साहजिकपणानें अशा स्त्रिया समाजकटंकाचे भक्ष्य होतात. पण निराधार स्त्रिया व मुलें यांच्याबरोबरच असे अनाथाश्रम चालवणाऱ्यावर मोठीच जबाबदारी येते. त्यांनी ही काळजी घ्यायला हवी कीं, त्या स्त्रियांच्या-मध्ये आपण अनाथ आहोत, निराधार आहोत असा न्यूनगंड उत्पन्न होता कामा नये व शक्य तो त्यांना स्वत:च्या पायावर उभे राह्यला शिकवून समा-जाचे महत्वाचे घटक त्यांना बनवले तरच त्या सेवेचे सार्थक होईल. एकच उदाहरण द्यायचे झाले तर कुर्ली छावणीचे देतां येईल. नारी सेवा सदन या संस्थेनें राष्ट्राच्या संकटकाळीं शब्दातीत कामगिरी केली आहे. आज कुर्ली

येथील स्त्रियांच्या आश्रमांत सुमारें ७०० स्त्रिया व ४०० मुले आहेत. आज मुंबईत जवळपासच्या उपनगरांत आलेल्या निर्वासितांची लाखांची संख्या मोजली जाते. इतक्या लाखांत या संख्येशिवाय इतर साऱ्या स्त्रियांना आपल्या आप्तांचा वा कोणाचा आधार मिळाला आहे असा का याचा अर्थ आहे, असे आणखी किती आश्रम उघडले गेले पाहिजेत निराधारांचा शोध घेऊन त्यांची व्यवस्था करायला पाहिजे तरच हा प्रश्न सोडवल्यासारखे होईल.

## अपहृत स्त्रिया

फाळणीनंतरच्या साऱ्या प्रश्नांमध्यें सर्वांत कठिण व सर्वांत अडचणीचा प्रश्न कोणता असेल तर तो अपहृत स्त्रियांचा. यातना आणि क्लेश यांना शब्द-रुप घेता आले असतें तर अपहृत स्त्रियांचे कथन वाचवले नसते. "स्त्रीत्वाची महति गाणाऱ्या १९४८ मधल्या सुधारलेल्या, मानवी संस्कृतीने ह्या कहाण्या ऐकाव्यात म्हणजे स्वतः माणूस असल्याची शरम वाटायला लागेल असे हिडिस प्रदर्शन त्यांत सापडेल. यादवीच्या होळीमध्ये स्वतःची पोळी भाजून घेणाऱ्या, त्या पशुंना काय म्हणावे,त्यांच्या जागीं स्वतःच्या आयाबहिणींची कल्पना केल्या-शिवाय या समस्येची कल्पना येणार नाहीं" हे त्या विभागांत काम करणाऱ्या एका कार्यकर्त्या स्त्री संघटकाचे उद्गार आहेत. यादवी सुरु झाल्यावर नेहमीप्रमाणें साऱ्या रानटी प्रवृत्तींचा नंगा नाच घालायची संधि मिळाली व कत्तली, रक्तपात, जाळपोळ यावर स्त्रियांच्या हरणानें कळस चढवला. हे प्रकार पाकिस्तान व हिंदुस्थान दोन्ही भागांत सारख्याच रानटीपणाने झाले. निर्वासितांमध्यें विशिष्ट वयाच्या स्त्रियांचे प्रमाण कांहीं भागांत कमी होते. साऱ्याचा अर्थ हाच कीं, परधर्मीय अशीच भावना नसेलहि पण पाशवी पद्धतीनें स्त्रिया पळवण्यांत आल्या. अगदीं विरळा अशा उदाहरणांत स्वधर्मीय-स्त्रियांचेहि अपहरण झाले आहे. स्त्रियांना पळवून नेत, डांबून ठेवत. पुढें पुढें त्यांच्या सुटकेची मोहीम सुरू होताच त्यांना जिल्ह्याजिल्ह्यांतून हल-वण्यांत येई, त्यांची लग्नें करून देण्यांत येत, त्यांची नांवे बदलण्यांत येत. समाजसेवकांच्या मदतीनें या स्त्रियांच्या संशोधनाकरतां एक संघटना निर्माण

करण्यांत आली. व हिंदुस्थान व पाकिस्तानमध्यें या अपहृत स्त्रियांचा शोध सुरू झाला. दोन्ही सरकारांनीं याबाबतींत व धर्मांतरित व हरवलेल्या माणसांच्या शोधाच्या बाबतींत सहकार्य करायचें कबूल केलें. परंतु पाकिस्तानमध्यें शोध घेत असतांना पुरेसे सहकार्य मिळाले नाहीं. म्हणून प्रख्यात सेविका श्री. अमतुस सलाम यांनीं उपोषण आरंभलें. शेवटीं पाकिस्तानी अधिकाऱ्यांचे आश्वासन मिळताच त्यांनीं उपोषण सोडले. शोध सुरू होतांच स्त्रियांची सुटका होऊं लागली. पण मग पळवणाऱ्यांनी नवे तंत्र अवलंबिलें. नंतर स्त्रिया येत त्या लग्नाचे खोटे दाखले घेऊन येत, व तेथेच राहाण्याची इच्छा प्रदर्शित करीत असत.

दोन्ही वसाहत सरकारांनीं ६ डिसेंबर रोजीं पळवलेल्या स्त्रियांच्या सुटकेच्या कार्याला अधिकृतपणें सुरुवात केली. त्यावेळीं असें गृहित धरण्यांत येत असें कीं, सुटका होताच त्या स्त्रियांनीं आपापल्या वसाहतीत परत जायचे. पण ही आशा त्यांच्या मनांत रुजणें फार कठिण होतें. कारण त्या स्त्रियांना दोन प्रकारची भिती वाटते. एक म्हणजे पळवणाऱ्यांची व दुसरी म्हणजे मुळच्या घरच्या लोकांची. कित्येकदां हे पळवणारे त्या स्त्रियांच्या मागोमाग सुटका छावणीपर्यंत येत. छावणी भोंवतीं घोटाळत. त्यामुळें आपली खरोखर सुटका होणार आहे यावर विश्वास बसणें कठिण जाई. कु. मृदुलाबेन साराभाई यांनीं अशा एका मुसलमान तरुणीचे उदाहरण दिले आहे. ती म्हणे "मी शीख आहे, इथें सुखी आहे, दया करा, मला परत पाकिस्तानांत पाठवू नका." नंतर तिनें ही माहिती खोटी दिल्याचें कबूल केलें. या साऱ्याचें कारण भीति. दुसरी भीति म्हणजे घरच्या स्वागताची. पुष्कळशीं स्त्रियांना अशी साधार भिंती वाटे कीं, आपण हिंदुस्थानांत परत आल्यावर घरीं आपले कसें स्वागत होईल. आपण भ्रष्ट, म्हणून आपला स्वीकार केला जाणार नाहीं. या भीतिमुळें त्या स्त्रिया परत यायला नाराज असत. अमेरिकेत गुलामांना प्रथम मुक्त केले तेव्हां ते असेंच सुन्न होत. त्यांचा स्वतःवर विश्वास बसत नसे कीं, आपण स्वतंत्र आहोंत, आपली सुटका झाली आहे. तशा तऱ्हेचा सुन्नपणा या स्त्रियांना येई. त्यामुळें त्यांची खरोखरीच सुटका होते आहे अशी खात्री

पटवण्यामध्येंच पुष्कळसे श्रम पडत. एका दृष्टीनें सुटकेचा आनंद व घरीं जायची तळमळ व दुसरीकडे आपल्याला घरीं घेतील कीं नाहीं याची काळजी व हुरहुर अशा अवस्थेंत ती स्त्री असे. पुढेंपुढें अशी धर्मांतरित माणसें व अपहृत स्त्रिया यांची सुटका करून त्यांना सक्तीनें इकडे आणायचे ठरल्यानंतर एक नवाच प्रश्न निर्माण झाला. या स्त्रियांना छावणीत ठेवण्याचा हक्क आहे कां ? कांहीं लोक असे म्हणत कीं, त्या स्त्रियांना कांहीं महिन्यांची मुदत द्यावी त्या महिन्यांत त्यांच्या नातेवाईकांचा पत्ता लागला नाहीं तर त्यांना काय हवें ते करू द्यावे. हा प्रश्न थोडासा गोंधळात टाकणारा आहे. खुद्द कु. मृदुलाबेन साराभाई यांच्यापुढेंच हा प्रश्न पडल्यावर त्यांनी विवेचन पुढीलप्रमाणें केले " अपहृत स्त्रियांची सुटका करण्याची पद्धति आणि सुटका केलेल्यांना नातेवाईकांकडे सोपवीपर्यंत मिळणारी वागणूक यामध्ये एका मर्यादेपर्यंत बळजोरीचा भाग असतो यात शंका नाहीं—मात्र त्याचे वर्णन बळजबरी, मूलभूत मानवी हक्कांची पायमल्ली, गांजणूक अशा तऱ्हेने केले जाते हे चुकीचे आहे. ते एखाद्या शस्त्रक्रियेसारखे आहे. शस्त्रक्रियेंत कायमच्या रोगाच्या उच्चाटणासाठीं रोग्याला थोडा जादा त्रास द्यावा लागतो तसेच इथे " आलेल्या स्त्रियांना प्रथम घरांत, समाजात स्थान मिळणे कठिण जाई. त्यासाठी खुद्द गांधींना विनंति करावी लागली. गांधीजी म्हणाले " अपहृत, धर्मांतरित अथवा अत्याचाराला बळी पडलेल्या हिंदू व शीख बहिणींचा कोणताच अपराध नाहीं. त्यांचे मुक्त बाहूने स्वागत करून त्यांना समाजात पूर्वीचेच स्थान दिले पाहिजे. दया आणि सहानुभूति हा धर्माचा पाया आहे. या बहिणींना आपण आदर दाखवला नाही तर आपणाला धर्मच नाही असे म्हणावे लागेल " या महात्माजींच्या विनंतीनंतर त्या स्त्रियांना घरात स्थान मिळू लागले आहे. विशेषतः ज्यांना आपत्ये व्हायची आहेत त्यांची काय अवस्था ? यांना आपण स्थान दिले नाही तर आत्महत्या नाहीं तर वेश्यागृहें याशिवाय त्यांना कोणता रस्ता आहे ? अपहृत स्त्रियांचा मान आपण ठेवला नाही तर आपण माणुसकीला मुकलो असाच याचा अर्थ होईल. वरच्या भागातूनच केवळ एप्रिल १४ ते १५ मे पर्यंत ५३७८ मुसलमान स्त्रिया परत

करण्यात आल्या व ४१४८ हिंदु स्त्रिया सोडवून आणल्या गेल्या. ३१ मे पर्यंत एकूण १३,०२१ स्त्रिया सोडवल्या गेल्या आहेत.


## सरकार, समाज व निर्वासित

परंतु या साऱ्या पुर्नस्थापनेच्या कार्यामध्यें एक मोठा दोष आढळून येतो तो असा कीं, निर्वासितांची वृत्ति, सरकारचा दृष्टिकोन व समाजाचे सहकार्य या तिन्ही बाबतीत कोठेतरी विसंवादी सूर निघत असल्यानें या तिघांच्या श्रमांचे एकत्रीकरण होऊ शकत नाहीं. हा प्रश्न निर्माण झाला तो इतक्या वेगाने झाला कीं, त्याचे पूर्व नियोजन करणे कोणालाच शक्य झाले नाहीं. या वेगाची कल्पना येण्याकरता केवळ एका महिन्यामध्ये किती निर्वासित आले याची जरी आकडेवारी घेतली तरी या वीजवेगाची कल्पना येईल. कर्नालजिल्हा, त्यातच कुरुक्षेत्र यांत आलेल्या निर्वासितांचे १६ डिसेंबर ते २ जानेवारी म्हणजे पुरा महिनाहि नव्हे—याची आकडेवारी अशी आहे.


| | संख्या | |
|---|---|---|
| डिसेंबर १६– | ३५०० | बन्नूहून कुरुक्षेत्राला, |
| डिसेंबर १८– | ३००० | मर्दानहून ” |
| डिसेंबर २०– | ३००० | मर्दानहून कुरुक्षेत्राला |
| डिसेंबर २३– | २७००० | सरगोधा ते ” |
| डिसें० २३— | २००० | लाहोर ते कर्नाल |
| ” — | ३००० | बन्नू ते कुरुक्षेत्र |
| डिसें० २५— | २७०० | मर्दान ते कुरुक्षेत्र |
| ” — | २५०० | लायलपूर ते कर्नाल |
| जाने० २— | ३५०० | लाहोर ते कर्नाल |
| ” — | ३००० | लायलपूर ते ” |

## समाज

यावरून सरासरी पंधरवड्यांत किती वेगानें माणसें छावण्यांतून ओतली गेली याची कल्पना येईल. पूर्वनियोजन जरी अशक्य होते तरी आलेल्यांची



उद्योग
व्यापार
वहातूक.
पोलीस.
राज्य कारभार
कला
मालमत्तेवर जगणारे
घरगुती नोकर
इतर
शेतीवर जगणारे
५०. %
उद्योग
व्यापार
इतर
घरगुती नोकर
कला
राज्यकारभार
पोलीस
वहातूक
१०%
२५%
३५%
२%
२%
3%


प्रांतवारचा बोजा
पू. पंजाब व पंजाबी संस्थाने १४ लाख
मुंबई
युक्त
मध्यप्रांत
मत्स्य संघ
बिकानेर
अजमेर
उदेपूर
जयपूर
माळव संघ
दिल्ली
सौराष्ट्र
जोधपूर
हिमाचल प्रदेश
१ लाख
निर्वासितांची संख्या
(लक्षांत)

व्यवस्था हें सरकारचे कर्तव्य होते. व प्राथमिक गरजा भागवण्यांत सरकारनें कसूर केली असे म्हणणे अन्यायाचें ठरेल. कारण सरकारनें केलेल्या स्थलांतराच्या व छावण्यांच्या व्यवस्थेबद्दल अगदीं परक्या अशा आंतर्राष्ट्रीय तज्ञांनीसुद्धां स्तुति केली आहे. पण खरा प्रश्न आहे तो वृत्तीचा. छावण्यातून सुद्धां लोक आल्यावर जर त्यांच्याभोंवतीं कायम शरणार्थी, शरणार्थी असा आरडाओरडा चालवला तर दयेवर जगणाऱ्याचा, शरणार्थीपणाचा एक न्यूनगंड त्यांच्यात निर्माण होईल. त्यांच्याकडे पहाण्याची वृत्ति बदलल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाहीं. कुरुक्षेत्रामध्यें छावणी पहायला म्हणून केक 'थोर' माणसें येत असत. उंची उंची साड्या नेसून त्यांच्या घरच्या स्त्रिया बरोबर असत. ही माणसें सर्कस पहायला आल्यासारखी येत. सहानुभूति व्यक्त करीत. एखाद्याच्या हातावर रुपाया दोन रुपये ठेवून चालू लागत. विशेषतः स्त्रियांची छावणी वा आश्रम पहायला अशी माणसें येणें यासारखी तिरस्करणीय गोष्ट नाहीं. निर्वासित म्हणजे कांहीं प्रदर्शनीय वस्तु नव्हेत. त्यांच्या यातना पहायला कां हे लोक येत ? जी गोष्ट छावणींत तीच बाहेर. प्रांतांत बाहेरचे दुःखी भाई आल्यानंतर ते आपल्या शेजारी राहणार, त्यांची भाषा, त्यांचे अन्न, राहणी साऱ्या बाबतींत सांस्कृतिक संघर्ष होणार, अशा वेळीं आपल्या मनाची जर उदारता उपयोगी पडणार नाहीं तर केव्हां ? त्यांच्याभोवतीं आपलेपणा निर्माण करण्याच्या ऐवजीं परकेपणानें त्यांना दूर दूर ठेवण्यांत व केवळ सहानुभूति दया म्हणून मदत करण्यांत येत असेल तर त्यांना बरवर आपले म्हणण्यांत वा भारतीय संस्कृतीच्या एकतेचे गोडवे गाण्यांत तरी काय अर्थ आहे ? सरकारनें त्यांच्या भौतिक गरजा भागवल्या आहेत. पण खरा प्रश्न आहे तो सांस्कृतिक संमीलनाचा. केवळ आसरा, वस्त्र आणि भाकरी यांनीं माणूस होत नाहीं, त्याला आपलेपणा, सहानुभूति, सहकंप हवा असतो. त्यांना जन्मभर पाहुणे म्हणून वागवतां येणार नाहीं. ते आपले होते, आपले आहेत ही भावनाच जोपासली गेली पाहिजे. आलेल्या निर्वासितांना नवा प्रांत, नवी माणसें आपली वाटतील अशी वागणूक समाजानें त्यांना द्यायला हवी. अपहृत स्त्रियांच्यासारख्या

प्रश्नाबाबत तर समाजानें कमालीचे मनोधैर्य दाखवायला हवे आहे. ज्या प्रांतांत हा प्रश्न निर्माण झाला तेथें सहानुभूतीनें याची सोडवणूक होईल यात शंकाच नाहीं. पण इतर प्रांतामधल्या लोकांनीं याचा जास्त गंभीरपणानें विचार करायला हवा. त्यांच्यामधला एक वर्ग वरवर छानछोकीत राहणारा दिसला, तरी हे लक्षात ठेवायला हवे कीं, असा वर्ग फार थोडा आहे. ज्यांनी सोसले आहे अशी असंख्य माणसे अजून आपल्या दृष्टीआडच आहेत. त्यांच्यातली मागणीची वृत्ति क्वचित हक्कासारखी वाटते, पण त्यांनी सोसलेल्या आपत्तीत सामान्य माणसाच्या मनाचा तोल ढळला नसला तरच आश्चर्य. क्वचित आपल्या अधिकाराच्या क्षेत्रांत ही नवखी मागसे ' कानामागून येऊन तिखट ' होणारसे वाटू लागतें. पण या मागचा आपला थोडासा स्वार्थ आपण सोडायला हवा, याचे कारण कीं, स्वातंत्र्य सर्वांना मिळाले आहे पण त्याची थोडीफार किंमत विलक्षण स्वरुपांत त्यांना द्यावी लागली आहे. याबरोबरच सरकार व निर्वासित यांची जबाबदारी विसरता येत नसली तरी त्यांना आपलेपणाने सामील करून घेण्याची जबाबदारी सर्वस्वी जनतेची आहे.

## सरकार

जेव्हां निर्वासितांचा महापूर लोटला तेव्हां स्थलांतराची व नंतर त्यांच्या प्राथमिक गरजा भागवण्याची जबाबदारी हिंद सरकारनें निःसंशयपणें पार पाडली आहे. दंगे सुरू होताच पाकिस्तान सरकारशी बोलणी करून शक्य ती सर्व व्यवस्था करण्यात आली. ऑगस्ट २९ ला दोन्ही राष्ट्रांच्या प्रतिनिधींची एकत्र बैठक होऊन ३१ ऑगस्टपासून सीमेवरची फौज रद्द करण्यांत आली. दुसऱ्याच दिवशीं भारतीय पंतप्रधान, संरक्षण मंत्री, पाकिस्तानचे पंतप्रधान व एक मंत्री यांनी दंगल विभागाचा दौरा सुरू केला. आपापल्या हद्दींतील शांततेकरता तें राष्ट्र जबाबदार आहे असे ठरवून अल्पसंख्यांकाच्या रक्षणाची व स्थलांतराची व्यवस्था करण्यांत आली. व सर्वांत महत्वाची बाब म्हणजे तिकडून येणाऱ्या निर्वासितांना हिंदी सैन्याकडून संरक्षण देण्याची व्यवस्था केली. पूर्वार्धानंतरच्या कालात त्यांच्या प्राथमिक गरजा भागवल्या व आतां त्यांच्या

पुनर्स्थापनेच्या प्रश्नावर गाडी आली आहे. टंचाई आहे ती मागणीची–गरजेची नाहीं–पुरेशा साधनांची, व वेळेची आहे एकदां निर्वासितांच्या पुनर्व्यवस्थेचा प्रश्न हाती घेतल्यानंतर त्यांना पुरेशी जमीन, उपजीविकेची साधने कर्जे देणे सर्वात कठिण काम आहे, कारण तेवढी साधने पुष्कळदा अस्तित्वातच नसतात. सर्वांना वाटण्याइतकी लागवडीखालची जमीन असत नाहीं, मग साहाजिकच कृत्रिम साधनांनी ट्रॅक्टर्स लावून, धरणे बांधून, नवीन जमीन शेतीकरितां घ्यावी लागते. यामध्यें जो कालावधी जातो तो फार त्रासाचा असतो. कारण त्या काळात सर्व प्रयत्न पुरे पडत नाहींत व निर्वासितांना दम निघत नाहीं. त्यांच्या सोयीच्या दृष्टीनें कायदे करण्यात येतात ते त्यांना विचित्र अपमानास्पद वाटायचा संभव असतो. मुंबई सरकारच्या नोंदणी कायद्याचे असेच हाल होत आहेत. पूर्वींहि नोंदणी केली जात होती. पण संपूर्ण माहितीकरितां व पुनर्स्थापनेची आवश्यक पायरी म्हणून नोंदणीचा कायदा करण्याचे ठरले. कायद्याचा हेतु वस्तुतः अत्यंत शुद्ध असतांना निर्वासित समिति त्याला ' गुन्हेगारांच्या कायद्याच्या जोडीला बसवते, यातील कारण एकच आहे कीं, कांहीं कलमांचा विपर्यास, सदोष कायद्याची रचना व निर्वासितांची हळुवार वृत्ति यातला हा झगडा आहे. उलट आलेल्या अनुभवांनीं बिचकून जाऊन सरकारी अधिकाऱ्यांनीसुद्धां आपल्या वृत्तींत बदल करतां कामा नये. सिंध हिंदू सेवा समितिच्या सूचना खरोखरीच विचारांत घेण्याजोग्या आहेत. या साऱ्या गोष्टींशिवाय फाळणीमुळें इतरहि अनेक परिणाम सरकारी राज्ययंत्रावर झाले होते ते दुरुस्त करतांनाच शक्तीचा व्यय होत गेला. सैन्याचेच उदाहरण घ्यायचे झाले तर फाळणीनंतर थोडा फार तरी गढूळपणा अनेक शिपाई व अधिकाऱ्यांच्या मनांत निर्माण झाल्याची शंका येत होती. कांहीं महिन्यापूर्वी हिंदुस्थानचे चीफ ऑफ स्टाफ मेजर जनरल करिअप्पा म्हणाले होते कीं, सैन्यांतली शिस्त व कौशल्य ' वेळच्या वेळींच ' सुधारायला हवे त्यांतला मथितार्थ हाच होता. पण या साऱ्या सरकारी जबाबदारींनंतरहि सरकारनें निर्वासितांचा प्रश्नाला पहिले स्थान द्यायला हवे, याची जाणीव मधून मधून सरकारला करून देण्याची मात्र आवश्यकता भासते. छावण्या उपनगराप्रमाणें चालवावयाच्या, त्यांत त्यांचे पंच नेमायचे, त्यांच्या शाळांना मान्यता

द्यायची. अशा अनेक गोष्टी सरकारला करणें शक्य आहे. मुंबईचे पंतप्रधान यांनीं नुकतीच आपली बाजू मांडली. त्यांत ते म्हणाले—“आपल्या बारीकसारीक गरजासाठीं देखिल सरकारवर अवलंबून राहण्याची संवय भल्या भल्या जबाब-दार म्हणवणाऱ्या निर्वासितांना लागली आहे, असें मुंबई सरकारला आढळून आलें आहे. निर्वासित छावण्या लहान शहराप्रमाणें चालवण्यासाठीं कारभारी नेमायचे, रेशनिंग, स्वच्छता औषधपाणी वगैरेसाठीं त्यांच्या दिमतीस माणसें द्यायची असें सरकारनें ठरवलें आहे, (२ सप्टें. १९४८)” त्यांना उदार-पणानें रेशन दिलें जातें, त्यांचेसाठीं दवाखाने उघडले आहेत, शाळा सुरू करण्याला उत्तेजन दिलें जाते. को—ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायट्या काढायला उत्तेजन देणें व त्यासाठीं कर्जाची सोय सरकारनें केली आहे, वगैरे बाबी त्यांनीं स्पष्ट केल्या आहेत. सरकारच्या जिवापाड प्रयत्नाचे कौतुक करूनहि म्हणावेसें वाटतें कीं, योजना आणि अंमलबजावणी यांच्या दरम्यानच्या काळांत निर्वासि-तांचे जीवन चेपले जाण्याचा संभव असतो.

## निर्वासित

निर्वासितांच्यावरहि फार मोठी जबाबदारी आहे याचा विसर पुष्कळदा निर्वासितांना पडतो. उदाहरणार्थ मुंबई प्रांतांत घर बांधणी तावडतोब व्हावी असा हट्ट धरणाऱ्या निर्वासितांनीं हें लक्षांत घ्यावयास पाहिजे कीं, मुंबई प्रांतांतून मुसलमान फार थोडे गेले आहेत, नवीन बांधकामाच्या साधनांची वाण आहे, व पांच जणाच्या एका कुटुंबास एक गाळा असे प्रमाण धरले तर प्रत्येक गाळ्यास पंचवीसशे रुपये याप्रमाणें २० कोटी रुपये खर्च येणार आहे. ज्या प्रांतात जायचे त्या प्रांतांतल्या लोकांनीं आपलेपणा दाखवावा अशी अपेक्षा असल्यास दुय्यम सिंधी शाळांतून प्रादेशिक भाषा सक्तीनें शिकवावी लागली तर तक्रार होता कामा नये. कारण आपली संस्कृती जरी वेगळी असली तरी ज्या प्रांतांत आपण जातो तेथील वातावरणाशीं एक जीव होण्याचा संपूर्ण प्रयत्न आपण करायला हवा, तेथील भाषा हवी, राहणे हवे, पूर्वी मूग डाळ खायची संवय असली तरी जेथें ती मिळत नाहीं तेथे तूर

खायला सिंधी बांधवांनीं शिकायला हवे. आवश्यक त्या गरजा पुरवल्या गेल्या पाहिजेत हें खरे असले तरी, मागणीला अंत नसतो, पुरवठ्याला असतो हें त्यांनीं लक्षांत घ्यायला हवे. एका छावणींत तीन 'रेफ्रिजरेटर' ची मागणी करण्यांत आली ही तांतडीची गरज आहे का? ही सारी एकांगी व क्वचित सांपडणारीं उदाहरणें देण्याचा उद्देश एकच आहे कीं, निर्वासितांनीं तांतडीचे व सवडीचे यांतला फरक ओळखावा. अंदमानमध्यें नवी वसाहत करण्याचे ठरलें. केव्हांहि आशादायक योजना आहे ती. पण त्यांत बंगाली निर्वासितांची व्यवस्था होऊं शकेल पण तें म्हणतात, आम्ही अंदमानचे जन्मठेपीचे कैदी आहोंत कीं काय म्हणून उलट प्रश्न विचारला गेला. पुष्कळदां योजनेचा उद्देश व मांडणी यांतला फरक लक्षांत न घेतल्यानें निर्वासितांत गैरसमज वाढतो. जरी भारतीय असले, त्यांचा हिंदभूमीवर सर्वस्वी हक्क असला, तरी पूर्वीच्या रहिवाशांजवळ असलेल्या चतकोर भाकरींतला अर्धा चतकोर मागण्याचाच त्यांना अधिकार आहे. प्रांतिक जनतेचा चतकोर तुकडा मागण्याचा नव्हे. हे सारे प्रथमदर्शनी फार कडू वाटते पण जबाबदारीच्या जाणिवेचा विचार केला तर याचा अन्वयार्थ स्पष्ट होईल. स्वतः जाणीव ठेवल्यानंतरच इतरांकडून त्याची अपेक्षा करतां येते. जबाबदारीची वाटणीच करायची झाली तर ६० टक्के सरकारची २५ टक्के जनतेची व १५ टक्के निर्वासितांची आहे. शिवाय शाळा, कोऑपरेटिव्ह सोसायटीज वगैरे बाबतींत निर्वासितांनींच पहिलें पाऊल उचलायला हवे, म्हणजे त्यांना जबाबदारीची जाणीव असल्याचे सिद्ध होईल.

## आंतर्राष्ट्रीय पार्श्वभूमीवर आपला प्रश्न

भारतीय इतिहासांत जरी हें स्थलांतराचे पहिलेंच पान असलें तरी जगाच्या इतिहासाला ते कांहीं नवें नाहीं. बेल्जम, फ्रान्स, इटली रुमानिया अशी कैक उदाहरणें आहेत. महायुद्धाची लाट आल्यानंतर कित्येक अल्पसंख्यांकांना जीव घेऊन पळावे लागले. युरोपमध्यें बाल्कनची निर्मिती काय दर्शविते? १९१७ ते १९१९ च्या दरम्यान गोऱ्या आणि लाल फौजांमध्यें रशियांत झालेली यादवी आणि त्याचा परिणाम कित्येक लक्ष लोक सरहद्दीबाहेर फेक-

ण्यांत झाला हें कोण विसरेल ? राष्ट्रसंघानें त्यांना ४५ वेगवेगळ्या भागांत बसवायचे ठरवले. पण त्यांचे जगणें म्हणजे युरोपच्या दयेवरचेच होते. बोल्शेविक क्रांतिनंतर २००,००० लोक जर्मनींत, ४००,००० पोलंड, फ्रान्स, १००,००० लोक चीनच्या पूर्वेकडे पळाले. हे सारे पराभूत सैनिक, स्त्रिया, आणि मुलें होती. ग्रीसमध्यें असाच प्रकार घडला. १९१५ ते १९२२ मध्यें झालेलें स्थलांतर तदनुसार झाले. आणि कल्पनेच्यापेक्षां कमी वेळात कांहीं निर्वासितांना अर्थ व्यवस्थेंत सामील करून घेण्यांत आले. १९१८ पासून अल्पसंख्यांकांचा प्रश्न हा बल्गेरियांत बिकट होऊन बसला होता. तेथील लोक मेसाझेमिया व इतर भागांत पळाले. १९२३ मधल्या स्थलांतराच्या तहानुसार ३५०,००० ते ४,०७००० तुर्की लोक ग्रीसमधून आशियामायनरमध्यें गेले. १९३९ ते १९४५ या कालांतसुद्धां लिटिव्हिया, पोलंडचा कांहीं भाग, रुमानिया, युगोस्लाव्हिया, बल्गेरिया यांतून अल्पसंख्यांकांचे स्थलांतर, रुमानिया व हंगेरी यांतील अदलाबदल झालीच आहे. पण खुद्द आंतर्राष्ट्रीय कायद्याप्रमाणें झालेल्या राष्ट्रसंघाच्या देखरेखीखालील स्थलांतरसुद्धां शांततेनें पार पडले आहे असें मुळींच नाहीं. सारा राजकीय वादंग बाजूला ठेवूनहि जर्मनीकरतां 'हिमलर'नें आंखलेली व्यवस्था, स्थलांतराबाबत रशियाचे धोरण, खरोखरीच अभ्यसनीय आहे. परंतु आजवर जगांत झालेल्या स्थलांतरापेक्षां हिंदुस्थानांत झालेले स्थलांतर हे संख्येच्या व व्यवस्थेच्या दृष्टीनें फार मोठ्या प्रमाणावर झाले आहे व त्याचे स्वरूपहि कांहींसें वेगळें आहे. ज्यूंची झाली तशी यांत नियोजित लांडगेतोड नव्हती अथवा रशियाप्रमाणें पराभूतांनीं पळून जायचा प्रश्न नव्हता. म्हणूनच आजच्या प्रश्नांत या प्रश्नाचें असामान्य महत्व आहे. शिवाय इतरत्र झालेल्या स्थलांतरांत तीं राष्ट्रें बलिष्ट होती, सामर्थ्यशाली होती. अपुरी व्यवस्था व साधनसंपत्ति असणाऱ्या नवजात राष्ट्रांच्यावर कोसळलेला प्रश्न या दृष्टीनें पुष्कळ जगाच्या इतिहासांत घडलेले हे पहिलेंच उदाहरण आहे.

हा सारा प्रश्न निर्माण झाला तो अल्पसंख्यांकांच्या प्रश्नामधून झाला रक्त सांडले गेले, आसवांचा इतका पाऊस पडला पण तो प्रश्न सुटला आहे का ? स्थलांतराच्या विषयांतलें आंतर्राष्ट्रीय कीर्तीचे तज्ञ म्हणतात. " The pur-

pose of population transfer is not to remove a high percentage of minority group from the country of its residence, but to remove a minority problem, to eliminate a threat to the future, There are only two alternatives, In countries where there is reasonable hope to peaceable life to minority groups within the State-nation and a transfer is not absolutely essential, maximum security and rights must be guaranteed to the minorities, But if population transfer is deemed unavoidable, there must be no trace of collective minority existence left, no stuff for the resurgence of the minority problem, There is no third solution," — (Joseph B. Schechtman, European Population Transfers 1939—1945) हेच अखेरीस खरे ठरते आहे. अल्पसंख्यांकांचा प्रश्न तर सुटायला हवा आणि पाकिस्तान तर धार्मिक पायावर आधारलेले राष्ट्र आहे. आजवरच्या अनेक कटु अनुभवांत भर घालून असंख्य माणसें, संपात्ति, रक्त यांची अमोल किंमत देऊन पुन्हां एकदां राष्ट्र तोच धडा शिकते आहे कीं, हा प्रश्न रक्त पातानें सुटणार नाहीं. पाकिस्तानांतले सारे हिंदू नाहीसें होऊ शकत नाहींत. हिंदुस्थानातले मुसलमान तर हिंदीच आहेत. हा प्रश्न पैशाचा नाहीं, शस्त्राचा नाहीं. तो अंतःकरणाचा आहे. तो बदल ज्या दिवशीं होईल त्याच दिवशीं अल्पसंख्यांकांचा प्रश्न संपेल.

या दृष्टिकोनांतून जर निर्वासितांच्या प्रश्नाकडे पाहिले तरच त्या प्रश्नाची समाधानकारक सोडवणूक होण्याची शक्यता आहे. निर्वासित हे राष्ट्रावरचा भार न ठरता हातभार लावणारे जबाबदार घटक ठरतील. निर्वासित, सरकार व मुख्यतः जनता यांनीं नवी वृत्ति बनवायला हवी. आईबाप मारले गेलेली एक चार वर्षांची अनाथ मुलगी डोळ्यासमोर उभी राहते. निराधारपणाच्या केविलवाण्या स्वरांत ती विचारीत असे "बाबुजी, पुढें काय ?" ते प्रश्नचिन्ह तसच कां कायम राहणार, तिच्या आसवात भूतकाळची उध्वस्त स्मशानभूमि असली तरी उत्सुक अंतःकरणांत सुवर्ण स्वप्ने साठवलेली असतील. प्रश्न एवढाच आहे कीं, वर्तमानकाळांत ती साकार केव्हां होणार ? आणि या प्रश्नाचे उत्तर देण्याची जबाबदारी तुमच्यावर आहे.

## परिशिष्ट १*

# कुरुक्षेत्र छावणी

धुळीचे लोट उडवीत आमची स्टेशन वॅगन धावत होती. आम्ही सारे विद्यार्थी आतुरतेने पाहात होतों. आमचीं मनें वाऱ्याच्या वेगाने धावत होतीं. आज कितीतरी वर्षांनी कुरुक्षेत्राच्या या पवित्र रणभूमीवर असंख्य माणसें जमलीं आहेत. क्षितिजापर्यंत हारीने तंबूच्या रांगा लागल्या आहेत. धड अंगभर वस्त्र नाही, स्वच्छता नाही, अशीं धुळीने माखलेलीं अमाप माणसें रस्त्यावर फिरत आहेत. इतकीं माणसें कोठून येत आहेत, कोठें जात आहेत, परमेश्वरालाच माहिती ! आमची मोटार स्टेशनजवळ आली. आम्ही पाहिलें तों समोरच्या गाडींत कोंदटून मरतील इतकीं माणसें भरलीं होतीं. आपलें सामान कसेंबसें संभाळत शेकडो लोक डब्यांच्या टपावर बसले होते. एंजिनच्या फळ्यांवर माणसें होतीं, खिडक्यांना लोंबकळलीं होतीं, सारी गाडी माणसांनीं फुलली होती, प्लॅटफॉर्मवर पाहिलें तों कशाबशा संभाळून आणलेल्या सामानाच्या एका अस्ताव्यस्त ढिगावर एक धिप्पाड गृहस्थ राखणीला बसला होता. कारण, तांब्याभर पाणी मिळवण्या-करितां त्याची बायको सकाळपासून स्टेशनच्या नळावर रांग धरून बसली होती ! जागोजाग पडलेल्या सामानाच्या ढिगांत मधेंच एखादी उंची सूटकेस दिसते आणि जवळच एके काळीं श्रीमंत असलेल्या त्या सामानाचा मालक बसायला तर जागा नाहीं, जमिनीवर बसायची तर लाज वाटते, अशा गोंधळलेल्या मुद्रेनें उभा असतो !

साऱ्या माणसांच्या विकल आणि भकास चेहऱ्यांतून मध्येंच एखादें गुट-गुटींत मूल हसत आपल्या आईच्या मागें धांवतांना दिसतें. मुलांना जत्रा आणि

* डिसेंबर १९४७ या महिन्यांत कुरुक्षेत्र छावणीची परिस्थिति वर्णन करणारे पत्र.

प्रेतयात्रा यांतला फरक कसा उमजावा ? गर्दी—गोंधळाची त्यांना मजाच मजा ! आम्ही ‘ तहसील ’जवळ बाजारांत आलों तों लांबसडक तलवारी घेऊन कांहीं शीख चालले होते. कशाची स्मृति म्हणून ते त्या तलवारी अभिमानानें वागवीत होते ? समोर रस्त्यावर—ज्यांनीं साऱ्या जन्मांत कधीं पडद्याबाहेर तोंड काढलें नव्हतें अशा कित्येक पंजाबी स्त्रिया आंघोळीकरतां रांग धरून बसल्या होत्या. त्या लोकांचे कपडे किती शतकापूर्वी धुतले असावेत याचें संशोधन करायला हवें ! भीक मागण्याला तर सीमाच नाहीं. लाचारीला अंत नाहीं. ‘ शरणार्थी, शरणार्थी ’ म्हणून ओरडून त्यांच्या मनाची घडणच बदलली जात होती. त्यांत बदल केला नाहीं, तर पंजाब व सरहद्द प्रांतांतील या शूर लोकांतून शेळ्या आणि भिकारी निर्माण करणारे कारखाने या कँपांत तयार होतील ! हेंच आमचें कुरुक्षेत्राच्या निर्वासित छावणीचें पहिलें दर्शन.

## अक्षरशः निर्वासित

भारत सरकारच्या मागणीवरून ‘ टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सस ’ या आमच्या विद्यालयानें वीस निवडक विद्यार्थी पाठवण्याचें ठरवलें तेव्हांपासून सर्वच विद्यार्थ्यांना इकडे येण्याची ओढ लागली होती. शेवटीं आम्हां वीस विद्यार्थ्यांना निवडण्यांत आले. डॉ. बी. एच. मेहता यांच्या नेतृत्वाखालीं आम्ही ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यांत निघालों. प्रथम दिल्लींतलें काम संपवून आम्ही कुरुक्षेत्रांत आलों. दिल्लींत काम करतांना निर्वासितांत व आमच्यांत कांहीं दूरपणा आहे असें वाटे; पण कुरुक्षेत्रांत त्यांच्यांतच राहिल्यामुळें शरणार्थीयांच्या अंतरंगाचा ठाव घेण्याची अमोल संधि आम्हांला मिळाली. शिवाय दिल्लींत निर्वासित मुख्यतः उच्च, मध्यमवर्गीय व श्रीमान वर्गांतले आहेत, तर येथील लोकांत अत्यंत गरीब, निरक्षर व अडाणी लोकांचाच भरणा आहे. दिल्लींतल्या लोकांमध्यें बहुतांशीं लोक—त्यांचे नुकसान जास्त झालें असलें तरी—पुष्कळसे सामान बचावून वेळेवरच पळून आलेले वाटले; तर कुरुक्षेत्रांतील शरणार्थी लोकांत जवळचें किडूकमिडूक का होईना, पण सर्वस्व घालवून, हाकललेले शरणार्थी दिसतात. या निमित्तानें कां होईना, पंजाबांतल्या जनतेचे तळापर्यंतचे थर पाहण्याची संधि मिळाली.

फाळणीनंतर निर्वासितांच्याकरितां ज्या छावण्या उघडण्यांत आल्या, त्यांत कुरुक्षेत्राची छावणी सर्वांत जुनी व सर्वांत मोठी आहे. आताच्या ताज्या आंकड्यांवरून पाहिलें तर कँपची लोकसंख्या दोन लाख सत्तर हजार आहे. कँपची सर्व व्यवस्था आतापर्यंत लष्करच्याच हातांत आहे. लष्करांत दिसून येणारी रानटी दमदाटीची वागणूक सोडली तर व्यवस्थेच्या दृष्टीनें लष्करानें अप्रतिम काम केलें आहे. अर्थातच हातांत बंदूक असल्यामुळेंच पुष्कळशा हें शक्य होत आहे. नाहींतर समाजसेवेंतील नेहमींचे गोड शब्द व अर्जवी वागणुक या मार्गानें हा प्रश्न सुटणें अशक्य आहे ! निदान, इतक्या चट्कन् व नीटपणानें तो खासच सुटला नसता. कारण ज्यांच्याजवळ अपुरें अन्न, तोकडे वस्त्र विकत घ्यायला पैसा नाहीं, आजच्या थंडींत आसरा नाहीं, अशी तीन लाख माणसें एकत्र राहात असतांना सुसंस्कृतपणाची सारीं बंधनें पाळलीं जातीलच असें नाहीं. आणि याचाहि अनुभव इथे आला. कारण, इतक्या दक्ष व्यवस्थेनंतरसुद्धां साध्या चोरीपासून तों अपहरणापर्यंत तक्रारी नोंदण्यांत आल्या.

पूर्वीं स्वयंसेवक रात्रीं कॅम्पांत फिरून कांबळी व रजया वांटीत असत. जे लोक थंडींत उघड्यावर पडलेले असत, त्यांना ते रजया देत. एकदा हें कळतांच स्वयंसेवक येतांच लोक रजया तंबूंत लपवून बाहेर उघडे झोपूं लागले !' कापड, रेशन अशा प्रत्येक बाबतींत त्यांनीं अशा युक्त्याप्रयुक्त्यांचा अवलंब केला. दुसऱ्याची मुलगी आपल्याच कुटुंबांतली म्हणून एकानें जबरदस्तीनें ठेवली होती. बारीकसारीक चोऱ्यामाऱ्यांना तर तूंबूची राहणी फारच सोइस्कर असते. एके रात्रीं नंबर एक शहरांत कपड्याचीं तिकिटे वांटणाऱ्या पंचावर भीषण हल्ला करण्यांत आला ! लष्कर असतांना ही अवस्था, मग नव्या योजने प्रमाणें लष्कर जातांच काय अवस्था होईल ! लष्कर जाण्यापूर्वी तितकीच सज्ज संघटना निर्माण करण्यांत आली पाहिजे.

येथील लोकांच्या बाबतींत सर्वांत मोठी अडचण ही आहे कीं, त्यांचा पुष्कळसा वेळ रिकामाच असतो. सुसंघटित शहरामधून त्यांना सकाळीं सांघिक व्यायाम करावा लागतो. हा वेळ सोडला कीं, सकाळीं दहा वाजल्यांपासून हे लोक रिकामेच असतात. अन्न-वस्त्र मोफत मिळत असते व अशीं रिकाम्या

वेळाची व चिडलेल्या मनाची तीन लाख माणसे एकत्र असणें मोठें विलक्षण आहे. जमावाच्या मानसशास्त्राप्रमाणें याचें परिणामहि विलक्षण होत आहेत.

## चार शहरें

कुरुक्षेत्र कँपची विभागणी मुख्यतः चार शहरांत केली आहे. याशिवाय बाहेर पाठविल्या जाणाऱ्या निर्वासितांच्याकरिता एक 'ट्रँझिट कँप' आहे. यांपैकीं शहर नंबर एक हें सर्वांत जुनें असून सर्वांत अधिक संघटित आहे. इतर निर्वासितांची निरनिराळ्या इलाख्यांत व संस्थानांत निर्यात झाल्यावर ऐशीं हजार वस्तीचें हेंच एक नवें शहर येथें राहणार आहे. आतासुद्धां शहर नंबर एकची लोकसंख्या इतरांच्या मानाने जास्त आहे. शहराची विभागणी हिंमतपुरा गोविंदपुरा वगैरे मोहल्ले करून केली आहे. प्रत्येक विभागांतून एकएक पंच नेमला आहे. पंचायतीच्या हातीं प्रत्यक्ष अधिकार फारच थोडे असले तरी लोकमताला वाचा फोडण्याचें तें एक प्रभावी साधन ठरलें आहे. शहर नंबर दोन व तीन शहरांची संघटना अजून तितकीशी चांगली झाली नाहीं. सकाळीं दहा वाजेपर्यंत सर्वांचा वेळ सांघिक व्यायाम (पी. टी.) करण्यांत जातो. नंतरचा रिकामा वेळ आटा आणणें, जळण आणणें, व इतर व्यवस्था यांतच जातो.

चवथें शहर (स्पेशल टाऊन) हें आतांच वसलें असल्यामुळे तेथील व्यवस्था अजून पुष्कळच व्हावयाची आहे. निर्वासित बाहेरगावीं पाठवण्यापूर्वीं ट्रँझिट कँपमध्ये जमवले जातात. तिथें त्यांना कपडे, प्रवासापुरता आटा दिला जातो. वैद्यकीय तपासणी व नोंदणी केली जाते व गाडींत बसवलें जातें. ज्या ठिकाणीं गाडी जायची असेल, तेथील प्रसिद्धि करून, एखाद्या जिल्ह्याचे वा व्यवसायाचे नाहींतर येतील तसे लोक जमवले जातात. ट्रँझिट कँपांतून मुंबई, मध्यप्रांत, संयुक्त प्रांत, अलवार, ग्वाल्हेर वगैरे ठिकाणीं गाड्या पाठवल्या जात असतात. प्रसिद्धीकरिता जागोजाग फलक आहेत. शिवाय ढोलक्याचें पुरातन साधन आहेच. आता दूरध्वनिक्षेपकाची मोटार आहे व संघटित शहरांत ध्वनिक्षेपक बसवले आहेत. शहर नंबर एकमध्यें तर आता फायर ब्रिगेड आहे, शाळाहि सुरू झाल्या आहेत.

कुरुक्षेत्रामधील रेशनिंगची व्यवस्था अगदी समाधानकारक आहे. रेशन कमी मिळतें, या हिंदुस्थानांत कुठेहि आढळणाऱ्या तक्रारीखेरीज इतर तक्रार फारशी आढळली नाहीं. कपडे, कांबळीं व रजया यांच्या वांटपाबद्दल प्रथम मोठा गोंधळ होता तो असा की, रजया व कांबळीं यांची जरूरी कोणाला आहे व कोणाला नाहीं याचा निश्चित शोध लागत नसे. त्यामुळे पुष्कळदा एखाद्याला जास्त व एखाद्याला कांहींच नाहीं, अशी अवस्था होई. परंतु त्या वेळींसुद्धा अगदी पांघरूण नाहीं, अशी पाळी कोणावरहि आलेली आढळली नाहीं. नुकतीच कापडवांटपाची नवी योजना अमलांत आली आहे. ती अशी रेशन-कार्डावर जितकी माणसें असतील त्याच्या ३/४ प्रमाणांत कापड वांटायचें. प्रत्येक-कुटुंबांतील प्रत्येक सभासद हुडकून काढून मग वस्त्रवांटप करणें शक्य होत नाहीं; तेव्हां हाच एक इलाज आहे. प्रत्येक कुटुंबाला गुण दिले जातात. व त्या गुणांच्याप्रमाणें कापडाची योग्यता व प्रमाण दिलें जातें. निर्वासितांची नोंदणी हा वस्तुतः सर्वांत महत्त्वाचा भाग व ती योजना सर्वांत आधी व्हावयास हवी. पण आश्चर्याची गोष्ट ही की, शेवटपर्यंत त्याकडे कोणीच लक्ष दिलें नाहीं. कॅम्पमध्ये येतांच त्या निर्वासितांची नोंदणी केली गेली असती, तर त्या पत्रकावरून त्यांचें कापडवांटप आणि शिधावांटप सहज शक्य झाले असतें. परंतु नोंदणीची व्यवस्था सर्वांत शेवटीं करण्यांत आली.

## कांहीं दोष

कुरुक्षेत्राच्या व्यवस्थेमध्यें सर्वांत मोठे दोन दोष म्हणजे वापरांत चलन नसणें व संघटनेची सारी व्यवस्था बाहेरच्या लोकांच्या हातांत राहून निर्वासितांचा वेळ रिकामा राहणें हे होत. निर्वासितांना कार्ड दिलें, त्यावर त्यांनीं आपलें अन्न, वस्त्र, व आसरा ( तंबू ) घ्यावा. या व्यवस्थेंत निर्वासित रिकाम-टेकडे राहून मोफत जगण्याची दुष्ट संवय त्यांच्यांत पोसली जाते. यापेक्षां प्रत्येक निर्वासिताला शक्य तर काम देऊन, त्याबद्दल कांहीं प्रत्यक्ष पैशाच्या स्वरूपांत त्याला मोबदला देण्यांत यावा. त्याचा विनियोग त्यांनी कसाहि करावा. कामाबरोबरच त्याचा मोबदलाहि वाढत जावा. याने त्यांचा स्वतंत्रपणा वाढत जाईल. अर्थातच आज तीन लाख लोकांच्याकरितां काम शोधणें

मोठे मुष्कील आहे. याची मला जाणीव आहे. परंतु साधारणपणें कॅम्पच्या व्यवस्थेकरितां बाहेरून येणारी माणसें शोधण्यापेक्षां त्या जागीं निर्वासितांमधलीं माणसे नेमलीं तर पुष्कळसा कार्यभाग होईल. लोकांच्या हातांत पैसा आल्यावर सरकारवरचा बोजा पुष्कळच कमी होईल. कमींत कमी आवश्यकता सरकारने पुरविल्यानंतर बाकीची व्यवस्था व खर्च निर्वासितांनी आपल्या जबाबदारीवर पैसा मिळवून करणें आवश्यक आहे.

दुसरी गोष्ट मला जाणवली ती ही, कीं बाहेरच्या कार्यकर्त्यांची महाग उपस्थिति. जिकडेतिकडे बालवीरापासून तो दाढीवाल्या भगव्या बुवापर्यंत सारे कार्यकर्ते एकत्र दाटलेले आहेत. पुष्कळदां असेंहि झालें आहे कीं, कार्य थोडे पण व्यवस्थेची मागणी मोठी ! दूरच्या प्रांतांतून दोन व्यक्तींनीं यायचें, त्या-करितां इतका पैसा व व्यवस्थाखर्च व्हायचा कीं, त्यांत अनेक निर्वासितांचें कार्य झालें असतें ! याचा अर्थ असा मुळींच नव्हे, कीं आलेल्या स्वयंसेवकांनीं कमी महत्वाचें काम केलें किंवा बाहेरचे स्वयंसेवकच नसावेत ! कापडवांटपा-सारखीं कांहीं कांहीं कामें निःपक्षपातीपणानें होण्याकरितां बाहेरच्याच लोकांची गरज आहे. परंतु बारीकसारीक व्यवस्थेकरितां त्यांची महागाईची उपस्थिति अक्षम्य आहे. तींच कामें जर निर्वासितांमधीलच वेंचक लोकांना देण्यांत आलीं तर त्यांनाहि काम मिळेल व एखाद्या बाहेरच्या स्वयंसेवकाच्या नेतृत्वाखालीं तें काम व्यवस्थितपणानें चालेल.

उदाहरणच द्यावयाचें झालें तर नोंदणीकरिता त्यांच्यांतलेच लोक निव-डून नोकरीवर घेण्यांत आले व बाहेरून होणारी कारकुनांची आयात अगर स्वयंसेवकांचें आगमन यापेक्षां ही व्यवस्था फायदेशीर ठरली. कापडवांटपाच्या बाबतींतहि येथील निर्वासित तरुण मुलांनीं अमोल सहाय्य केलें. म्हणून दिवसें-दिवस त्यांच्याच हातीं ही व्यवस्था देण्यांत यावी. लवकरच येथील व्यवस्था लष्कराच्या हातून काढून नागरिक शासनसंस्थेच्या हातीं दिली जावयाची आहे. त्या वेळीं स्वयंसेवकांची निकड भासेल यांत शंका नाहीं. परंतु तोंपर्यंत ' यूथ सोशल सर्व्हिस ' सारखी संघटना तें काम घेण्याइतकी संघटित करणें मुळींच अशक्य नाहीं.

माणसाच्या मनाची घडण पाहिली तर वृद्ध व विशी ओलांडलेले लोक यांना घडलेल्या गोष्टी विसरणें मुळींच शक्य होत नाहीं. महिलाश्रमांत कितीहि चांगली व्यवस्था केली, कितीहि गोष्टी सांगितल्या तरी स्त्रियांना आपण झालें- गेले विसरून नव्या उभारणीला लागूं, हें खरेंच वाटत नाहीं! उलट लहान वा तरुण मुलें—सारें विसरून जरी नव्हे तरी डोळ्यांआड करून—राष्ट्राच्या नव्या उभारणीचा विचार करूं शकतात. म्हणून त्यांच्या संघटनेकडे सर्वांत जास्त लक्ष पुरवणें जरूरीचें आहे. येथील लोकसंख्येची जवळून पाहणी केली, तर कांहीं गोष्टी एकदम नजरेंत भरतात. त्या म्हणजे साधारणपणें १३ ते २० वर्षांपर्यंतचीं मुलें व २० ते २२ पर्यंतच्या मुली यांची संख्या अत्यंत कमी आहे. अगदीं लहान व खूप मोठी, अशी वयवार विभागणी आहे. व्यवसायदृष्टीनेंहि सामान्यतः बहुसंख्य शेतकरीवर्गच कांहीं भागांत आढळतो. शिक्षणाचें प्रमाण तर फारच कमी आहे.

येथील व दिल्लींतील निर्वासित यांत जमीन अस्मानाचा फरक आहे. दिल्लींत नोंदणीच्या वेळेला 'कुठें राहतां?' या प्रश्नाला "प्लॅटफॉर्मवर अगर रस्त्यावर" असें उत्तर क्वचितच मिळे. "पूर्वी लाहोरमध्यें मोत्यांचा व हिऱ्यांचा व्यापारी होतो" अशी माहिती दिल्यावर "आतां काय करतां?" या प्रश्नाला "फूटपाथवर बूट-चपला विकतो" असेंहि उत्तर मिळे. दिल्लींतील निर्वासितांचें नुकसान जास्त झालें असलें तरी बहुतांशीं ते उच्च मध्यमवर्गीय आहेत. त्या मानानें कुरुक्षेत्रांमधील निर्वासितांचें नुकसान थोडें असलें तरी ते अत्यंत खालच्या वर्गांतले लोक आहेत.

## भीकेची प्रवृत्ति

प्रत्यक्ष चलन नाहीं व मागितल्यावर मिळते ही जाणीव झाल्यानें भीक मागण्याची वृत्ति अत्यंत वेगानें वाढत आहे. कोणीहि चांगले कपडे घातलेला गृहस्थ वा स्त्री रस्त्यावर येतांच स्त्रिया व मुलांचा घोळका, कपड्याची पर्ची द्या, कंबल द्या, निदान पैसे द्या म्हणून मागें लागतात, साऱ्या जगानें 'शरणार्थी, शरणार्थी' असा त्यांच्यावर शिक्का मारून डांगोरा पिटणें, गावोगावच्या पुढाऱ्यांनीं व श्रीमंतांनीं त्यांना बघायला येणें, त्यांची कीव करणें यामुळें त्यांची मनोरचनाच न्यूनगंडाची होत आहे. हा होणारा बदल जर वेळेवरच सावरला

नाहीं, तर त्याचा परिणाम वाईट झाल्याशिवाय राहणार नाहीं. या सर्वांत भरीला भर म्हणून शीख व हिंदू यांचे संबंध असावेत तितके सलोख्याचें राहिले नाहींत असें आढळून आलें आहे. याचीं कारणें काय असावींत याचें निश्चित निदान मला अजूनहि करतां येत नाहीं. परंतु ही गोष्ट मात्र तिन्हाइतालाहि प्रथम दर्शनींच जाणवते.

आता त्यांच्यांतील बारीकसारीक जातिबंधनें थोडी फार सैल झाल्यासारखीं वाटत आहेत. फाळणीला जबाबदार असणाऱ्या पक्षाबद्दल आणि पुढाऱ्यांच्याबद्दल थोडीशी अढी निर्माण झाली आहे. मुसलमानांच्याबद्दल तर राग अनावर झाला आहे, तो इतका कीं मुंबईला जाणाऱ्या एका निर्वासितानं मला विचारलें, " तिथं मुसलमान किती आहेत ? " तो म्हणत होता, " मला खाणं नसलं तरी चालेल; पण मला मुसलमान दाखवा, बंदूक द्या—माझं मी पाहून घेतों ! आम्ही आमच्या सरहद्द प्रांतावर प्रेम करीत होतों, करतों; पण आम्हांला तिथून जबरदस्तीनं हाकलण्यांत आलं. मग मुंबईच्या मुसलमानांना तिथं राहण्याचा काय अधिकार आहे ? " एकदा कुरुक्षेत्र स्टेशनवरून एक मुसलमान निर्वासितांची आगगाडी गेली. आणि ती अडवून लुटण्याकरितां हातीं मिळेल तें साधन घेऊन सर्व पुरुष पांच मैल पुढें गेले व गाडी रोखली. परत आल्यावर कांहीं निर्वासित सांगत होते, कीं, " मुसलमान लष्करानं आमच्यावर गोळीबार केला असता व आमच्यांतले कांहीं लोक मेले असते तरी दुःख झालं नसतं. परंतु आम्ही मुसलमान मारायला गेल्यानंतर आमच्याच लष्करानं गोळीबार करून लोक मारले याचंच आम्हांला जास्त दुःख होतंय. "

आमच्या स्वयंसेवक संघटनेंत पुष्कळदां लोक फौजभरती म्हणूनच येते. जातीय द्वेषाचे हे रसरशीत निखारे कोण आणि कसें शांत करणार ! एक नऊ वर्षांचा मुलगा—ज्याचे आईबाप मारले गेले—त्याची समजूत कोण घालणार ? एका ८० वर्षांच्या वृद्धाचें—ज्याचीं दोन तरुण मुलें मारलीं गेलीं, दोन तरुण मुली पळवल्या गेल्या व अमानुष क्रूरतेनें पत्नी व तीन वर्षांचा नातू मारला गेला—अशा त्या भरल्या घरांतून एकट्या उरलेल्या वृद्धाचें सांत्वन कोण आणि कसें करणार ?

## नोंदणीचे कार्य

आम्ही विद्यार्थ्यांनीं आमच्या हातीं जीं कामें घेतली होतीं त्यांपैकीं सर्वांत महत्त्वाचें म्हणजे नोंदणीचें. निर्वासितांच्या नोंदणीसंबंधी व त्या योजनेच्या फलितासंबंधी लिहिणें इतक्यांतच शक्य नाहीं. कारण, नोंदणीनंतरचे सर्व निर्णय व माहितीपत्रकें अजून तयार झालीं नाहींत. शिवाय, कुरुक्षेत्रांतली नोंदणीहि अजून पूर्ण झाली नाहीं. या नोंदणी पत्रकाचे मुख्यतः व्यक्तिगत माहिती, पुनर्स्थापना माहिती व नुकसानपत्रक असे तीन भाग आहेत. पहिल्या भागांत निर्वासितांच्या बरोबर असणाऱ्या सर्व माणसांचीं नांवें, शिक्षण, वय, व्यवसाय वगैरे संपूर्ण माहिती घेतली जाते. त्याचबरोबर पाकिस्तानांत किती माणसें राहिलीं किती मारलीं होतीं याचीहि नोंद केली जाते.

पुनर्स्थापना पत्रकांत कुटुंबांतील मिळवतीं माणसें काय काम करीत असत, आता त्यांना कांहीं काम मिळालें आहे काय, नसल्यास कशाची अपेक्षा आहे, बाहेर जायचें झाल्यास कुठे जाण्याची तयारी आहे. वगैरे माहिती गोळा केली जाते. नुकसानपत्रकांत पाकिस्तानांत त्यांचें काय काय नुकसान झालें याची तपशीलवार नोंदणी केली जाते. तशी नोंदणी झाल्यावर त्यांना तशा अर्थाचें प्रमाणपत्र देण्यांत येतें. वस्तुतः ही नोंदणी सर्वांत प्रथम व्हावला हवी होती; परंतु तें सर्वांत उशिरा झालें. पण आता झपाट्यानें तें काम पूर्ण होत आलें आहे. यावरून खरी लोकसंख्या, पाकिस्तानांत राहिलेली लोकसंख्या, मृतांची व बेपत्ता लोकांची माहिती, नुकसान झालेली मालमत्ता ही माहिती शक्य तितकी अधिकृत मिळते व पुनर्स्थापनेच्या दृष्टीने महत्त्वाची माहिती गोळा केली जाते.

ही सर्व माहिती गोळा केल्यावर त्या नोंदणी पत्रकाची विभागणी जिल्हेवार केली जाते. नंतर त्या सर्व पत्रकांचें कोडिफिकेशन करून अखेरचीं पत्रकें तयार केलीं जातात. यांतून निघणारीं अनुमानें अर्थातच मोठीं बोधप्रद ठरणार आहेत.

कुरुक्षेत्रांतील अनाथ स्त्रियांच्याकरितां एक विभाग आमच्या विद्यार्थिनींनीं चालविला आहे. प्रथम प्रथम तेथें दाखल होण्यास स्त्रिया अत्यंत नाराज असत. कारण पाकिस्तानांत व येतांना क्वचित हिंदुस्थानांतहि त्यांना जी वाग-

णूक मिळाली आहे त्यामुळें त्या अत्यंत साशंक मनःस्थितींत आहेत. परंतु एकदा विश्वास निर्माण झाल्यानंतर आता तें काम अत्यंत व्यवस्थितपणानें चाललें आहे. यांत एक गोष्ट मात्र लक्षांत ठेवणें अगत्याचें आहे ती ही कीं, वयोमानाप्रमाणें भूतकाल विसरणें व नव्या जोमानें कामाला लागणें हें वयस्कांना क्वचितच शक्य आहे. उलट ही गोष्ट लहान मुलांना सहज शक्य आहे. म्हणून मुलांच्या संघटनांकडे अधिक लक्ष देऊन त्यांचा अधिक उपयोग करून घेणें अवश्य आहे. तिथेच एक अनाथ शिशुगृह चालवलें आहे. आता त्या मुलांची संख्या पुष्कळच वाढली आहे. अद्यावत् साधनांनी त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था करण्यांत आली आहे.

आमच्या कामाचा तिसरा महत्त्वाचा भाग म्हणजे 'यूथ सर्व्हिस स्क्वॉड.' निर्वासित विद्यार्थ्यांची ही संघटना निर्माण करण्यांत आमच्या विद्यार्थ्यांना अपूर्व असें यश मिळालें आहे. निर्वासित विद्यार्थी आमच्या छावणींत येऊन राहिल्यावर त्यांना सांस्कृतिक व संघटनात्मक शिक्षण दिलें जातें. त्याचबरोबर त्यांना समाजसेवेचीहि संधि दिली जाते. कापडवांटप, रक्षणव्यवस्था आदि अनेक बाबतींत या स्वयंसेवकांनी प्रशंसनीय कामगिरी केली आहे. याशिवाय 'नर्सरी स्कूल्स'ची व्यवस्था आमच्या विद्यार्थिनींनी व विद्यार्थ्यांनी घेतली आहे. या सर्व कामाची पाहणी अनेक अधिकारी व्यक्तींनीं करून समाधान व्यक्त केलें आहे. नोंदणीच्या कामाबद्दल पूर्व पंजाब अधिकारी व यू. एन्. एन्. आर. च्या प्रतिनिधींनी अत्यंत गौरवपर उद्गार काढले.

## स्थिरस्थावर होऊं लागले

जगांत कोठेहि झाली नसेल इतक्या मोठ्या प्रमाणांत व अशा पद्धतीनें व गतीनें लोकसंख्येची आदलाबदल होत असतांना संघटनेची तीव्र अवश्यकता भासते. कुरुक्षेत्राची व्यवस्था लष्कराच्या हातीं आहे म्हणून पुष्कळ कामें सुलभतेनें होत आहेत. आता हळू हळू लष्कर जात आहे व नागरिक शासनसंस्था सर्व कारभार हातीं घेत आहे. शक्य तितक्या तातडीनें निर्वासितांना परप्रांतांत जागा देऊन येथील लोकसंख्या कमी केली जात आहे. कुरुक्षेत्र, ठाणेश्वर, पानिपत, कर्नाल या भागांत व आसपास अनेक निर्वासित आहेत, त्यांची व्यव-

स्थाहि हळूहळू होत आहे. खुद्द कुरुक्षेत्र कँपांत आता वीज आली आहे, शाळा सुरू होत आहेत, हातमाग सुरू करण्याची व्यवस्था होत आहे. विणकाम आदि कामें स्त्रियांना दिलीं जात आहेत. स्वयंनिर्मित लहानलहान दुकानांनीं बाजार आपोआपच वाढतो आहे. दुधवांटपाची योजना सुरू झाली आहे. आरोग्याच्या बाबतींत अतिशय दक्षतेनें व्यवस्था राखली जात आहे. स्वच्छता, रोगप्रतिबंधक उपाय अमलांत येत आहेत. जागेमुळें अधिक रुग्ण घेतां येत नाहीत. पण रुग्णालय वाढवण्याची योजना लौकरच होत आहे. वीजपुरवठ्यामुळें इतराहि अनेक योजना शक्य होणार आहेत.

हिंदुमिशन, मारवाडी रिलीफ सोसायटी, नॅशनल ख्रिश्चन कौन्सिल, रेड क्रॉस, बालवीरसंस्था वगैरे अनेक संघटना तेथें काम करीत आहेत, त्या सर्व संस्थांचे सूत्रबद्ध एकीकरण जर एकाद्या मध्यवर्ती संघटनेतर्फे करतां आले, तर कामाची गति खासच वाढेल कॅम्पांत नको असलेले राजकारण, अजून विसरले नसले तरी रा. स्व. संघ व सेवादलाची शाखाही शाखा सुरू झाली आहे. आतां निर्वासितांना कामें देण्याचा प्रयत्न केला जात आहे. रेशन, नोंदणी, कापड वांटप, स्वच्छता वगैरे अनेक खात्यांत निर्वासित जबाबदारी घेत आहेत.

अशीच कामें होत गेली तर असंख्य भुकेलेल्या व निरुद्योगी निर्वासितांचा प्रश्न जलद् सोडवतां येईल आणि संघटनांनी व निर्वासितांनी हीच आस्था दाखवल्यास निर्वासित छावण्यांचे आदर्श शहरांत रुपांतर करण्याचे पं. जवाहरलालजींचे स्वप्न साकार होईल.

# परिशिष्ट २ ×

## कांहीं वेळां अगदीं रडायला येईलसं वाटतं !

हल्लीं मी करोलबाग केंद्रांत काम करतों आहें. प्रथम मी सब्जी मंडी-मध्यें होतों. पण निर्वासितांच्या गडबडीमुळें मला तें केंद्र बंद करावें लागलें. करोलबागचें काम चांगलें चाललें आहे. निर्वासितांची स्थिति अत्यंत करुणास्पद आहे. किती तरी बाटवले गेले आहेत; काल आमच्या केंद्रांत एक तीन कोटींचा मालक आला होता. इतकीं श्रीमंत माणसें रस्त्यावर ओळींत बसतात. वाईट वाटतें. घरचीं पंधरा माणसें कत्तलींत मेल्यावर एक बारा वर्षांचा मुलगा वाचणें ह कल्पनेच्या बाहेर आहे. प्रत्येक केस मोठी विलक्षण येते. Psychologicaly upset झालेली माणसें. घरच्या लोकांचीं नांवेंसुद्धां आठवत नाहींत. काल एक शास्त्री आला होता. त्याचा मुलगा बाटला. तो तेथेंच आहे. शास्त्री त्याचें नांव द्यायलाही तयार नव्हता. आणि सबंध Interview पुरा झाल्यावर प्रत्येकजण विचारतो, बाबूजी, आमचें काय होईल आतां ? या प्रश्नाचें उत्तर केव्हां मिळणार आहे देव जाणे ! एक मोटार फॅक्टरीचा मालक. तुम्ही रहातां कुठें ? म्हटल्यावर स्टेशनवर. काय करतां ? मी कुली आहें. हें अगदीं भयंकर आहे. मी प्रत्येकाला चांगला वागवतों आहें. एका वृद्ध गृहस्थाला उभें रहावत नव्हतें

---

× ऑक्टोबर १९४७ मध्ये दिल्ली निर्वासित केंद्रांतील कार्यक्रमासंबंधींचें पत्र.

म्हणून मी म्हणालों, माझी खुर्ची द्या. तो नाहीं म्हणाला. मग मी उभें राहूनच काम केलें. आम्ही विद्यार्थी मदत करतों आहोंत हें कळल्यावर अतिशय चांगले वागतात. माझ्या पाठीवर हात फिरवून बेटा म्हटलेलें चालेल, पण मोठ्या वयस्क गृहस्थांनीं माझ्या पायाला हात लावणे, अगदीं असह्य वाटलें. बायका मुलें, सर्व दिल्ली भरली आहे. लोक रस्त्यावर रहातात. पण आम्ही त्यांना पुष्कळच मानसिक आधार दिला आहे. मानसशास्त्राचा केवढा अभ्यास आहे. माझ्यापुढें बायका रडतातच पण मोठे पुरुष रडतात. तुम्ही काय करतां ? म्हटलें तर, 'मी भिकारी आहे' बायको ? बलात्कार केला त्यांनीं. मुलगा बाटवला, जायदाद लुटली. हाय एकटाच शिल्लक आहें. कशाला कोण जाणे ! कांहीं वेळां अगदीं मला रडायला येईलसें वाटतें. पण पुष्कळ व्यवस्था करायचा आम्ही प्रयत्न करतों आहोंत. आमच्यांतले कांहीं कुरुक्षेत्राला चारपांच दिवसांत जातील. नंतर आम्ही सर्व जावूं. आतां इथल्याच कांहीं विद्यार्थ्यांना वगैरे शिकवीत आहोंत.

...रोज जवळ जवळ अठरा ते वीस तास काम पडतें. सकाळीं सहा ते रात्रीं १२. पण आम्ही सर्व रात्रीं एकत्र काम करतों. त्यामुळें वेळ मजेंत जातो. आतांपर्यंत जवळ जवळ साठ हजार ते सत्तर हजार शरणार्थींची माहिती गोळा केली आहे. इतक्या अवधींत Data गोळा करणें व रोज रात्रीं आम्ही त्याचें Tabulation करून statistics गोळा करणें ही आंकडेशास्त्रांतहि प्रथमच गोष्ट होत आहे. १०।१२ दिवसांत ६० हजार माणसांची संपूर्ण माहिती व त्याचे Tabulation म्हणजे कठीण आहे...परवां दसऱ्याची सुद्धां सुटी नव्हती...कळावें आशीर्वाद असावा.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
५६०१
ग्रं. क्र.
संदर्भ शाखा

REFBK-0005691